१५ जुलै १९६७
चाळीस पैसे

# माणूस




नक्षलबारीचा डावखोरा तिरंदाज

## २५ फेब्रुवारीची ती संध्याकाळ

दिल्लीत एकच एक घोषणा उठत होती
" जीत गया भाई जीत गया. .
दीपकवाला जीत गया "
सगळेजण आनंदाने बेहोष झाले होते
चौकाचौकांतून नाच, गाणी, भांगडा चालू होते
कित्येक किलो मिठाई वाटली जात होती
थंड पेयांच्या बाटल्या फुटत होत्या

## २३ मार्चची ती सकाळ

या दिवशी तर दिल्लीत जणू नवी दिवाळीच
साजरी होत होती
याच दिवशी जनसंघाचा दिल्लीतील रीतसर
कारभार चालू झाला
राजकारणातले खोटे बोलणे, खोटे हसणे,
पोकळ आश्वासने आणि ठोकळ भाषणे
यांचा जमाना त्या दिवशी संपला
आणि नवे रक्त, नवे चेहरे, नव्या इच्छा, नव्या
आकांक्षांनी भारलेल्या कार्यकर्त्यांचा कारभार
सुरू झाला

## आणि . . . .

[ कव्हर पान ३ पहा

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : सातवा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

अ. मा. साधू

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

स. न. जून, २६

१७ जूनचा अंक वाचीत असताना स्वातंत्र्यवीरांच्या जन्मठेपेची करुण कहाणी वाचली. ज्यांनी जन्मठेपेची शिक्षा भोगली, स्थानबद्धतेत असताना भिंतीवर डोके आपटून आपटून स्मरणाने तो ऐतिहासिक ग्रंथ लिहिला, त्याच्या विक्रीची अवस्था रस्त्यावर मातीच्या मोलाने व्हावी, हा सर्व वृत्तांत वाचून खेद वाटला. सावरकरांनी स्वतःच लिहून ठेवले आहे की, 'सावरकरांच्या साहित्याची इंग्रजीच्या राजवटीत देवकीच्या देवछंद कुसल्यासारखी करुणास्पद स्थिती झाली आहे की, मुले उपजताच थडग्यात पुरली जात.'

हा जन्मठेप ग्रंथ प्रतिष्ठेने विकला जावा म्हणून केशवशेठनी स्वतःची प्रतिष्ठा पणाला लावली याबद्दल त्यांचे आभारी आहोत. या लेखाच्या प्रसिद्धीमुळे एक संवेदना चमकून गेली, ती म्हणजे समग्र सावरकर साहित्य महाराष्ट्राच्या प्रत्येक वाचनालयात सरकारकरवी असलेच पाहिजे हा दंडक असावा !

**सदाशिव दातार**, औरंगाबाद

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २.
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## ‘ जिनगानीचा घट धागा ’

## अशा कथा छापून पातळी कमी करू नये.

**स. न.** जून, २६

परवा २४ जूनचा अंक हाती घेतला. धक्काच बसला. ‘जिनगानीचा घट धागा’ अनुवादक शांताराम. हरे राम, काय गलिच्छ भाषा ! ‘बाळंतपर्ण एक अभ्यास’ यावर जसे कोरडे ओढावेसे वाटतात तसेच ही कथा वाचून घृणा निर्माण होते. ‘ माणूस ’ने ही गोष्ट छापावी याचे आश्चर्य वाटते. चोखंदळपणा इथे कसा संपला ? अशा कथा छापून ‘ माणूस ’ने आपली पातळी कमी करू नये, असे आग्रहाने सांगावेसे वाटते.

**सौ. राधा हरदास,** इंदूर.

**स. न.** जून, ३०

२४ जूनच्या अंकात ‘ जिनगानीचा घट धागा ’ वाचून फार आनंद झाला. लेखकाचा जीवनाविषयीचा दृष्टिकोन तंतोतंत जीवनासारखाच आहे. अशा कथांची आपल्या मराठीत फारच कमतरता आहे. लेखकाला माझ्या मते अवश्य प्रोत्साहित केले पाहिजे.

**मधुसूदन करमळकर,** जबलपूर.

**स. न.** जून, २७

२४ जूनचा ‘ माणूस ’ फारच आवडला. नेहमीपेक्षा थोडा अधिकच. अरब-इस्रायल संघर्षावर भाष्य करणारा लेख अप्रतीम वाटला. हा संघर्ष सुरू झाल्यापासून या विषयावर मराठी व इंग्रजीतून २५-३० लेख मी वाचले. परंतु ‘ माणूस ’-इतकं समतोल, वस्तुनिष्ठ, पूर्वग्रहविरहित लिखाण माझ्या वाचनात आलं नव्हतं. विषयाच्या मुळाशी जाऊन संपूर्ण माहिती मिळवायची आणि मगच लेख लिहायचा ही परंपरा अशीच चालू ठेवावी.

‘उर्दू वार्ता’सारखं लिखाण सर्व भाषांमध्ये प्रसिद्ध झालं तर मुस्लिम बांधव थोडाफार राष्ट्रवाद शिकतील आणि हिंदु-मुस्लिम संबंध सुधारण्यास मदत होईल.

**अरविंद अमृते,** मालाड.

**स. न.** जून, २९

‘ माणूस ’मधून प्रकाशित झालेले शिवसेनेविषयीचे लेख अत्यंत मार्मिक वाटले. स्पष्ट विचारांबद्दल ‘ माणूस ’ला धन्यवाद.

**प्रल्हाद कुलकर्णी,**
**‘ शिवसेना ’ शाखा प्रमुख,**
कोल्हापूर.

**स. न.** जून, ३०

‘ शिवसेना ’ लेखमाला वाचली. यासाठी बरेच दिवस वाट पाहत होतो. या विषयावर ‘ माणूस ’ खूपच चुप्प होता. खरोखरच ही लेखमाला मी ‘ माणूस ’-कडून अपेक्षा केल्याप्रमाणेच दर्जेदार होती. या लेखकाला लक्षावधी शिवसैनिक, तसेच तमाम मराठी माणसे धन्यवाद देतील.

## ' दक्षिणायना 'मुळे आम्हाला अज्ञात जगाचे दर्शन होत आहे.

१ जुलैच्या अंकातील बिहार वार्ता वाचून मन नाराज झाले. बिहारला साहाय्य करणारा प्रत्येक माणूस आज घाम गाळून मिळवलेला आपल्या मिळकतीतला भाग बिहारला देतोय. परंतु प्रत्यक्षात निसर्गाच्या सोयीकडे दुर्लक्ष आणि आळशीपणाची वाढ हे वाचून काय वाटेल ?

' दक्षिणायना 'मुळे आम्हांला अज्ञात असलेल्या एका जगाचे दर्शन परिपूर्णरीत्या होते आहे.

' माणूस प्रतिष्ठान ', 'बिहार परिवार' हे कार्यक्रम सद्यःकालीन मिट्ट काळोखात नव्या पिढीला पणतीसारखे मार्गदर्शक आहेत.

**वसंत प्रभुदेसाई** परेल, मुंबई.

**स. न.** **जून, २९**

१ जुलै ६७ अंकातील ' दिल्ली दरबार ' वाचल्यानंतर आपले परराष्ट्रीय धोरण राष्ट्रीय हित लक्षात घेऊन आखण्यात यावे, याची प्रकर्षाने जाणीव झाली. कम्युनिस्ट पुढारी श्री. भूपेश गुप्ता यांच्यावरील खोचक टीका योग्यच आहे. पण कम्युनिस्टांवर अशा टीकेचा काय परिणाम होतो ? जनतेने त्यांना धडा शिकववयास हवा.

' दक्षिणायन ' व 'व्होल्गा जेव्हा लाल होते ' या दोन्ही लेखमाला वाचनीय आहेत. साप्ताहिक होऊनही ' माणूस 'चे आकर्षक स्वरूप कायम राहिले हे विशेष! आगे बढो !!

**सौ. ललिता दुसाने,** सटाणा.

**स. न.** जुलै, २

माझ्या एका मित्राचा मित्र Bombay Aviation Division Central P. W. D. सांताक्रूझ, येथे काम करतो. पूर्वी तेथील काम करणारे मराठी लोक कधीही कामावर यायचे व कधीही लवकर जायचे. परंतु हल्ली त्या ऑफिसामध्ये × × × नावाचा मद्रासी ऑफिसर आला आहे. तो स्वतः अर्धाएक तास अगोदर येतो व नंतर उशीरा जातो. हल्ली तो मराठी लोकांचे ते चाळे (?) चालू देत नाही. अधिक उशीर झाल्यास कॅज्युअल लीव्ह घेण्यास सांगून परत पाठवितो.

ऑफिसमधील माणसे त्याची बदली करणार आहेत, असे कळते.

आता संपादक महाशय तुम्हीच सांगा आजच्या मागासलेल्या महाराष्ट्राला असल्या प्रामाणिक माणसांची गरज आहे किंवा नाही ?

**माधव लेले.** ठाकूरद्वार

●

# पुन्हा एकदा नक्षलबारी

भारताचा ' व्हिएटनाम ' करण्याचा कम्युनिस्ट चीनचा विचार आहे, अशी माहिती वर्षा-दीड वर्षापूर्वी मला एका निवृत्त वरिष्ठ सेनाधिकाऱ्याने गप्पांच्या ओघात सांगितली होती. तज्ज्ञ-मंडळींना कोणत्याही प्रश्नाला गांभीर्य देण्याची हातोटी साधलेली असल्यामुळे या लष्करी तज्ज्ञानेही असेच आपले कल्पनेचे वारू उधळून हा अंदाज व्यक्त केला असावा, अशी माझी कल्पना होती. निवडणुकीनंतर हे लष्करी अधिकारी पुन्हा भेटले तेव्हा मी त्यांना त्यांच्या या भाकिताची आठवण करून दिली. मला वाटले, आपल्या अंदाजात ते आता काहीतरी दुरुस्ती करतील. पण याउलट, पश्चिम बंगालमध्ये डाव्या कम्युनिस्टांच्या पाठिंब्याने मंत्रिमंडळ स्थापन झाल्याची वार्ता कळल्यामुळे ते अधिकारी म्हणाले, माझं भाकित मूळ अपेक्षेपेक्षा लवकर खरं ठरणार आहे, अशी चिन्हे दिसत आहेत. त्यांचा हा विश्वास तेव्हाही मला अनाठायी वाटला. परंतु पंधरा दिवसांपूर्वी कम्युनिस्ट चीनने ' नक्षलबारी 'ला आपला आशीर्वाद दिल्याचे वृत्त वाचल्यानंतर मला आठवण झाली ती त्या सेनाधिकाऱ्यांच्या भाकिताची !

' नक्षलबारी मध्ये भारतीय क्रांतीला शुभारंभ झाला असून या क्रांतीला चिनी जनता सुयश चिंतित आहे, ' अशा आशयाचे ते वृत्त वाचल्यानंतर भारताचा ' व्हिएटनाम ' करण्याचा चीनचा डाव असावा हे त्या लष्करी तज्ज्ञाचे मत तर्कशुद्ध विचारसरणीवर व त्याच्या चीनच्या अभ्यासावर आधारलेले होते याविषयी निराळा पुरावा शोधण्याची गरज नाही. ' बंगाल वर्षभराच्या आत आपल्या हातातून गेला तर आता आश्चर्य वाटायला नको ' असे त्यांनी नुकतेच मला लिहिले आहे. नक्षलबारी हे एवढे गंभीर प्रकरण असताना गेल्या पंधरा-वीस दिवसांतच त्याकडे केंद्र सरकारने गंभीरपणाने लक्ष पुरविलेले आहे. यापूर्वी पश्चिम बंगाल सरकारच्या अहवालावरच केंद्र सरकार विसंबून होते. यावरून या देशाच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या गंभीर घटनांबाबतही आजचे आपले राज्यकर्ते किती उदासीन असतात याचा हा नवा पुरावा आहे. अर्थात् ही झोपाळू वृत्ती आपल्यात आजच निर्माण झाली आहे असे नव्हे ! मिझो आणि नागा जमातींमध्ये ख्रिश्चन धर्मोपदेशक भारतविरोधी प्रचार करीत आहेत, ही गोष्ट पंधरा वर्षांपूर्वी केंद्र सरकारच्या

# दिल्ली दरबार

— सदाशिव पेटकर

नजरेस आणून देण्यात आली होती. त्या वेळी राज्यकर्त्यांचे कर्तव्य हे होते, की या आरोपाची कसोशीने चौकशी करून परिस्थिती खरोखरच तशी असेल तर या भारत-द्रोही प्रचाराचा कणखरपणाने बंदोबस्त करावा. परंतु हा सल्ला देणाऱ्याविरुद्धच गहजब करण्यात आला. आज नागा आणि मिझो जमातींची भारतविरोधी चळवळ कोणत्या थराला गेली आहे याच्या दररोज बातम्या वाचावयास मिळत आहेत. पूर्व पाकिस्तानमध्ये हे मिझो व नागा बंडखोर जातात, तेथे ते चिनी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली छुप्या युद्धाचे शिक्षण घेतात व नंतर पाकिस्तानी शस्त्रास्त्रे घेऊन भारतात परततात. हा प्रकार आता नित्याचा झाला आहे. नागाप्रदेशात भारत सरकारचे शासन नाममात्रच आहे. कोहिमा शहराच्या परिसरातच प्रतिस्पर्धी नागा सरकारच्या कारवाया सुरू असून त्यांना आळा घालणे आपल्या राज्यकर्त्यांना जमलेले नाही. मिझो बंडखोरांची वाटचालही यापेक्षा वेगळी नाही.

## मुक्तीयुद्धाचा बुरखा

अशा रीतीने अर्धाअधिक आसाम प्रत्यक्ष नियंत्रणाच्या दृष्टीने हातातून घालविल्यानंतर नक्षलबारीकडे लक्ष देण्याची केंद्र सरकारवर पाळी आली आहे. नक्षलबारी हा दार्जिलिंग जिल्ह्यातील लहानसा भू-भाग. तेथे आदिवासींची बरीच वस्ती आहे. या आदिवासींची आर्थिक दुर्दशा पराकोटीची आहे. या आर्थिक दुरवस्थेचा फायदा घेऊन ख्रिश्चन धर्मोपदेशकांप्रमाणे कम्युनिस्टांनीही भारत-विरोधाचा प्रचार या भागात सुरू केला असून चीनने आता त्याचा राजरोस पाठपुरावा केला आहे. कम्युनिस्टांच्या दृष्टीने हा शेतकरी उठाव आहे. 'मुक्ती,' 'जनता-उठाव' हे कम्युनिस्टांच्या पोथीतील शब्द आता सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत. चीनने तिबेट गिळला तो त्याची 'मुक्तता'(!) करण्यासाठीच आणि रशियाने पूर्व युरोपात आपले साम्राज्य स्थापन केले आहे तेही तेथील जनतेची 'मुक्तता' करण्यासाठीच. कम्युनिस्टांच्या मुक्तिसंग्रामाने जनतेच्या हाती कोणते फलित येते याचा तिबेटमधील व पूर्व युरोपमधील जनता भरपूर अनुभव घेत आहे. नक्षलबारीतील 'शेतकरी-उठाव' कोणत्या जातीचा आहे हे त्या भागात मंत्र्यांना पोलिस-बंदोबस्ताशिवाय प्रवेश करता येत नाही यावरून समजून येते.

लोकांमधील आर्थिक असंतोषाला खतपाणी घालून प्रस्थापित राज्यसत्तेविरुद्ध

दोन हात करण्याची नित्य प्रेरणा द्यावयाची हे कम्युनिस्टांचे तंत्र जुनेच आहे. म्हणूनच नक्षलबारी म्हणजे दुसरे तेलंगण होण्याची शक्यता आहे, अशी चिंतायुक्त भाषा राजकीय निरीक्षकांकडून ऐकावयास येत आहे. तेलंगण आणि नक्षलबारी यांत मुळीच फरक नाही, असे मात्र नव्हे. पेकिंग आणि मॉस्को यांच्यांत आज जेवढा फरक आहे तेवढाच या बाबतीत आहे, असे हे निरीक्षक सांगतात. तेव्हा मॉस्कोच्या आशीर्वादाने तेलंगणातील 'मुक्तियुद्ध' सुरू झाले होते. घातपाती कृत्ये करून जनतेमध्ये व सरकारी यंत्रणेमध्ये घबराट निर्माण करण्यावर त्या वेळी भर देण्यात आला होता. परंतु तेव्हाचा 'तेलंगण प्रयोग' फसला आणि त्यानंतर कम्युनिस्टांनी विश्वामित्री पवित्रा घेऊन आमचा 'तो' उद्देश नव्हताच मुळी! असा धादांत खोटा कांगावा करण्यास प्रारंभ केला. आज चिनी कम्युनिस्ट भारतीय लालभाईंना हाताशी धरून नक्षलबारीमध्ये तोच प्रयोग करू पाहत आहेत. आज रशियाला शांततेची तहान लागली आहे आणि चीनला प्रक्षोभक वातावरणाची! दोन्ही साम्यवादी राष्ट्रांचे राष्ट्रीय स्वार्थ परस्परविरोधी झाले की तत्त्वज्ञानाचा मुलामा केवळ बेगडी ठरतो याचे हे उदाहरण आहे.

परंतु आज तरी केंद्रीय मंत्रिमंडळ या प्रकरणाबाबत गंभीर विचार करीत असल्याचे दृश्य दिसत नाही. आजच्या केंद्रीय नेतृत्वाची विचार करण्याची ताकदच नष्ट झाली आहे की काय, असे सभोवती घडणाऱ्या घटनांवरून वाटते. एका बाजूला अरब-इस्रायल संघर्षामध्ये आमचा उत्साह इतका पराकोटीला जातो की अरबांपेक्षाही आम्हांलाच इस्रायलचा अधिक राग आल्याचे दृश्य दृष्टीस पडते. तीच गोष्ट व्हिएटनामची. आग्नेय आशियातील या संघर्षस्थानात अमेरिका व चीन यांची आपापली बाजू स्पष्ट झालेली असताना व चीनचे संकट आपल्याला भेडसावत असताना अकारण अमेरिकेला दुखवण्यातही आम्हांला आमच्या आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीची कमाल वाटते. मग हा उत्साह आणि मुत्सद्देगिरी नक्षलबारीसारख्या अंतर्गत महत्त्वाच्या प्रश्नाच्या वेळी नाहीशी का व्हावी?

चीनने गेल्या काही वर्षांत भारतविरोधी फळी उभारण्याच्या दृष्टीने केवढी महत्त्वपूर्ण पावले टाकली आहेत! आणि आता आमचे परराष्ट्रमंत्री लोकसभेत सांगतात की, काठमांडू-ल्हासा रस्त्यामुळे कोणती परिस्थिती निर्माण झाली आहे याचा आम्ही विचार करीत आहोत. काठमांडू-ल्हासा रस्ता वर्षभरात काही बांधून झालेला नाही. या रस्त्यासंबंधी गेली चार वर्षे बातम्या येत आहेत. पण आता कोठे आमचे संरक्षणखाते या रस्त्यामुळे आपणास निर्माण झालेल्या धोक्याचा विचार करू लागले आहे! हा विचार पूर्ण होईपर्यंत चीनने बरीच दौड मारलेली असणार हे उघड आहे.

मघाशी वर उल्लेखिलेल्या लष्करी तज्ज्ञांच्या मते आपल्या संरक्षण व्यवस्थेच्या

मूलभूत विचाराबाबत इतका गोंधळ आहे की त्यामुळे कम्युनिस्ट चीनची पुढची पावले ओळखून उपाययोजना करण्याची शक्ती अद्याप उभीच राहिलेली नाही. नक्षलबारी प्रकरणाबाबत चीनचा हस्तक्षेप नाही असे कोणी सांगत असले तर ती केवळ धूळफेक आहे. भारत सरकारने नुकताच जो चीनला निषेध खलिता धाडला आहे त्यात चीन भारताच्या अंतर्गत कारभारात किती पद्धतशीर हस्तक्षेप करीत आहे याचा तपशील देण्यात आलेला आहे. चीन आणि नक्षलबारी यांच्या नात्याबाबत अद्याप जर कोणाचा गैरसमज असेल तर तो त्याने आता दूर करावयास हरकत नाही इतका हा खलिता स्वच्छ नि स्पष्ट आहे.

## प्रश्नाचे गांभीर्य

नक्षलबारीच्या घडामोडींकडे विशेष बारकाईने कोणाचे लक्ष असेल तर ते केरळचे मुख्यमंत्री श्री. नंबुद्रिपाद यांचे. भारताच्या दक्षिण टोकावर असलेल्या या चिमुकल्या राज्यामधील कम्युनिस्ट सत्ता स्थिर पायावर उभी आहे. चीनबाबत ममत्वाची भावना असणारे कम्युनिस्ट आज येथे अधिकारावर आहेत. नक्षलबारीतील 'शेतकऱ्यांचा उठाव' अधिक तीव्र रूप धारण करू लागेल तेव्हा केरळ स्वस्थ बसेल असे समजण्याचे कारण नाही. पूर्वेकडचे बंगाल आणि दक्षिणेकडचे केरळ या दोन राज्यांमध्ये आपल्या शत्रूराष्ट्रांबद्दल आत्मीयता बाळगणाऱ्या प्रवृत्ती सत्तारूढ असताना भारत सरकारला नक्षलबारीमधील प्रक्षोभाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. चीनच्या आशियातील विस्तारवादी राजनीतीमधील महत्त्वाचे एक पाऊल, या दृष्टीनेच नक्षलबारीकडे पाहावयास हवे. परंतु अ. भा. काँग्रेस महासमितीच्या बैठकीत संस्थानिकांचे तनखे ठेवावेत की बंद करावेत, यासंबंधी खडाजंगी चर्चा होऊ शकते. केंद्र सरकारच्या सत्तावीसशे कोटी रुपयांच्या खर्चापैकी अवघे चार कोटी रुपये संस्थानिकांच्या तनख्यासाठी खर्च होत आहेत. म्हणजे हा प्रश्न फार तातडीचा वा गंभीर आहे असे नाही. परंतु या मामुली प्रश्नावर रण माजविण्यास काँग्रेस महासमितीला वेळ असतो. नक्षलबारीसारखे भारताच्या सार्वभौमत्वाच्या आणि स्वातंत्र्याच्या दृष्टीने आव्हान ठरणारे प्रकरण मात्र उपेक्षित राहते !

आज एवढी गरज आहे की एक कम्युनिस्ट सोडले तर देशांतील सर्व राष्ट्रवादी शक्तींनी अन्य मामुली प्रश्नांवर मतभेदांचे रण माजविण्याऐवजी आज देशाच्या अंतर्गत भागात निर्माण होत असलेली व परकीय राष्ट्रांच्या सक्रीय पाठिंब्याने सुजत चाललेली संघर्षस्थाने कोणती, याचा गंभीरपणाने विचार करून, त्याबाबत तातडीने कृती करावयास हवी. तसे घडले नाही तर मात्र त्या लष्करी अधिकाऱ्याने व्यक्त केलेली भीती खरी ठरण्याचाच संभव अधिक.

# मुक्ताफळे



## □ अब्राहम ! लॅझॅरसला सोडू नकोस !!

पूर्वी कोणी एक श्रीमंत मनुष्य होऊन गेला. तो राजाचा मंत्री होता. तो अंगावर रेशमी खादीची वस्त्रे घाली व पंचपक्वान्नी जेवण जेवीत असे. त्याच्या दाराशी लॅझॅरस नावाचा भिकारी पडलेला असे. पुढे लॅझॅरस मेला तेव्हा देवदूतांनी त्याला स्वर्गात अब्राहमजवळ नेले. तो मंत्री मेला तेव्हा त्याला नरकात अग्निकुंडात टाकले. त्या मंत्र्याने डोळे उघडले तो लॅझॅरस अब्राहमजवळ मजेत बसलेला ! त्या मंत्र्याने अब्राहमला जवळ बोलावले व सांगितले,–" कृपा करून या लॅझॅरसला मृत्युलोकात परत धाड !" अब्राहम रागावला. म्हणाला, " काय बोलतोस हे नीचा ! लॅझॅरसची जागा आता माझ्याजवळ आहे. तुझ्या पापाचे क्षालन झाले, की तुलाच पुन्हा मनुष्य-योनी मिळाल्यास मिळेल. शेकडो वर्षे त्याला अजून आहेत !!"

तो मंत्री नरकवासातूनच अब्राहमला म्हणाला,–" माझं ऐक ! जाऊ दे लॅझॅरसला मृत्युलोकात ! तिथे जाऊन तो लोकांना सांगेल की, एका पिढीला पुरण्यासारखे द्रव्य साचले तरी तृप्ती न होऊन जे सात पिढ्या पुरेल इतका द्रव्यसंचय करतात व आपल्या जन्मास न आलेल्या मुलगे, नातू, पणतू, खापर पणतू यांची तरतूद करतात व ज्यांच्या अशा या वृत्तीमुळे, तूर्त जन्मास आलेल्या दुर्दैवी जिवांना उपाशी मरावे लागते, ॲडम आणि ईव्ह यांच्या पातकांमुळे शरीराचा काही भाग झाकणे अवश्य असूनही त्याला झाकण्यापुरते पुरेसे वस्त्रही उभ्या वर्षात मिळत नाही, अशा पापी लोकांना मृत्युनंतर नरक नशिबी येतो ! माझे हाल लॅझॅरसला मृत्युलोकात जाऊन सांगू दे. माझे स्वत:चे पाच भाऊ अजून खाली आहेत."

परंतु अब्राहमने लॅझॅरसला मृत्युलोकात धाडले नाही. अजून तो वरच आहे. अब्राहम काही त्या पुण्यवान माणसाला सोडीत नाही आणि लॅझॅरस काही खाली येत नाही. तो आला असता तर निजाम, बिजू पटनाईक, बक्षी गुलाम महंमद यांना नसता भेटला ? तो भेटलाच नाही, असे आम्ही छातीठोकपणे सांगतो.

बिजू पटनाईक ह्यांनी गेल्या ९ वर्षांत प्राप्तिकराचे कोटचवधी रुपये सरकारला भरलेलेच नाहीत. ते पुन्हा निवडून येऊन मंत्री झाले असते तर कशाला या गोष्टी उजेडात येत्या ? मंत्रिपदाच्या खुर्चीवरून जे डायरेक्ट वर जातात त्यांच्यावर पटनाईकांसारखा प्रसंग गुदरणे शक्य नाही ! गेली ९ वर्षे त्यांनी ३ कोटी रुपये दाबलेले आहेत. (करा व्याजाचा हिशेब जमला तर !) असे कुणी सरकारचे पैसे भरले नाहीत तर त्याला परदेशी जायचा परवाना मिळत नाही. पटनाईक परवाना घेऊन गेले ! पूर्वी मंत्री होते ना ?

संपत्तीकरावरून माणसाची संपत्ती आपले सरकार मोजते ! आमची कल्पना होती की, संपत्ती मोजून मग संपत्तीकर बसवतात. शेवटचे निजाम उल्मुल्क, अतुल्य घोषांना शाप देऊन निधन पावल्याची हकीकत आम्ही पूर्वी सांगितली आहेच. अर्थखात्याचे मंत्री के. सी. पंत यांनी परवा लोकसभेत सांगितले–" १९५७–५८ साली निजामाने जो कर भरला त्यावरून त्याची संपत्ती ३ कोटी ३० लक्ष होती, असे आम्हांला वाटले. परंतु आता त्याची संपत्ती १० कोटी रुपये आहे असे वाटल्यावरून आता मोजदाद सुरू केली आहे !" वा पंत ! राव मरून तुम्ही आता कुठे चढलात ! परंतु राव असताना १९५७–५८ नंतर निजामाने पुन्हा कर भरलेला दिसत नाही ! ही नवीन भानगड या भानगडीतून कशाला हो काढलीत ? शिवाय करावरून संपत्ती मोजायची अहिंसक फूटपट्टीही सांगून टाकलीत. छे: छे:, कसे होणार पंत ? संपत्ती म्हणजे रोकड संपत्तीचा हा हिशेब. त्याच्या जडजवाहिराची मोजदाद केली का, असा प्रश्न विचारल्यावर पंतांनी नकारात्मक उत्तर दिले. पंत, अल्ला तेरा भला करें !

निजामाची संपत्ती मोजायला इकडे माणसे बसवली तो तिकडे न्यायमूर्ती अय्यंगार यांनी काश्मीरचे भूतपूर्व महामंत्री बक्षी गुलाम महंमद यांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी बेकायदा ५४ लाख रुपये कमावल्याचा निष्कर्ष जाहीर केला. त्याचा अहवाल तेराशे पानांचा आहे. दर शंभर पानांत किमान चार लाख रुपये सापडले. आम्ही ऐकत होतो की गुलामीच्या शृंखला तोडण्यात या गुलामाने मोठी कामगिरी केली व डाव्या गटाची समाजवादी भारताची शेखमहंमदी स्वप्ने हाच महंमद पाहत होता. लाचलुचपतीचे ३४ आरोप किमानपक्षी बक्षींवर ठेवण्यात आले आहेत, असे समजते. शेख अब्दुल्ला या गुलामापेक्षा थोडा बरा होता, असे म्हणण्याची पाळी येईल की काय ? त्याला सोडून यालाच पकडावे लागणारसे दिसते.

तात्पर्य, लॅझॅरस काही पृथ्वीतलावर अजून आलेला नाही. कै. शिवरामपंत परांजप्यांनी 'काळ' पत्रात लॅझॅरसची सांगितलेली ही गोष्ट आमच्या वडिलांनी वाचली, तेव्हा नरकवासी श्रीमंत मंत्र्याचे पाच भाऊ पृथ्वीतलावर होते. यानंतर मंत्रिमंडळात जी बेसुमार वाढ झाली ती विचारात घेता लॅझॅरसचा 'लूप' लवकर बसवणे अब्राहमला श्रेयस्कर आहे.

नेहमीप्रमाणे मूळ प्रश्नाचा विचार करता आम्हांस असे आढळून आले की, मंत्र्याची

संपत्ती मोजणे हेच बेकायदेशीर ठरवले पाहिजे. आम्हांला असे वाटू लागले त्याच सुमारास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या ५४ व्या वाढदिवसाचा योग आला. 'शिवशक्ती'तील 'मराठ्यां'चे जे प्रतिसरकार आहे त्याचे आचार्य श्री. अत्रे यांनी वसंतरावजींबरोबर काढलेला आपला फोटो आम्ही जेव्हा पाहिला तेव्हा आमचा आनंद गगनात मावेना. काँग्रेसच्या नारसिंहाचे पोट फाडणाऱ्या भक्त प्रल्हादांना अखेर काँग्रेसच्या मंत्रिमंडळाच्या प्रमुखाची किंमत पटली, हाच काँग्रेसचा मोठा विजय होय. अशा या वसंतरावजींनी आता घोषणा केली आहे–" मंत्र्यांनी आपली मालमत्ता जाहीर करावी असे म्हणणे अनुचित होय ! " अनुचित ? आमचे म्हणणे, निंद्य होय–हे होणे नाही ! ते पुढे म्हणाले–" सत्ताधारी पक्षाचे लोक बदमाष आहेत, त्यांच्या हालचालींकडे लक्ष ठेवले पाहिजे हा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन चुकीचा आहे. ही न्यूनगंडाची भावना आहे ! " शाब्बास वसंतरावजी ! तुम्ही योग्य मार्गदर्शन करून राहिलेले आहात.

असा भलता दृष्टिकोन बाळगल्यामुळेच बिजू पटनाईक, बक्षी गुलाम महंमद यांसारख्या सज्जनांना आता गंडा बसण्याची पाळी आली आहे. जनता बदमाष आहे. २–४ कोटी रुपये ते काय आणि त्यात मोजता काय ? एखाद्या मंत्र्याने खूप मोटारी घेतल्या असतील तर त्या त्याच्या मित्रमंडळींनी त्याच्याकडे मागाव्या. एखाद्या मंत्र्याने पाच-पन्नास सिनेमा-थिएटरे खरेदी केली असतील तर जनतेने त्यांत सिनेमा पाहावा. परंतु बदमाष जनतेने मंत्र्यांची मालमत्ता किती हा प्रश्न विचारणे हीच बदमाषी आहे ! सत्तेवर असताना मंत्री 'मनोदय' जाहीर करतात, वाढदिवसाला वय जाहीर करतात, त्यांच्या मृत्युनंतर त्यांची मुले जाहीर होतात, यांपेक्षा आपले अधिक काही जाहीर करण्याची सक्ती त्यांच्यावर होता कामा नये.

आम्हांला सारखी भीती वाटत होती, की मराठी बाण्याला जागून वसंतरावजी बावळटासारखे सांगतील की, " मी किंवा माझे मंत्री आपली मालमत्ता जाहीर करण्यास तयार आहोत. सर्व पैसा निढळाच्या घामाचा आहे. घाम आमचा आहे किंवा वडिलांचा आहे. यात लाज कसली ? चला हो बाळासाहेब, आपण जाहीर करू आपआपली मालमत्ता ! " परंतु असे वसंतरावजी काहीही म्हणाले नाहीत. अब्राहमने लॅझॅरसला स्वर्गातच डांबून ठेवावे ! खाली सर्व आबादी आबाद आहे.

## ☐ वेडे किती ?

ग्लासबरो गावात रशियाचे कोसिजिन यांनी भारताचे पोसिजिन जॉन्सनसाहेब यांची प्रदीर्घ भेट घेतली. ही भेट वॉशिंग्टनला व्हावी, असे पोसिजिनने सुचविले. परंतु कोसिजिन वॉशिंग्टनला गेले तर रशियन जनतेच्या प्रतिष्ठेला धक्का बसतो असे सांगण्यात आले. भेटीसाठी जॉन्सन न्यूयॉर्कला गेले तर अमेरिकेच्या जनतेच्या प्रतिष्ठेला धक्का बसतो, असे जाहीर झाले.

वस्तुतः भेट घेण्यात कसली आली आहे हो प्रतिष्ठा ? कोसिजिन व पोसिजिन महात्माजींचे एवढे गोडवे गातात पण त्यांचा एक गुण काही उचलत नाहीत. मरहूम महंमद अली जिना हे एकदाही महात्माजींना भेटायला गेले नाहीत. प्रत्येक वेळी महात्मा गांधी आपण होऊन त्यांना भेटायला गेले. अखेर भेटता भेटता पाकिस्तान नक्की झाले. गांधीजी असे सारखे सारखे आपण होऊन गेले म्हणून काय हिंदूंची प्रतिष्ठा गेली की काय? सावरकर–जिनांची भेट व्हावी म्हणून सुभाषबाबू सावरकरांकडे गेले. सावरकरांनी गुर्मीत सांगितले की, "जरूर जिनांना आहे. वाटल्यास त्यांनी भेटायला यावे!" प्रतिष्ठेचा प्रश्न केल्यामुळे सावरकरांची जिरली. त्यांना जिनांची भेटच मिळाली नाही. दुर्दैवी कुठले! तुमचा "स्टॅम्प" भारत सरकार मुळीच काढणार नाही. इतरांचा मोठा क्यू आहे.

या वेळी मामला निराळा होता. ऐन युद्धात जो मार्शल स्टॅलिन तो एकदाही लंडन–न्यूयॉर्कला गेला नाही, त्याचा वारसदार कोसिजिन अमेरिकेला गेला, तेव्हाच अर्धी प्रतिष्ठा संपली होती. उरलेली त्याला वॉशिंग्टनला यायला लावून संपवावी तर 'अप्रतिष्ठित' माणसाला भेटल्याबद्दल जॉन्सनचीच बदनामी होणार. तेव्हा तडजोड निघाली. दोघांनी अर्धे-अर्धे अंतर तोडावे व न्यूजर्सीमधील ग्लासबरो गावात भेटावे. यात जॉन्सची बेअब्रू टळली व कोसिजिनची १/४ अब्रू वाचली!

आम्हांला या भेटीत काय झाले या संबंधी काहीच सांगायचे नाही. कारण 'व्हिएटनाम' सोडून इस्रायल, काश्मीर आदी सर्व प्रश्नांवर त्यात चर्चा झाली असणार! आम्हांला सांगायचे ते असे, की या भेटीसाठी ते अमेरिकेस असताना कोसिजिनना वार्ताहरांनी स्टॅलिनकन्या स्वेटलानासंबंधी विचारले. कोसिजिन यांनी सांगितले,–

"स्वेटलानाच्या डोक्यावर परिणाम झालेला आहे. तिचे चित्त ठिकाणावर नाही."

एखाद्याला वेडा म्हणण्याचा हा मुत्सद्देगिरीचा प्रकार असतो. मागे हिटलरचा कल्याण शिष्य हेस हा इंग्लंडात पळून गेला तेव्हा हिटलर म्हणाला, – "हेसच्या डोक्यावर परिणाम झालेला आहे. त्याचे चित्त ठिकाणावर नाही." तेव्हा स्वेटलाना ही वेडी ठरली आहे.

अमेरिकेत ही एक वेडी निसटली तो तिकडे मॉस्कोच्या चौकात एक वेडा उपटला. लेनिनच्या थडग्याजवळ २७ जूनला रात्री १ वाजता एक स्फोट झाला मध्यपूर्वेत रशियाने युद्धतहकुबी स्वीकारली याला विरोध दर्शविण्यासाठी एका माणसाने हा स्फोट केला. स्फोटात तो माणूस ठार झाला. हा माणूस वेडा होता, असे रशियन पोलिसांना त्याच्या 'पोस्टमार्टेम'मध्ये आढळून आले!

यावरून असे दिसते की, रशियन ध्येय–धोरणाविरुद्ध जे वागतात ते बहुधा वेडे असतात. आता अरब-इस्रायल वादात रशियाच्या मिग विमानांचा आणि शस्त्रास्त्रांचा इस्रायलने जो समाचार घेतला, त्यामुळे भडकून जाऊन बाणेदारपणे

छागला यांनी अरबांची बाजू घेतली. इतकी घेतली की, इतर १३ अरब राज्ये काय घेतील ! जग म्हणाले,——भारत हे चौदावे अरब राज्य दिसते ! ! भारतातील यच्चयावत वृत्तपत्रे व संपादक (श्री. पांडुरंगपंत गाडगीळ— मॉस्को रिटर्न्ड वगळून) हे, अरब –इस्रायल वादात भारताची भूमिका सपशेल चुकली असे म्हणत असताना व हीच वृत्तपत्रे सर्व भारतीय जनता विकत घेऊन वाचीत असताना, छागला ‘ भारतीय जनतेच्या वतीने ’ असा जो आपल्या मतांचा सारखा पुकारा करीत आहेत ती जनता कोण, असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

असे म्हणतात की, छागलांनी कृष्ण मेनन यांना विचारले,——

“ अरबांच्या संबंधी मी घेतलेल्या भूमिकेला विरोध करणारी ही माणसे कोण आहेत ? ”

मेनन यांनी सांगितले,——

“ हे सर्व वेडे आहेत. त्यांचे चित्त ठिकाणावर नाही. त्यांनीच मला पाडले. वाटल्यास कोसिजिनना विचारा. ”

रशियात वेडयांची जी संख्या होती, ती स्वेटलाना प्रकरणानंतर पन्नास टक्क्यांनी घटली व स्फोटानंतर उरलेले टक्के संपले. भारतात उंटावरच्या शहाण्यांची संख्या दोन आहे. एक छागला व दुसरे मेनन.

म्हणून तर मुंबईत उताणे आणि शिवाय पालथे झालेल्या मेननना नासर यांना प्लॅस्टर मारण्यासाठी भारताचे प्रतिनिधी म्हणून कैरोला धाडण्यात आले आहे. मेनन पडले म्हणून काय झाले ! ते जनतेचे प्रतिनिधी आहेत. शहाण्या जनतेचे प्रतिनिधी आहेत. भारतात वेडयांची मेजॉरिटी होऊ लागली आहे. त्याला छागला—मेनन काय करणार ?

## □ नवे मोहनास्त्र !

आपल्या भारतात शेख अब्दुल्ला संस्थान सोडून जी २८१ संस्थाने आहेत, त्यांना सर्व मिळून प्रत्येक वर्षाला ५ कोटी रुपये तनखा वाटण्यात येतो. दहा हजारांपासून वीस लाखांपर्यंत तनखा ज्यांना ज्यांना मिळतो] ते सर्व संस्थानिक होत ! अ. भा. काँग्रेस कमिटीच्या दिल्ली अधिवेशनात ‘ तनखे बंद करा ’ अशी उपसूचना खासदार श्री. मोहन धारिया यांनी मांडली व ती मंजूर झाली. मंत्रिपद मिळाले नाही म्हणून, उपमंत्रिपद निःस्वार्थ बुद्धीने ठोकरणाऱ्या धारियांचे हे नवे मोहनास्त्र मोहनदास करमचंदांच्या ‘एक वर्षात स्वराज्य’ या घोषणेपेक्षा क्रांतिकारक ठरले आहे. कदाचित काही मंत्रिमंडळे गडगडणार आहेत. कुणी म्हणतात, भारताचे चतुरस्र खेळाडू यशवंतरावजी यांनी फलटणकरांना टाकलेला हा गुगली चेंडू आहे. आम्हांला तसे मुळीच वाटत नाही. असे म्हणणे हा मोहन धारियांच्या स्वतंत्र प्रज्ञेचा अपमान होय ! शिवाय फलटणकर हे ‘ हिट विकेट ’ म्हणजे हातातली

बॅट स्टंपवर मारून बाद झालेले असताना, पुनः त्यांना गुगली चेंडू टाकण्याचे कारण नाही. महाराष्ट्रात काँग्रेस सोडणे हे स्वतःच बाद होण्यासारखे आहे. तेव्हा मोहनरावांनी काँग्रेस केंद्रीय मंत्रिमंडळाला पेचात टाकणारी ही सूचना मांडून, मोठीच कामगिरी केली आहे. पाच कोटी रुपयांचा प्रश्न नाही ! इतके रुपये काय पटनाईक कराच्या रूपात बुडवतो आणि एखादा बक्षी खाऊन जातो. प्रश्न तत्त्वाचा आहे. गरिबीचे समान वाटप झालेच पाहिजे.

या तनखावंदीच्या सूचनेला मोरारजींचा विरोध होता. त्यांनी वार्ताहरांजवळ नंतर सांगितले,–

" तनखावंदी सरकारने केली तर तो विश्वासघात ठरेल. परंतु अ. भा. काँग्रेसने तसे ठरवले तर ते करावे लागेल ! "

खरंच आहे. हा विश्वासघात असला तरी ही काही काँग्रेसची तो करण्याची पहिलीच खेप नाही. पाकिस्तानला मान्यता देऊन पूर्वी विश्वासघात केलेला आहे. बादशहाखानांचा केलेला आहे. सरहद्द गांधींचा केलेला आहे. विश्वासघात करायला या वेळी तर मुळीच हरकत नाही ! कारण सरदार पटेल हे आता हयात नाहीत. प्रश्न तत्त्वाचा आहे. विश्वासघाताचा किंवा पाच कोटींचा नाही. आणखी ११ वर्षे हे सर्व संस्थानिक तनख्यासहित जिवंत राहतील एवढे म्हणजे ५५ कोटी रुपये आपल्याच सैनिकांवर काश्मीरात गोळ्या झाडण्यासाठी महात्माजींच्या आशीर्वादाने' आपण पाकिस्तानला दिलेले आहेत. त्यांनी आपले २०० कोटी बुडविलेले असून दिले ! आमची खात्री आहे की, त्या वेळी मोहन धारिया प्रजा समाजवादी पक्षात असल्यामुळेच त्यांनी हा सर्व प्रकार त्या वेळी स्वस्थपणे पाहिला असावा. आता मात्र तत्त्वासाठी त्यांनी ५ कोटी रुपयांचे तनखे बंद करण्याचा जो आग्रह धरला आहे तो स्वागतार्ह आहे.

या बाबतीत अस्सल काँग्रेसवाल्यांपेक्षा नवागत धारिया अधिक आग्रही का याचे उत्तर सोपे आहे. नवेच अधिक कडवे असतात. त्यांना आपला अस्सलपणा सिद्ध करावयाचा असतो. मोहनराव आगे बढो ! प्रश्न तत्त्वाचा आहे !

— ग्यानबा



## ☐ शिक्षण आणि बौद्धिक प्रगती

हिंदुस्थानात शिक्षणाच्या क्षेत्रात गेल्या काही वर्षांत बरीच प्रगती झाली असली तरी अजून बरेच कार्य बाकी आहे, असे स्पष्ट मत अमेरिकन शिक्षणशास्त्रज्ञ डॉ. लिओनार्ड यांनी थोडया दिवसांपूर्वी प्रकट केले. भारत सरकारचे शिक्षणविषयक सल्लागार म्हणून अमेरिकेतील कोलंबिया विश्वविद्यालयाचे काही प्राध्यापक व शिक्षणतज्ज्ञ सध्या हिंदुस्थानात काम करीत आहे. त्यांचे डॉ. लिओनार्ड हे नेते आहेत.

भारत सरकारने नेमलेल्या शिक्षण-समितीने सुचविलेल्या सुधारणा अंमलात आणल्या गेल्या तर शिक्षणाचा दर्जा वाढण्यास बरीच मदत होईल. या कार्याला जेवढा पैसा हवा, त्याहून अधिक धैर्य, निश्चय आणि समस्येचे यथार्थ ज्ञान यांची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या स्वरूपात बदल होण्याची आता नितांत आवश्यकता आहे. हल्लीचे युग वैज्ञानिक असल्याने या युगाला अनुरूप अशी शिक्षण-पद्धती स्वीकारली पाहिजे ! हल्ली जग फार झपाटयाने पुढे जात असल्याने इतरत्र होणाऱ्या बौद्धिक प्रगतीच्या बरोबर राहणे अधिकच निकडीचे झाले आहे.

## ☐ फ्रेंच दृष्टीतून भारतीय समस्या

भारतीय अन्नसमस्या सोडून भारताबद्दल इतर कुठलीच माहिती सर्वसाधारण फ्रेंच माणसाला नसते, अशी माहिती फ्रान्समधील एका प्रमुख वर्तमानपत्राचे संपादक ज्यूल्स क्लावीर यांनी परवा नव्या दिल्लीत दिली. ती माहिती प्रत्यक्ष मिळविण्यासाठी ते हिंदुस्थानात आले आहेत. त्यांनी निरनिराळया प्रश्नांवर प्रकट केलेले काही विचार असे :

हिंदुस्थानाला अन्नाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे अशक्य नाही. खरे म्हणजे येथे धान्य पुरेसे आहे, पण वितरण-व्यवस्था सदोष दिसते. लहान कारखान्यांकडे अधिक लक्ष पुरवायला पाहिजे. त्यायोगे देशाच्या अर्थकारणाला मदत होऊन परकीय चलनावर अवलंबून राहावे लागणार नाही.

येथील सामाजिक कार्य सुसंघटित असून ते स्वेच्छेने केले जाते. हिंदुस्थानात खूपच प्रगती झाली आहे, परंतु परदेशी वृत्तपत्रांत फक्त दुष्काळ, संप आणि इतर असल्याच अनिष्ट गोष्टींबद्दल वाचायला मिळते. यावर काही तरी उपाय केला पाहिजे.

भारतीय वर्तमानपत्रांत सर्व माहिती असते. येथली वृत्तपत्रे निर्भीड व निरंकुश आहेत व माहिती असाव्यात अशा सर्व गोष्टी त्यांत असतात. वाचकांच्या पत्रव्यवहाराचा स्तंभ तर विशेष उल्लेखनीय आहे. बऱ्याच फ्रेंच वर्तमानपत्रांत असा स्तंभ नसतो.

आणखी काही फुटकळ विचार :

जयप्रकाश नारायण यांचे काही विचार मौलिक असून त्यांच्यामुळे काही मूलभूत समस्या सुटण्यास मदत होऊ शकेल.

विकसनशील देशांनी मित्र राष्ट्रांकडून खाजगी साहाय्य अवश्य घ्यावे.

द् गॉल इंग्लंडला युरोपीय सामायिक बाजारपेठेत येऊ देत नाहीत ते बरोबर आहे. इंग्लंडला स्वार्थही हवा आहे व परमार्थही हवा आहे.

## ☐ बाल-नगरी

दिल्लीपासून थोड्या अंतरावर 'एस्. ओ. एस्. व्हिलेज इंटर्नॅशनल' या संस्थेतर्फे अनाथ मुलांसाठी एक छोटेखानी नगरी वसविण्याचे कार्य कुमारी एडिथ पोल नावाच्या ऑस्ट्रियन समाज-सेविकेच्या देखरेखीखाली झाले आहे. त्या म्हणतात, इतर देशांत एस्. ओ. एस्. बाल-नगरीत वाढलेली मुले पुढे जबाबदार नागरिक झाली आहेत व हे गाव म्हणजेच आपले घर असे त्यांना पुढील आयुष्यातही वाटत आले आहे. अनाथ व दुःखी मुलांची समस्या सोडविण्याचा हा सर्वांत उत्तम व दयाळू उपाय आहे ! या 'बालनगरीत मुलांना नेहमीचे जीवन जगण्याचे सुख जसे मिळू शकते तसे कुठल्याही अनाथाश्रमात मिळू शकणार नाही. बालनगरीचे बाल नागरिक स्वतःच्या पायांवर उभे राहू शकण्येइतके मोठे होईपर्यंत त्यांची काळजी घेण्यात येते.

## ☐ अंगोलाचा स्वातंत्र्य-संग्राम

अंगोला या पोर्तुगीज वर्चस्वाखालील आफ्रिकन वसाहतीतील सात तरुण स्वातंत्र्य-संग्रामासाठी सैनिक शिक्षण घ्यावे या इच्छेने भारतात आले आहेत. त्यांचे प्रमुख डॉमिंगॉस मिरांडा यांनी अंगोलात पोर्तुगीजांनी चालविलेल्या दडपशाहीचे वर्णन नुकतेच दिल्लीतील पत्रकारांसमोर केले. पोर्तुगीज सत्तेपुढे मान वाकविणे ज्यांना अशक्य वाटते असे लोक खूप मोठ्या संख्येने निसटून बाहेर जात आहेत. अंगोलात विश्वविद्यालय आहे, पण तेथे शिकणे अशक्य आहे ! कारण, पोर्तुगीज पोलीस विद्यार्जन करू पाहणाऱ्या तरुणांना पकडून त्यांचा छळ करतात. शिकलेले स्त्री-पुरुष राजद्रोहाचा प्रचार करतील, अशी पोर्तुगीजांना भीती वाटते. त्यामुळे अशा तरुण मंडळींची त्यांच्या कुटुंबियांपासून फारकत करण्यात येते. त्यामुळे अंगोलातील बहुतेक तरुण कॉंगोला पळून गेले आहेत व तेथे त्यांनी स्वातंत्र्य-लढ्याची तयारी करण्यासाठी चार वसाहती उघडल्या आहेत. या वसाहतींत एकूण ५०,००० अंगोली तरुण सैनिकी शिक्षण घेत आहेत. पोर्तुगीज छळाला कंटाळलेले एकूण सहा लाख अंगोली निर्वासित कॉंगोत आहेत. त्यांनी स्वतःचे सरकारही स्थापन केले असून हाल्डेन रॉबर्टो हे त्यांचे अध्यक्ष आहेत.

लष्करी क्रांती कधी सांगून होत नाही, पण भारतात आलेल्या अंगोली तरुणांनी बोलून दाखविलेला धाडसी विचार : सैनिकी शिक्षण घेऊन आम्हांला येत्या दोन वर्षांत अंगोलात लष्करी क्रांती घडवून आणायची आहे. ●

# उर्दू वार्ता

## ☐ मुस्लिमांची मार्गदर्शिका - फलाहे मिल्लत !

१९६६ सालच्या मे महिन्यातील एका शुभदिनी चार विचारी तरुण एकत्र आले आणि त्यांनी भारतातील भांबावलेल्या, गोंधळलेल्या मुस्लिम समाजास योग्य मार्गदर्शन करण्याच्या सद्हेतूने 'फलाहे मिल्लत' या नावाची एक संघटना पुण्यात उभी केली. आज त्या संघटनेच्या स्थापनेला बरोबर एक वर्ष झाले असून अगदी पहिल्या जाहीर सभेत घोषित केल्याप्रमाणे त्या संस्थेने आपले मुखपत्र साप्ताहिक "मिल्लत टाइम्स" प्रसिद्ध करून आपले शब्द खरे केले आहेत.

अशा या संस्थेचा उद्देश, कार्य यांचा आढावा घेणे उद्बोधक ठरावे–

मुस्लिम समाजात धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, नैतिक प्रगती घडावी म्हणून सदर संस्थेची स्थापना. आणि आजवरचे तिचे कार्य पाहिले म्हणजे आतापर्यंत तरी तिने निश्चितच कौतुकास्पद कामगिरी केली आहे, असे म्हणावे लागेल.

गेल्या वर्षी गरीब व गरजू अशा ३५ मुस्लिम विद्यार्थ्यांना या संस्थेने मोफत पाठ्य–पुस्तके पुरविली. तसेच अरबी, इंग्रजी व टेक्निकल या विषयांचे मोफत क्लासेस चालविले. एस्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या निवडक अशा हुशार विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाबाबत मार्गदर्शन व मदत केली. नऊ विद्यार्थ्यांना तर कॉलेज व हायस्कूलच्या फीबाबत साहाय्य केले. एस्. एस्. सी. परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या मुस्लिम विद्यार्थ्यास या वर्षी संस्था ५१ रुपयांचे रोख बक्षीसही देणार आहे.

ग्रंथ हे गुरू मानून मुस्लिम तरुणांमधील वैचारिक अंधःकार दूर करण्यासाठी संस्थेने एक मोफत वाचनालय सुरू केले असून तेथे अरबी, उर्दू, इंग्रजी, गुजराथी, मराठी या विविध भाषांतील १,००० पुस्तके, तसेच १३ साप्ताहिके-मासिके व ६ दैनिके नियमितपणे येतात.

परस्परांत वैचारिक देवाण-घेवाण व्हावी म्हणून संस्थेच्या विद्यमाने दर शनिवारी वाङ्मयीन, आर्थिक, औद्योगिक इत्यादी विषयांवर चर्चा, परिसंवाद वगैरे ठेवले जातात. रात्री पवित्र कुराणातील एखाद्या अध्यायाचे पठणही होते.

संस्थेने बेकारी निवारणार्थही प्रयत्न केले आहेत. नोकरीसाठी आलेल्या ५२ अर्जांपैकी २९ उमेदवारांना नोकऱ्या मिळवून देण्यात संस्थेला यश लाभले आहे.

अश्लील वाङमय, उत्तान चित्रपट इत्यादिद्वारा होणारे नव्या पिढीचे अधःपतन थांबवण्यासाठी संस्थेने आध्यात्मिक व नैतिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून चारित्र्य-संवर्धनाचा (Creation of Character) रीतसर असा एक वर्षाचा कोर्सच सुरू

केला आहे. तरुणांना विधायक कार्यात गुंतविण्यासाठी आवाहन करणारे वाङ्मय (सालेह लिटरेचर) प्रकाशित केले जाणार आहे.

गरीबांना हरप्रकारचे साहाय्य करणे हाही संस्थेच्या कार्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. आजवर संस्थेने गरीब व गरजू अशा ३८ रुग्णांना आर्थिक मदत केली असून दोन रोग्यांना दवाखान्यात दाखल करून त्यांच्यावर योग्य ते उपचार करवून घेतले आहेत.

तथापि 'फलाहे मिल्लत' आजवर केलेल्या या कार्याविरत्व संतुष्ट नाही, याचे प्रत्यंतर संस्थेच्या भविष्यातील कार्यक्रमावर नजर टाकल्यास सहज लक्षात येईल.

## योजना आणि अपेक्षा

१ मुस्लिम समाजातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी मंगल वातावरणातील वसतिगृह. सदर वसतिगृहासाठी लागणारी जागा संस्थेने विकत घेतली असली तरी इमारत तयार होण्यास अवधी लागणार म्हणून तूर्त एका भाड्याच्या इमारतीत १ जुलैपासून होस्टेल सुरूही करण्यात आले आहे.

२ नर्सरी स्कूलच्या धर्तीवर लहान मुलांसाठी 'इस्लामिया मदरसा' सुरू करणे. जेथे मुलांना धार्मिक व सांस्कृतिक शिक्षण दिले जाईल.

३ मुस्लिम महिलांसाठी साप्ताहिक चर्चा घडवून आणणे; पवित्र कुराणातील अध्याय ऐकवणे इत्यादी.

४ संपूर्ण महाराष्ट्रभर 'फलाहे मिल्लत'च्या शाखा उघडणे. दैनिक काढणे.

५ तरुणांच्या आरोग्यसंवर्धनासाठी व्यायाम शाळेची स्थापना करणे.

६ हिंदी, उर्दू पत्रांसाठी स्वतःचा प्रेस उघडणे.

'फलाहे मिल्लत'ने आतापर्यंत केलेले कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. असे विधायक कार्य हाती घेतल्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. आणि त्याचबरोबर आमच्या त्यांच्याकडून ज्या अपेक्षा आहेत, त्याही प्रकट करतो.

महंमद पैगंबरांचे उर्जस्वल चरित्र यांचे अडाणी, अजाण मुस्लिमांना आवर्जून दर्शन घडवून त्यांच्या संकुचित व पूर्वग्रहदूषित विचारांचे निर्मूलन करणे अत्यावश्यक आहे. कारण पुष्कळदा या मूठभर मूर्खांच्या आततायीपणामुळे, अज्ञानी उपद्व्यापामुळेच हिंदू–मुस्लिम संघर्ष पेटतो आणि नाहक शांतता धोक्यात येते.

दोन लग्ने करणे हा मुस्लिमांचा हक्क म्हणून हट्टाला पेटणाऱ्यांना महंमद पैगंबरांच्या काळची तत्कालिन परिस्थिती व कुराणातील वचन इत्यादी स्पष्ट

करून सांगणे जरूर आहे. कुराणात चार बायका करा, असा आदेश कोठेच नाही. चार बायका केल्या तरी चालतील, असे म्हटले आहे.

तसेच कुटुंब नियोजनाबाबत इस्लामची ढाल पुढे करून विषयासक्तीचे प्रदर्शनापासून त्यांना परावृत्त करणे आवश्यक आहे.

मशिदीवरून मिरवणुका जाणे, एकमेकांच्या प्रार्थना–मंदिरांचे पावित्र्य राखणे, भावनांचा विचार करणे इत्यादींबाबत समंजसपणा, मनाचा मोठेपणा दाखविण्याचे मौलिक शिक्षण सर्वसामान्य मुस्लिमांना देण्याचे कार्य अंगीकारिल्यास नित्याच्या कितीतरी कटकटी मिटू शकतील व भारतीय मुस्लिमांचे व पर्यायाने भारताचेही खरोखर कल्याण होऊ शकेल ! ! ●


## श्री. गोपीनाथ तळवलकर षष्ठ्यब्दिपूर्ती सत्कार समिती

पुण्याच्या 'आनंद' मासिकाचे भूतपूर्व संपादक, मराठीतील एक विख्यात साहित्यिक आणि सांप्रत पुणे आकाशवाणी केंद्राच्या बाल-विभागाचे संयोजक श्री. गोपीनाथ तळवलकर यांच्या वयास २९ नोव्हेंबर १९६७ रोजी ६० वर्षे पूर्ण होतात.

गेली चाळीस वर्षे श्री. गोपीनाथ तळवलकर यांनी महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक जीवनातील विविध क्षेत्रांत कवी, कादंबरीकार, पत्रकार, मुलांच्या साहित्यसृष्टीचे निर्माते, चरित्रकार, व्याख्याते या नात्याने जी समाजसेवा केली त्याबद्दल त्यांचा गौरव करण्याचे श्री. गोपीनाथ तळवलकर षष्ठ्यब्दिपूर्ती सत्कार समितीने ठरविले आहे.

सदर पत्रकाद्वारे महाराष्ट्रातील सर्व जनतेला आणि संस्था-चालकांना आम्ही असे आवाहन करतो की, सर्वांनी सत्कार समितीच्या कार्यास सक्रीय सहकार्य द्यावे.

ज्यांना सत्कार समितीच्या निधीसाठी आर्थिक साहाय्य देण्याची इच्छा आहे, त्यांनी ते समितीच्या नावाने चेक, ड्राफ्ट वा मनिऑर्डरने पाठविण्याची कृपा करावी. त्याबद्दल साभार पावती पाठविली जाईल.

**आचार्य प्र. के. अत्रे**, अध्यक्ष, सत्कार समिती
**साथी एस. एम. जोशी**, उपाध्यक्ष, सत्कार समिती

**कार्यालय**
'प्रकाश' ७५१३, डेक्कन जिमखाना, पुणे ४
दूरध्वनी : ५७७५५

## मुक्ती

नाही वेडावलं वारं
तरी सावर पदर
नाही मृत्यु उभा दारी
तरी देवभक्ती करी
नाही जगी तुझे कोणी
तरी सांभाळ ग 'मीपणा'
नाही जरी स्वप्नभंग
तरी सावर तरंग
नच जमणार गाथा
तरी लवू देत माथा
नाही जगात मोक्ष या
तरी मनात मुक्त हो

*आशा लिमये*

## उदास पाऊलवाट

होती डोळ्यांत रात्रीच्या
एक व्यथा थिजलेली,
होती शुष्क आठवण
काळजात भिजलेली.
गळा दाटला काळोख
मूक चंदेरी भावना;
कवटाळित उराशी
जागी; धुक्याच्या वेदना,
स्वत:भोवतीच फिरे
मन होऊनि पाचोळा.
विरहाच्या सेजेवर
आता स्मृतींचा सोहळा !
होती डोळ्यात रात्रीच्या
एक विरलेली लाट,
होती खुणा आठवीत
उदास पाऊलवाट !

*रामदास मोरे*

## आस्वाद

'मुक्ती'ची कल्पना फार सुंदर आहे. आपले विचार, कल्पना किंवा आपले स्वत्व हे कुणावरच अवलंबून ठेवू नये. वारा फोफावला म्हणजे मग पदर सावरण्यात काय अर्थ आहे? त्याची तालीम आधी झालेली असली पाहिजे. स्वप्नभंग झाला नसला तरी 'तरंग सावर' म्हणजे काय हे मात्र नीट ध्यानात येत नाही. जगाच्या धकाधकीत मोक्ष मिळणे कठीण! जग मुक्तता मिळवू देत नाही, म्हणून तू मनातच 'मुक्त हो' हे सांगणे फार महत्त्वाचे वाटते. अखेर मन हेच बंधमोक्षाचे कारण असते. कवितेची रचना लयबद्ध आहे. आशा लिमये यांनी कल्पनेची मांडणी महत्त्वानुसार केली आहे.

'उदास पाऊलवाट' या कवितेतील भावना छायाप्रकाशाने रंगविलेली आहे. यामध्ये काळोख हा चंदेरी भावनांच्या पार्श्वभूमीवर दाखवला आहे. उडणारा पाचोळा स्थिर अशा शेजेवर भिरभिरतो आहे. येथे प्रवाही असलेली व्यथा थिजून गेली आहे. आणि नेहमी रसाळ वाटणारी आठवण शुष्क झाली आहे. रामदास मोरे यांना एकंदरीने विरोधाभास खूप आवडतो असे दिसते. धुक्याच्या वेदना याही एकंदर कवितेतील रस अधिक उत्कट करतात. परंतु पाऊलवाट ही शेवटी जशी उपरी आली तशी न येता अधिक स्पष्टपणे पहिल्यापासून आली असती तर कवितेचे सौंदर्य अधिक वाढले असते.

गोपीनाथ तळवलकर

# इभ्रत

मिर्झाचे सकाळचे शब्द
माझ्या कानांत जोरजोरानं
प्रतिध्वनित होऊ लागले.
'बोभाटा केल्यानं माझीच
बेअब्रू होईल....'

हिदायतखान

मिर्झा फार लफडेबाज माणूस ! सदा कसल्या न कसल्या लफड्यात गुंतलेला ! आणि आपल्या लफड्यात आम्हा शेजाऱ्यापाजाऱ्यांनाही गुंतविण्याची त्याची सवय आम्हांला अनेकदा जाचक ठरलेली आहे. परंतु आमच्यापैकी कोणी त्याच्या लफड्याविषयी उदासीनता दाखविली किंवा सल्ला देण्यात कसूर केली तर मिर्झाने त्याच्याशी वैर धरलेच म्हणून समजा ! त्यामुळे इच्छा नसताही आम्हांला त्याच्या बोलण्याकडे लक्ष द्यावे लागते; निदान लक्ष देत आहोत, असे वरपांगी तरी भासवावे लागते.

आज सकाळी-सकाळीच तो जेव्हा माझ्या घरी आला तेव्हाच मी ओळखले की, आता आपल्याला एखादे नवीन लफडे ऐकावे लागणार ! आणि झालेही नेमके तसेच !

खुर्चीवर बसताबसताच मिर्झाने म्हटले, " काही म्हणा ! हल्ली तुम्हा-आम्हा सज्जनांना जगणं कठीण झालंय् ! "

अनिच्छेनेच मी विचारले, " का ? काय झालं मिर्झासाहेब ? "

" अहो, इकडे आड अन् तिकडे विहीर. बोलावं तर पंचाईत, न बोलावं तर पंचाईत ! "

" अहो, पण झालं तरी काय ? " मी विचारलं.

" अहो, इज्जतीला जपणारी माणसं आपण ! इभ्रत हीच तुम्हा-आम्हा गरीबांची दौलत ! "

" का ? कोणी घातला घाला तुमच्या इभ्रतीवर ? "



" अहो, दुसरं कोण ? आपल्या आळीतला तो रंगा पैलवान माहीत आहे, नं ?"

" काय ? रंगा पैलवानानं असं अघोर कृत्य केलं ? तो तर तसा दिलदार मनाचा. "

" अहो, तो नव्हे, त्याचं दिवटं कारटं ! "

" कोण–मोहन्या ? " मी आश्चर्याने विचारले.

" हो. तोच–मोहन्या ! आपली गल्ली म्हणजे रंभा–नगरी वाटते त्याला शृंगार-चेष्टा करायला ! "

" पण आजवर कधी ऐकलं नव्हतं तसं काही त्याच्याविषयी ! " मी म्हटले.

" तुम्ही ऐकलं नसेल पण मला आलायना अनुभव. "

" काय ? " माझी उत्सुकता मला स्वस्थ बसू देत नाही.

" कोणाला सांगू नका ! कारण, त्यामुळं माझीच बेअब्रू होईल ! "

" बरं राहिलं. सांगणार नाही. पण झालंय तरी काय कळू द्याल की नाही ? "

" सांगतो ना. " आणि मिर्झानि दबलेल्या आवाजात सांगायला सुरुवात केली, " अहो, परवा आमच्या बेगमनं पैलवानाच्या गॅलरीकडं तोंड करून असलेली खिडकी उघडली, तो मोहन तिथं उभा असलेला तिला दिसला. उभयतांची नजरानजर होताच प्रथम तो तिच्याकडं पाहून हसला व नंतर तर त्याने तिला चक्क सलाम केला ! "

" काय, म्हणता काय ? " मी आश्चर्याने किंचाळलो.

" अहो, जे घडलंय् तेच सांगतोय्. "

" अहो, पण तुमची बेगम त्याची आई शोभेल की ! "

" ते काही विचारू नका. गद्धेपंचविशीत साक्षात् कुब्जादेखील पुरुषाला पद्मिनी भासते ! तसंच जख्खड वृद्धाही नवयौवना दिसते ! "

" पण–तुम्ही काय केलंत मग ?"–मी.

" काय करणार ! या गोष्टीचा गाजावाजा करावयाचा म्हणजे आपणहून आपल्या पायांवर दगड पाडून घेण्यासारखाच प्रकार ! कारण, त्या पैलवान गड्याला इज्जत–बिज्जतीची काय मातब्बरी ? माझी मात्र नाहक बदनामी ती बदनामी ! आणि..."

" पण मिर्झासाहेब, तुम्हांला कसं कळत नाही ? तुम्ही जर असेच मूग गिळून बसलात तर त्याला अधिकच चेव येणार नाही का ? "–मला मात्र आता खरोखरच चेव चढला !. सामाजिक हित, नागरिकांची कर्तव्ये, शेजारधर्म इ. इ. बाबी मला डिवचू लागल्या.

" जाऊ द्या हो ! ' बुरे से खुदा भी डरता है । ' "

" अहो, पण मिर्झासाहेब हा केवळ तुमच्या एकट्याचा प्रश्न नाही. आज तुमच्याशी त्यानं अशी आगळीक केली; उद्या आमच्यापैकी कोणाशी करील ! त्याच्या नीच कृत्याची जर अशी गय केली तर तो शेफारून जाईल. मुलीबाळींना इथं राहणं मुष्कील होऊन बसेल, आहात कुठं ? ते काही नाही. तुम्ही काही म्हणालात तरी हा प्रश्न धसास लावलाच पाहिजे ! आजच मी आपल्या गल्लीतील चार–चौघांना सांगून–"

मध्येच मिर्झा घाईघाईनं म्हणाला, " अहो अहो, हे काय ? तुम्ही कबूल केलंय् कोणाला सांगणार नाही म्हणून ! "

" अहो, पण असं पाहा मिर्झासाहेब–"

" ते काही नाही. कृपा करून असा काही अविचार करू नका ! " असे म्हणत उठून तो तडक चालताही झाला.

काय अजब माणूस आहे !

शेवटी मी ठरवले, मिर्झाचे अन् आपले वाकडे आले तरी चालेल ! परंतु या प्रश्नाचा छडा लावायचाच !

झाला प्रकार मी आमच्या गल्लीतील चार–पाच समंजस गृहस्थांना सविस्तर सांगितला. प्रस्तुत प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्याची निकड ओळखून माझ्याबरोबर रंगा पैलवानाच्या घरी यायला ते लोक लगेच तयार झाले.

आम्हांला पाहताच रंगा पैलवानाने तोंडाला लावलेली दुधाची चरवी काढून ' या–या ' म्हटले आम्हांला. ' बसा '–म्हणत त्याने आत ऑर्डर सोडली–" चार–पाच

गलास दूध आणा रे."

परंतु मी परिस्थितीचे गांभीर्य टिकावे म्हणून न बसताच घुश्श्यात म्हटले, "आम्ही इथं दूध प्यायला आलो नाही काही !"

"गरीबाच्या घरी कशाला याल तुम्ही दूध प्यायला? पण...तरी एका गलासानं–"

"पैलवान, तुमच्या मोहनला समजावून सांगा. नाहीतर परिणाम चांगला होणार नाही !"–मी गुरगुरलो.

"अहो, पण रावसाहेब झालं तरी काय एवढं ?"–रंगा पैलवान अजूनही शांतच होता.

"स्पष्टच सांगतो. तुमच्या मोहन्यानं मिर्झासाहेबांच्या बायकोला छेडलंय् !"

"आं ? काय म्हणता काय ?" आत्यंतिक आश्चर्यानं पैलवान किंचाळला.

"जे घडलंय् तेच सांगतो आहोत." रामराव म्हणाला.

पैलवानाचा मूळचा लाल चेहरा अधिकच लालीलाल झाला. तो करड्या आवाजांत ओरडला, "मोहन्या, ऽऽ माझ्या नावाला बट्टा लावणाऱ्या दिवट्या×××-बाहेर ये !"

मोहन मुळीच न घाबरता आमच्या पुढ्यात येऊन उभा राहिला. त्याचा चेहरा निर्विकार होता.

पैलवान कडाडला, "मोहन्या, हे लोक काय म्हणताहेत ? तू मिर्झासाहेबांच्या बिबींची छेड काढलीस म्हणे ?"

शांतपणानं मोहन उत्तरला, "खरं आहे ते."

त्याच्या अंगावर धावून जात रंगा ओरडला, "लाज नाही वाटत 'खरं' आहे म्हणायला ?"

"अहो, पण आबा, माझं म्हणणं पुरतं ऐकून घ्याल की नाही ?"

"काय ऐकून घ्यायचं ×××–" रंगा पैलवान बिघडलेला पाहून मी मध्ये पडलो. "पैलवान, थोडं सबुरीनं घ्या. त्याचं म्हणणं काय आहे ते ऐकून घ्यायला आम्ही तयार आहोत." व मोहनकडं वळून मी म्हटलं, "सांग. काय म्हणणं आहे तुझं ?"

"पण हातच्या कांकणाला आरसा कशाला ? मी प्रत्यक्षच दाखवतो सारं !"

'आता हा काय दाखवणार ?' म्हणून स्तिमित होऊन आम्ही त्याच्याकडं पाहू लागलो.

त्यानं गॅलरीकडं जाणारा दरवाजा उघडला आणि आपल्या १४–१५ वर्षांच्या धाकट्या बहिणीला–मंजुळेला–हाक मारली. ती येताच त्यानं तिला जोरात म्हटलं, "मंजुळे, अग या चादरी बाहेर गॅलरीत नेऊन झटकून वाळत टाक बघू !"

आणि त्यानं आम्हांला हाताच्या इशाऱ्यानं जवळ बोलावून सांगितलं, "आता या

दाराआड उभे राहून प्रत्यक्षच पाहा सारं !"

आम्हांला काहीच उलगडा होईना.

भांबावलेल्या स्थितीत आम्ही त्याच्या सूचनेची अंमलबजावणी केली.

मंजुळा चादरी घेऊन बाहेर गॅलरीत गेली. तिने एक चादर जोरात झटकली मात्र त्या आवाजासरशी मिर्झासाहेबांची खिडकी उघडली. मिर्झा खिडकीजवळ उभा राहून मंजुळेकडं अधाशी नजरेनं पाहत होता. नंतर त्यानं शीळ घालीत केसांवरून हात फिरवला. हसत हसत हवेत हातवारेही केले.

मंजुळा आपलं काम संपवून आत येताच त्याची खिडकी बंद झाली !

मोहन म्हणाला, " आता तुम्हीच सांगा. त्या थेरड्याची ही थेरं मुकाट्यानं सहन करायची होती का ? आपल्याच गल्लीतला आहे–म्हातारा आहे म्हणून उलट मी त्याच्यावर दया केली–त्याच्या नीच कृत्याचं उत्तर सौम्य प्रमाणात दिलं. दुसरा कोणी असता, तर त्याला आधी मरेपर्यंत बदडला असता ! बोला, माझ्या जागी तुम्ही असता तर अशा वेळी दुसरं काय केलं असतंत ?"

–आता आम्ही काय बोलणार ? त्याच्याकडं 'आ' वासून पाहतच राहिलो. मात्र माझ्या कानांत मिर्झाचे सकाळचे शब्द जोरजोरानं प्रतिध्वनित होऊ लागले : '...बोभाटा केल्यानं माझीच बेअब्रू होईल !'... ●

# नाझींचे चिनी वारसदार

# ला ल र क्ष क

१९३० सालच्या जर्मनीमधून सुसाट वेगानं दौड मारणाऱ्या नाझींच्या-नंतरचा पहिलाच 'यासम हा' उठाव सध्या चीनमध्ये मूळ धरून आहे. फरक एवढाच की, अॅडॉल्फ हिटलरऐवजी ही मंडळी माओ-त्से-तुंग यांच्या नावानं कुंकू लावताहेत नि फॅसिझमऐवजी यांच्या-जवळची निशाणं मार्क्स-लेनिनवादाचा पुरस्कार करताहेत.

ऐन विशीतल्या तरुण-तरुणींनी सज-लेल्या ह्या लालरक्षकांच्या टोळ्या चीनच्या लोकराज्यातून धूमधाम माज-वताहेत. घरांची लूटमार अन् दुकानं नि कारखान्यांची नासधूस, बुद्धाच्या प्रति-मांची तोडफोड नि देवळांची नि पुस्त-कांची जाळपोळ ही तर सलामीची लढत ... यानंतरची छुप्या न्यायालयात



'माओचे कुंकू लावणाऱ्यांची प्रत्येक कृती योग्य आणि योग्यच होती'

—लिन पियाओ

होणारी पापभीरू सामान्य जनतेची ससेहोलपट आणि त्यांचे केले जाणारे छळ हे वेगळेच !

चीनमध्ये हाती आलेल्या काही बातम्यांवरून असं वाटू लागलं होतं, की लालरक्षकांचा उन्माद ओसरू लागला आहे; परंतु नुकत्याच घडलेल्या घटनांवरून लालरक्षक हे अजूनही धुमाकूळ घालीत आहेत, हे सिद्ध होतं.

पेकिंगमध्ये झालेल्या गतवर्षीच्या क्रांतिवाढदिवस समारंभात मात्र एकाही वेळी लालरक्षकांचा आवाज ऐकू आला नव्हता. लालरक्षकांसंबंधीच्या बातम्याही क्वचितच ऐकू येऊ लागल्या होत्या. काही दिवसांपूर्वीची ही लालरक्षकांची भयाण शांतता म्हणजे नुकत्याच चीनमधील भारतीय दूतावासात नि विमानतळावर झालेल्या लालरक्षकांच्या विध्वंसक कारवायांची नांदीच होती, हे विसरून चालणार नाही.

मुख्यत:, रशियन वृत्तपत्रांनी दिलेल्या तपशीलवार वृत्तविशेषांवरून लालरक्षकांच्या कारवायांचं एक किळसवाणं चित्र उभं राहतं.

' शांघायमध्ये तुफान उधळणाऱ्या उन्मत्त लालरक्षकांनी दिवंगत नेत्याची विधवा पत्नी मादाम सन्-यत-सेन यांच्या घराची कसून झडती घेतली. वास्तविक मादाम सन्-यत-सेन या आज अनेक वर्षांपासून माओ-से-तुंग यांच्या पाठीराख्या आहेत.

ह्याच घरातल्या एका खोलीत माओच्या प्रतिमेला तडा गेलेला लालरक्षकांना आढळला. त्यामुळे चिडून जाऊन त्या खोलीत काम करणाऱ्या एका नोकराला

लालरक्षकांनी बेदम झोडून काढले. एवढेच नव्हे तर काठ्या, रायफलींचे दस्ते, खुर्च्या-टेबलं आणि प्रसंगी वायर्सचा उपयोग त्यांनी लोकांना मारण्यासाठी केला. अशाच एका नोकराला रात्रभर बेदम मारल्यामुळे तो बेशुद्ध पडला. तेव्हा तो उठून उभा राहावा म्हणून त्याच्या अंगावर थंडगार पाणी ओतण्यात आले. परिणामी तो नोकर जिवाला मुकला ! '

' प्रावदा ' नं दिलेला हा आँखो देखा हाल...

मात्र चिनी कम्युनिस्ट सरकारचा अग्रणी, मार्शल लिन् पियाओ यानं लालरक्षकांना त्यांनी चालविलेल्या ह्या साफसफाईबद्दल धन्यवाद दिले असून त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. पेकिंगमध्ये भरलेल्या एका संमेलनात तो म्हणाला, " लालरक्षकांनी अत्यंत उत्तम यश संपादन केलं आहे. त्यांची प्रत्येक कृती ही फक्त योग्य आणि योग्यच होती यात संशय नाही. "

इतर सर्व परदेशी प्रवाशांना पेकिंग आणि कॅन्टनमध्येच स्थानबद्ध करण्यात आले असताना एका तरुणाला चिनी अधिकाऱ्यांच्या नजरचुकीने मध्य चीनमध्ये प्रवास करण्याची संधी मिळाली. यांग-त्सी नदीपासून हूपेह राज्याच्या वुहान ह्या राजधानीपर्यंतच्या प्रवासवर्णनात तो म्हणतो :

' वुहान नि लगतच्या खेडेविभागातून लालरक्षकांनी अनेक लोकांना रस्त्यातून फरफटत नेलेलं मी बघितलं. त्यांपैकी अनेकांना लालरक्षक शहराबाहेर घेऊन जात. ही माणसं पुन्हा नजरेला पडत नव्हती. शहराबाहेरून परत येत ते फक्त लालरक्षक.'

आणखी एका युरोपियन माणसानं सांगितलेली ही हकीकत :

' तरुणांची एक भलीथोरली मिरवणूक पेकिंगच्या त्या रस्त्यामधून येताना मी बघितली. सगळ्यांच्या हातामध्ये काठ्या, लोखंडी कांबी, झाडांच्या फांद्या नि पट्टे होते. मिरवणुकीच्या मध्यभागी एका म्हातारीला चालवलं जात होतं. ती कशीबशी पावलं टाकीत होती. एखादं पाऊल चुकून ती पडली की, हे तरुण तिला लाथाबुक्क्यांनी बुकलीत होते. मिरवणूक चौकातून पुढे जात असताना तिथं तीन जमादार हजर होते. परंतु मिरवणुकीला कुठल्याही प्रकारचा अडथळा करण्यात आला नाही ! उलट मिरवणुकीला त्रास होऊ नये म्हणून या जमादारांनी चौकावरील इतर सर्व वाहतूक थांबविण्याची खबरदारी घेतली होती ! ...'

उत्तर कोरियासारख्या पाठीराख्या राष्ट्रांशी खटके उडून चीन एकाकी पडू लागला आहे, अशी जाणीव होताच बाहेरच्या जगानं या घटनांचा मागोवा घेत चीनसंबंधी तर्क करायला सुरुवात केली आहे. लालरक्षकांसंबंधी वक्तव्य करताना ' प्रावदा 'नं लिहिलं :

' ..लालरक्षक म्हणजे सुशिक्षित समाजाची अवहेलना करणारे नि चिनी सांस्कृतिक वारसा उद्ध्वस्त करणारे नतद्रष्ट तरुण आहेत...'

' इझ्वेस्तिया 'नं लिहिलं...

'...मार्क्स–लेनिनवादाला लागलेली शरमेची काळोखी म्हणजे हे लालरक्षक !'

डॉ. यूरी फ्रान्तसेव्ह या दार्शनिकानं लालरक्षकांनी चालविलेल्या या साफसफाई-बद्दल नाझी प्रचारतंत्राचा प्रमुख डॉ. गोबेल्स याचे उद्गार उद्धृत केले : " संस्कृती हा शब्द कानांवर पडला की, ताबडतोब माझे हात हत्यारावरील आपली पकड घट्ट करतात. "

चिनी इतिहासाचा एक पाश्चिमात्त्य अभ्यासू म्हणतो :

' लालरक्षक हे सबंध चीनमध्ये माओवादाचे धर्मातीत राज्य निर्माण करण्यासाठी कार्यमग्न झालेले मिशनरी सैन्य आहे. त्यांना विरोध करणं आत्मघात करण्याइतकंच भयंकर आहे. '

लालरक्षकांच्या ह्या धडकी भरणाऱ्या कृतीनं दोन गोष्टी साध्य होतात एक म्हणजे बुडणाऱ्याला काडीचा आधार म्हणून या कृतीनं बरंचसं उद्दिष्ट साध्य होतं आणि पुढे केव्हातरी मिळणाऱ्या मार्क्सवादी किंवा इतर स्वर्गीय सुखांपेक्षा आज आहे तेच सर्वस्व मानणाऱ्या चिनी धार्मिकतेवर एकाएकी वज्राघात करण्याचंही काम लालरक्षकांच्या दहशतीमुळे होतं, असा अनुभव आहे.

चिनी कम्युनिस्ट पार्टी आणि सरकारनं आपल्या पोतडीतून बाहेर काढलेले हे लालरक्षक म्हणजे चिनी सांस्कृतिक क्रांतीचे सैनिकच आहेत. आणि या सांस्कृतिक क्रांतीच्या सैनिकांनी मिळविलेले विजयही तितकेच स्वयंपूर्ण :

(१) लालरक्षकांच्या नावाखाली चीनमधील सर्व माध्यमिक शाळा नि विद्यापीठे सहा महिने उशीरा सुरू करण्यात आली. परिणाम : ज्यांच्या शैक्षणिक कर्तृत्वाची चीनला अत्यंत गरज आहे असे दीड कोटी विद्यार्थी सहा महिनेपर्यंत स्वस्थ बसून होते.

(२) चीनमधील सर्व परदेशी विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी शिक्षण स्थगित करण्याची आज्ञा देण्यात आली आणि पंधरा दिवसांच्या आत चीन सोडून जाण्याची त्यांच्यावर सक्ती करण्यात आली. हे बहुतेक विद्यार्थी आशिया व आफ्रिकेतून आले होते.

(३) संपूर्ण चीनमध्ये अनेक कारखान्यांतून कित्येक दिवसपर्यन्त कामे बंद करण्यात आली होती तर बऱ्याच मोठ्या शेती प्रकल्पांमधून लालरक्षकांनी निर्माण केलेल्या गोंधळामुळे अतिशय महत्त्वाचा हंगाम पुढे ढकलला गेला...


या साऱ्या नियोजित गोंधळाचं श्रेय मात्र तथाकथित सांस्कृतिक क्रांतीला आणि लालरक्षकांनाच द्यायला हवं !

— श्याम तारे

# व्हो ल्गा जे व्हा ला ल हो ते

**वि. स. वाळिंबे**

लिआँ ट्राटस्की लेनिनपेक्षा नऊ वर्षांनी लहान होता. लिओ हा एका ज्यू शेतकऱ्याचा मुलगा. लिआँचे वडील डेव्हिड लिआँटिएव्हिच ब्रोन्स्टेइन युक्रेनमधल्या खेर्सन प्रांताचे रहिवासी. १८७९ च्या उन्हाळ्यात ते यानोव्हका या गावी राहावयास गेले. कारण तेथील कर्नल यानोव्हस्की नावाच्या गृहस्थांचे मोठे शेत डेव्हिड ब्रोन्स्टेइन यांनी खरेदी केले होते. ब्रोन्स्टेइन यांनी हे स्थलांतर केले, तेव्हा त्यांची पत्नी गरोदर होती. ७ नोव्हेंबर रोजी ती प्रसूत झाली. (क्रांतिपूर्व काळातील रशियन कॅलेंडरप्रमाणे हा दिवस २६ ऑक्टोबर हा होता. कारण हे कॅलेंडर पश्चिम युरोपच्या एकोणिसाव्या शतकातील कॅलेंडरपेक्षा बारा दिवसांनी व विसाव्या शतकातील कॅलेंडरपेक्षा तेरा दिवसांनी मागे होते. जुन्या रशियन कॅलेंडरप्रमाणे २५ ऑक्टोबर रोजी क्रांती होऊन रशियात बोल्शेव्हिक पक्षाची स्थापना झाली. १ फेब्रुवारी १९१८ रोजी बोल्शेव्हिक रशियाने पश्चिम युरोपीय कॅलेंडरचा स्वीकार केला. त्या कॅलेंडरप्रमाणे ७ नोव्हेंबर हा क्रांती-दिन ठरला. यामुळेच ही क्रांती 'ऑक्टोबर क्रांती' म्हणून ओळखली जात असली, तरी तिचा वर्धापनदिन दरवर्षी ७ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो.) ब्रोन्स्टेइन कुटुंबाचे हे पाचवे अपत्य होते. त्यांच्या पहिल्या चार अपत्यांपैकी दोन अपत्ये, हे कुटुंब यानोव्हकाला येण्यापूर्वीच मरण पावली. पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी यांच्यासमवेत डेव्हिड ब्रोन्स्टेइन यानोव्हकाला राहावयास आले होते. यानोव्हका येथे जन्मास आलेल्या आपल्या या पाचव्या अपत्याचे नाव



७

त्यांनी ' लेव्ह ' असे ठेवले. ' लेव्ह ' म्हणजे नरसिंह. 'लेव्ह 'चे इंग्रजी रूपांतर लिअ हेच या मुलाच्या नावाशी कायमचे निगडित झाले. पुढे हा मुलगा भूमिगत चळवळीत दाखल झाला तेव्हा त्याने ब्रोन्स्टेइन हे आपले आडनाव टाकून देऊन ट्रॉटस्की हे टोपण नाव स्वीकारले. त्यामुळे लेव्ह डेव्हिडोव्हिच ब्रोन्स्टेइन ' लिऑं ट्रॉटस्की ' या नावाने इतिहासाला परिचित झाला.

यानोव्हका हे एका बाजूला पडलेले अगदी छोटे खेडेगाव होते. जवळची टपाल कचेरी पंधरा मैल दूर तर लोहमार्ग बावीस मैल अंतरावरून जात होता. त्यामुळे गावाचा बाहेरच्या जगाशी फारसा संबंध येत नसे. येथे एकही वर्तमानपत्र येत नसे. गावात कधीकाळी तारवाला यावयाचा तो कोणातरी गावकऱ्याच्या आप्तेष्टाच्या निधनाची वार्ता घेऊन ! तारवाल्याकडून येणाऱ्या बातमीव्यतिरिक्त यानोव्हका गावाचा इतर बातम्यांशी कधीच संबंध येत नसे. यानोव्हकामधले शेतकरी गहू पिकवीत व शेजारच्या वस्तीवर जाऊन विकीत. तेथला शेतकरीवर्ग खेर्सन प्रांतातल्या इतर ज्यू शेतकऱ्यांप्रमाणेच दरिद्री व निरक्षर होता. ट्रॉटस्कीच्या वडिलांनी तर वयाच्या साठाव्या वर्षी शिकावयास प्रारंभ केला. आश्चर्याची गोष्ट अशी की त्याच्या आईस मात्र वाचावयास येत होते. डेव्हिड ब्रोन्स्टेइन निरक्षर असले तरी शेतीच्या कामात अतिशय वाकबगार होते. शिवाय कष्ट करण्यात त्यांचा हात धरण्याची कोणाचीच हिंमत नव्हती. त्यामुळे अल्पावधीतच यानोव्हका गावातील

अडीचशे एकर जमीन त्यांच्या मालकीची झाली. याशिवाय चारशे एकर शेती त्यांनी खंडाने घेतली होती ती वेगळीच ! त्यामुळे यानोव्हका गावात ब्रोन्स्टेइन यांना चांगली प्रतिष्ठा लाभली होती.

डेव्हिड ब्रोन्स्टेइन स्वतः निरक्षर असले तरी आपल्या मुलांनी खूप शिकावे, अशी त्यांची इच्छा होती; परंतु ते आणि त्यांची पत्नी सदैव शेतीच्या कामांत गुंतलेली असावयाची. त्यामुळे मुलांच्या प्रगतीकडे त्यांना फारसे लक्ष देता येत नव्हते. लिऑंचा मोठा भाऊ साशा आणि बहीण लिझा यांनीच त्याला अक्षरओळख करून दिली. साशा आणि लिझा अभ्यासाला बसले की, ते लिऑंला आणि सर्वांत छोटया ओलगाला पाटी घेऊन बोलावीत व अंकलिपी शिकवीत. लिऑं ट्रॉटस्कीस लहानपणापासूनच खेळांची आवड नव्हती. वाचन आणि लेखन हेच त्याचे आवडते छंद होते. या आवडीपायीच त्याने यानोव्हकामधील मित्रांच्या मदतीने एक हस्तलिखित मासिक सुरू केले. या मासिकासाठी तो स्वतः कविताही करी. लेखनाच्या आवडीमुळेच त्याने क्रांतिकारक चळवळीच्या प्रारंभीच्या काळात आपले सारे लिखाण 'पेरो' (लेखणी) या टोपण नावाने लिहिले.

यानोव्हकासारख्या खेड्यात राहत असताना 'अरेबियन नाईट्स' हे पुस्तक हाती पडले तेव्हा लिऑंला कमालीचा आनंद झाला. हे पुस्तक वाचत असताना बाहेरचे जग किती सुंदर आहे असे त्याला पदोपदी वाटे. 'अरेबियन नाईट्स'नंतर हाती येईल ती कादंबरी तो वाचू लागला. खेड्यात भोवताली दिसणारे क्रूर जग आणि कथा-कादंबऱ्यांत आढळणारे सुसंस्कृत जग यांची तुलना करण्याचा त्याच्या मनाला छंदच जडला. आजूबाजूची भाषा रुक्ष आणि रांगडी होती तर कथा-कादंबऱ्यांत प्रगल्भ आणि काव्यात्म भाषा वाचावयास मिळे. भोवतालचे जग आणि वाङ्मयीन जग इतके भिन्न, नव्हे अगदी परस्परविरोधी का असावे असा, त्याला प्रश्न पडे. परंतु जसजसे वय वाढू लागले तसतसे या दोन जगांचे नाते त्याला समजून येऊ लागले. भोवतालच्या कर्कश जगाचा कंटाळा आला की लिऑं आपल्या आवडत्या पुस्तकांच्या सृष्टीकडे धाव घेई.

त्याने असे लिहिले आहे—'तरुणपणी मला आजूबाजूला दिसणाऱ्या निसर्गापेक्षा आणि व्यक्तींपेक्षा पुस्तकांचे आणि विचारधनाचे विशेष आकर्षण होते. 'लेखक' हा साधा शब्द उच्चारतानाही माझे मन मोहरून जाई. जगाकडे वेगळ्या आणि वरच्या पातळीवरून पाहणारी व्यक्ती म्हणून मला लेखकांसंबंधी आदर वाटे. शब्दांची दुनिया मला जवळची, आपलीशी वाटत असे. लेखक, पत्रकार, कलावंत यांच्या जगाशी आपले नाते आहे, अशी माझ्या मनाची प्रारंभापासून धारणा होती.

ट्रॉटस्कीस स्टॅलिनने रशियातून हद्दपार केल्यानंतर प्रिंकिपो येथील वास्तव्यात त्याने आत्मचरित्र लिहिले. वरचा परिच्छेद त्याच्या आत्मचरित्रातीलच आहे. आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत तो लिहितो :—'नवनव्या कल्पनांना आणि विचारांना जन्म

देणारी पुस्तके आणि हे विचार वा कल्पना शब्दरूप करणारी लेखणी यांनी मानवी जीवन संपन्न केले आहे. मानवी संस्कृतीची सर्वांत मोठी व मौलिक देणगी कोणती असे जर मला कोणी विचारले तर मी ग्रंथनिर्मितीचा उल्लेख करीन. अभ्यास करण्याची, खूप वाचण्याची हौस माझ्यापासून कधीच दूर गेली नाही. परंतु कधीकधी असे वाटे, की आपण निष्कारण या क्रांतिकारी चळवळीत भाग घेत आहोत. कारण या कार्यामुळे आपल्याला हवे तेवढे वाचता येत नाही, लिहिता येत नाही. पुस्तके आणि लेखणी यांचे व माझे नाते जिव्हाळ्याचे आहे.'

ट्रॉटस्कीला मृत्यू आला तेव्हाही त्याच्या हातात लेखणीच होती.

लेखन-वाचनाप्रमाणेच ट्रॉटस्कीला नाटकांचीही आवड होती. शालेय शिक्षणासाठी तो ओडेसा येथे राहावयास गेला तेव्हा तेथे त्याला खूप नाटके पाहता आली. या कालखंडाबद्दल लिहिताना ट्रॉटस्की म्हणतो, 'मी नाटकांशी इतका एकरूप होत असे की नाटक पाहताना मला कशाचेच भान राहत नसे. नाटक पाहताना माझ्या आनंदाला अक्षरशः सीमा राहत नसे. लहानपणी मी जेव्हा नाटकांना जाई तेव्हा मध्यंतराच्या वेळीही खुर्ची सोडून बाहेर जात नव्हतो. न जाणो! बाहेरून यायला वेळ लागायचा आणि नाटकाचा एखादा प्रवेश तोपर्यंत होऊन गेला असायचा, अशी मला धास्ती वाटे.' आपण नाटक बसवावे, असेही त्याला वाटे. ओडेसाला असताना त्याने आपल्या एका मित्राच्या मदतीने पुश्किनचे 'दि निगर्डली नाईट' हे नाटक बसविण्याचे ठरविले. परंतु तो मित्र आजारी पडल्यामुळे तो बेत तसाच राहिला. नाटक बसविण्याप्रमाणे नाटक लिहावे हा विचारही त्याच्या मनात बळावत होता. दुसऱ्या एका मित्राच्या मदतीने त्याने नाटक लिहिण्याची तयारी केली. परंतु हा विचारही कागदावर उतरू शकला नाही. ओडेसा येथील वास्तव्यात ट्रॉटस्कीला इटालियन ऑपेराची विशेष गोडी लागली. ऑपेरा पाहण्यासाठी आपल्याजवळ पुरेसे पैसे असावेत म्हणून तो शिकवण्या करीत असे. लहानपणी निर्माण झालेली नाटकाची गोडी आयुष्याच्या अखेरीपर्यंत कायम होती. ट्रॉटस्कीच्या वेशभूषेत नीटसपणा असावयाचा, त्याच्या वक्तृत्वात आर्जव असावयाचे. ही सारी वैशिष्ट्ये त्याच्या नाट्यप्रेमातून निर्माण झाली आहेत. रशियन समाजवादी चळवळीत भाग घेतलेल्या इतर कोणत्याही लेखकापेक्षा ट्रॉटस्कीची लेखणी शैलीदार होती आणि इतर कोणत्याही कार्यकर्त्यापेक्षा जीवनाला नाट्यमयता प्राप्त करून देण्याचे त्याचे सामर्थ्य अद्वितीय होते, याचे कारण साहित्यावरचे आणि विशेषतः नाटकांवरचे त्यांचे अभिजात प्रेम!

लिऑं ट्रॉटस्की वयाच्या सातव्या वर्षी शाळेत जाऊ लागला. यानोव्हका येथे शाळा नसल्यामुळे तो अडीच मैलांवरील ग्रोमोकर्स या गावी आपल्या आत्याकडे राहावयास गेला. शनिवार-रविवारी तो आपल्या आईवडिलांकडे येत असे. ग्रोमोकर्स येथील शाळेत लिऑंने अंकगणित, रशियन भाषा व बायबल यांचा अभ्यास

केला. ग्रोमोकर्सच्या शाळेतले सर्व ज्यू विद्यार्थी यिडीश भाषा बोलत असत. त्यामुळे लिआँस त्यांचे बोलणे मुळीच कळत नसे. तो स्वत: ज्यू असला तरी त्याला या भाषेचा परिचय नव्हता हे पाहून इतर विद्यार्थ्यांना आश्चर्य वाटे. त्याच्या घरीदारी युक्रेनियन भाषाच बोलली जात असे. ख्रिश्चन समाज ज्यूंना खालच्या वर्गातले मानतो, याची पहिली जाणीव ग्रोमकर्स येथे शिकत असताना झाली, असे ट्रॉटस्कीने लिहिले आहे. ग्रोमोकर्स गावातल्या एका बाजूला श्रीमंत जर्मन शेतकऱ्यांची वस्ती होती तर दुसऱ्या बाजूच्या झोपडपट्टीत दरिद्री ज्यू समाज राहत होता. ग्रोमोकर्स येथील वास्तव्यात पाहिलेल्या एका घटनेचाही त्याच्या मनावर परिणाम झाल्याचे त्याने लिहून ठेवले आहे. त्या काळात अशी चाल होती की, बदफैली तरुणीची रस्त्यावरून धिंड काढण्यात येई व इतर गावकरी अभद्र शिव्याशापांचा गजर करीत त्या तरुणीवर थुंकत असत. इतकेच नव्हे तर अशा तरुणीच्या आप्तेष्टांना दूर सैबेरियात धाडण्यात येई. लहान वयातही ट्रॉटस्कीला या प्रथेचा उबग वाटत असे. ग्रोमोकर्स येथे तो वर्षभरच राहिला. त्यानंतर १८८८ च्या उन्हाळचात लिआँ पुढील शिक्षणासाठी ओडेसा या शहरात राहावयास गेला. लिआँ ओडेसाला जाण्यासाठी निघाला तेव्हा त्याची आई व बहिणी खूप रडल्या. लिआँला यानोव्हका गावासंबंधी ममत्व वाटत नव्हते. परंतु ते गाव सोडताना मात्र त्याच्याही डोळचांत अश्रू उभे राहिले. बैलगाडी यानोव्हका सोडून ओडेसाच्या रस्त्याला लागेपर्यंत तोही मुसमुसत होता. मग मात्र त्याने आपले रडे आवरले. ओडेसासारख्या मोठचा शहरात शिकण्यासाठी जायचे असेल तर असे रडून भागणार नाही, याची त्याला यानोव्हकाचा परिसर सोडताच एकदम जाण आली.

यानोव्हका आणि ग्रोमोकर्स ही खेडेगावं उदासवाणी होती. त्यांच्या तुलनेने ओडेसा शहर सदैव गजबजलेले असे. ते बंदर असल्यामुळे तेथे बहुरंगी वस्ती होती. काळचा समुद्राच्या किनाऱ्यावर उभ्या असलेल्या या शहरामध्ये व्यापाराच्या मिषाने जर्मन, इटालियन, फ्रेंच, ब्रिटिश, अमेरिकन, तुर्की, सिरियन, इराणी असे कितीतरी निरनिराळचा देशांचे लोक राहत होते. अर्थात् तेथेही ज्यू समाज हाच बहुसंख्य होता. ओडेसाच्या एकंदर लोकवस्तीपैकी तीस टक्के वस्ती ज्यूंची होती. परंतु शाळांमध्ये पाच-दहा टक्क्यांपेक्षा अधिक ज्यू विद्यार्थी घेतले जाता कामा नयेत, असा नियम होता. त्यामुळे नऊ वर्षांच्या या ज्यू मुलाला शाळेत प्रवेश मिळणे तितकेसे सोपे नव्हते. लिआँ आपल्या वडिलांच्या ओळखीच्या श्पेंटसर कुटुंबाकडे राहू लागला. श्पेंटसर यांनी त्याला जर्मन लोकांनी चालविलेल्या शाळेत घातले. ही शाळा ओडेसामधील नामवंत शाळांपैकी नव्हती. एकतर चांगल्या शाळेत लिआँस ज्यू असल्यामुळे प्रवेश मिळणे कठिण होते. शिवाय मागासलेल्या ज्यू मुलांच्या दृष्टीने हीच शाळा योग्य आहे असे श्पेंटसर यांचे मत होते. शाळेत जाऊ लागल्यानंतर लिआँला भाषेप्रमाणेच गणिताचीही गोडी वाटू लागली. आपण पुढे गणितज्ञ व्हावे, असे त्याला त्या वेळी

वाटावयाचे. त्याच्या वडिलांना मात्र आपल्या मुलाने इंजिनियर व्हावे असे वाटत होते. रशियन लोक ज्यू समाजास कसे वागवितात याचा लिआँला या काळात वारंवार अनुभव येऊ लागला. विशेषत:, तिसऱ्या अॅलेक्झांडरच्या काळात (१८८१–१८९४) तर रशियन अधिकाऱ्यांनी ज्यू नागरिकांचा मनसोक्त छळ सुरू केला होता. परंतु या परिस्थितीकडे लक्ष न देता आपण आपला अभ्यास झटून करावयाचा असे लिआँने ठरविले. आपण आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या बळावर उच्च शिक्षण प्राप्त करू शकू असा त्याचा विश्वास होता. अधूनमधून तो यानोव्हकास जाई तेव्हा ज्यू समाजास मिळणाऱ्या वागणुकीविषयी त्याची व वडिलांची चर्चा होई. त्याचे वडील म्हणत, " लिआँ, आणखी तीनशे वर्षांनंतर तरी ज्यूंचा छळ थांबणार आहे की नाही, कुणास ठाऊक !"

ओडेसा येथे शालेय शिक्षण घेत असतानाही ट्रॉटस्की हा खेळात कधीच भाग घेत नसे. ओडेसा हे शहर असल्यामुळे वरीचशी मुले सुटीच्या दिवशी पोहावयास किंवा मासे पकडण्यासाठी समुद्रावर जात असत. परंतु सागराचे आकर्षण ट्रॉटस्कीच्या स्वभावास कधीच मोहीत करू शकले नाही. शालेय जीवनात त्याची एकच महत्त्वाकांक्षा होती, आपण वर्गात पहिले यावे. आपल्या अभ्यासाच्या बळावर शिक्षकांना चकित करावे. आपल्याला चांगलें बोलता यावे, चांगले लिहिता यावे हाच त्याचा ध्यास होता. रशियन भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी व आपली भाषा शैलीदार करण्यासाठी त्याने या काळात वाचनाचा तडाखाच लावला होता. शाळेतले त्याचे निबंध वाचून शिक्षक त्याच्या हुशारीचे कौतुक करीत. लिआँ वरच्या इयत्तांमधील पुस्तके अगोदरच वाचून काढी व त्या आधारे आपल्या शिक्षकांना प्रश्न विचारून बुचकळ्यात टाकीत असे. तो ज्यांच्याकडे राहत असे ते श्पेंटसर हेही व्यासंगी गृहस्थ होते. सुटीच्या दिवशी त्यांच्याकडे मित्रपरिवार गोळा होई व नानाविध विषयांवर गप्पाष्टके होत. लिआँ ही चर्चा मोठ्या उत्सुकतेने ऐकत असे. तो आपल्या मित्रांशी बोलताना निरनिराळ्या ग्रंथांतले इतके संदर्भ देई की 'तू सारं हे केव्हा वाचलंस ?' असा ते त्याला प्रश्न विचारीत. प्रारंभापासून शब्दसृष्टीविषयी त्यास आत्मीयता वाटत असल्यामुळे संस्कारित आणि प्रगल्भ वाक्प्रचार वापरण्यावर त्याचा भर असे.

श्पेंटसर यांनी याच सुमारास आपली स्वत:ची प्रकाशन संस्था उभी केली. हस्तलिखिताचे मुद्रित मजकुरांत रूपांतर होताना जे संस्कार घडत ते पाहण्यात ट्रॉटस्की गढून गेलेला असावयाचा. टाइप, मेकअप्, ले–आऊट्, पेजिंग या शब्दांशी त्याचा याच काळात परिचय झाला. श्पेंटसर यांच्या छापखान्यातील मुद्रिते तपासण्याचे काम ट्रॉटस्की मोठ्या आवडीने करू लागला. तो तासन् तास छापखान्यात बसलेला असावयाचा. या आवडीमुळेच यादवी युद्धाच्या काळात आगगाडीत छापखाना उभारून आघाडीवरच्या सैनिकांसाठी वार्तापत्रे प्रसिद्ध करण्याची जबाबदारी त्याने मोठ्या उत्साहाने पार पाडली. आयुष्याच्या अखेरच्या कालखंडात तो मेक्सिको

येथे राहत असताना त्याच्याभोवती बरेच मदतनीस होते. तरीही आपल्या लेखांची व पुस्तकांची मुद्रितें स्वतःच तपासण्याचा त्याला कधी कंटाळा आला नाही.

शाळेतील नियमित अभ्यास, श्पेंटसर यांच्या घरचे सांस्कृतिक वातावरण आणि फावल्या वेळातील दांडगे वाचन या तीन गोष्टींनी ट्रॉटस्कीचे तरुण मन घडविले. तो ज्या शाळेत जात होता तेथला कोणताच शिक्षक त्याला प्रभावित करू शकला नाही. त्याचप्रमाणे शालेय जीवनात आपल्या मनःप्रवृत्तीशी ज्याचे जुळेल असा जिवाभावाचा मित्रही त्याला लाभू शकला नाही. शालेय जगात वावरतानाही त्याचे स्वतःचें वेगळेच मनोविश्व आकार घेत होते. मित्रांपेक्षा पुस्तकांनीच माझ्या आयुष्यात मला साथ दिली आहे, असे तो नेहमी म्हणे.

ट्रॉटस्कीला उत्साह वाटावा तसे शालेय जीवनात काहीही घडत नव्हते, तरीही तो शिक्षकांनी नेमून दिलेला अभ्यास मनापासून करीत असे. शाळेत वेळेवर जाणे, गृहपाठ वेळच्या वेळी पुरे करणे, शिक्षकांच्या शिकवण्याकडे लक्ष देणे, त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तत्काळ उत्तरे देणे, हे विद्यार्थी जीवनाचे नियम तो कटाक्षाने पाळत असे. शिक्षक रस्त्यात भेटले तर तो त्यांना मान लववून वंदन करीत असे. असा हा आज्ञाधारक आणि शिस्तप्रिय मुलगा आपली काही वर्षांच्या आतच क्रांतीची पताका हाती धरून, प्रस्थापित राज्यसत्तेविरुद्ध बंडाचा पुकारा करील असे त्या वेळी कोणाच्याही स्वप्नात आले नाही. स्वतः ट्रॉटस्कीलाही आपले भावी जीवन एकदम वेगळ्याच मार्गाने धावू लागेल, याची त्या वेळी मुळीच कल्पना नव्हती.

ट्रॉटस्कीच्या या संथ आणि नियमित शालेय जीवनात व्यत्यय यावा अशी एक घटना याच सुमारास घडली. त्याच्या शाळेतले बर्नान्द नावाचे फ्रेंच शिक्षक विद्यार्थ्यांच्या मागासलेपणाबद्दल कुचेष्टा करीत. वेकर या जर्मन मुलावर तर बर्नान्द यांच्या टीकेचा विशेष रोख. हा वेकर ट्रॉटस्कीचा काही मित्र नव्हता. परंतु एका शिक्षकाने विद्यार्थ्यांची कुचेष्टा करावी हा प्रकार त्याला पसंत नव्हता. बर्नान्द यांची जीभ हळूहळू सैल सुटू लागली तेव्हा काही वात्रट विद्यार्थ्यांनी त्यांना धडा शिकविण्याचे ठरविले. त्यानुसार एके दिवशी बर्नान्द वर्गातून बाहेर पडू लागताच हे विद्यार्थी घुमू लागले. या प्रकाराने बर्नान्द भलतेच भडकले. पण सर्वच विद्यार्थ्यांची तोंडे बंद असल्यामुळे या प्रकारात नेमक्या कोणत्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला हे त्यांना कळू शकले नाही. त्यांनी साऱ्या वर्गाविरुद्धच मुख्याध्यापकांकडे तक्रार केली. मुख्याध्यापकांनी शाळा सुटल्यानंतर दहा–बारा विद्यार्थ्यांना चौकशीसाठी आपल्या खोलीवर बोलावले. वेकरही त्यात होता. भेदरलेल्या वेकरने ट्रॉटस्कीनेच आपल्याला ही युक्ती सुचविली असे खोटेनाटे सांगितले. दुसऱ्या एका विद्यार्थ्याने तर वेकरवरही मात केली. त्याने अशी बातमी सांगितली की बर्नान्द यांच्यासारख्या असभ्य शिक्षकाला काढून टाकावे असा शाळा-तपासनीसांकडे अर्ज धाडण्याचा ट्रॉटस्कीचा

विचार आहे. ट्रॉटस्कीच्या अभ्यासू वृत्तीमुळे या टवाळखोर मुलांचा त्याच्यावर दात होता व म्हणून त्यांनी आपली सुटका होण्यासाठी झाल्या प्रकाराचे खापर ट्रॉट-स्कीच्या माथ्यावर मारले. ही गोष्ट श्पेंटसर यांना कळली तेव्हा ते मुख्याध्यापकां-कडे आले व म्हणाले, "लिआँ माझ्या घरी राहतो. त्याचा स्वभाव मला चांगला माहीत आहे. तो असले कृत्य कधीही करणार नाही याची मी खात्री देतो." परंतु श्पेंटसर यांच्या शब्दांवर विश्वास ठेवण्यास मुख्याध्यापक तयार नव्हते. एका ज्यू मुलाने हा गुन्हा केला आहे एवढी तक्रार त्यांच्या दृष्टीने पुरेशी होती. त्यांनी ट्रॉटस्कीला शाळेतून वर्षभर बडतर्फ केले. खिन्न मनाने श्पेंटसर घरी आले व त्यांनी मुख्यध्यापकांचा निर्णय ट्रॉटस्कीला सांगितला. ते ऐकून ट्रॉटस्की इतका प्रक्षुब्ध झाला की त्यामुळे तो आता घेरी येऊन खाली पडतो की काय अशी श्पेंटसर यांना भीती वाटली. बरं, ही गोष्ट डेव्हिड ब्रोन्स्टेइन यांना कशी कळवावयाची हाही श्पेंटसर यांच्यापुढला अवघड प्रश्न होता.

ट्रॉटस्की काही दिवस ओडेसालाच राहिला. नंतर तो आपल्या एका मित्राच्या गावी राहावयास गेला. मधल्या काळात त्याच्या थोरल्या बहिणीमार्फत श्पेंटसर यांनी ही बातमी डेव्हिड ब्रोन्स्टेइन यांना कळविली. काही दिवसांनंतर ट्रॉटस्की यानोव्हकाला घरी परतला. परंतु पहिले तीन दिवस कोणीच त्याच्याशी बोलेना. आईवडिलांचे हे वर्तन त्याला असह्य होत होते. एवढचात काय चमत्कार झाला कोणास ठाऊक! एके दिवशी डेव्हिड ब्रोन्स्टेइन शेतावरून घरी परतले ते जोरा-जोराने हसतच. घरात पाऊल ठेवताच त्यांनी विचारले, "लिआँ, तू वर्गांत जशी शिट्टी वाजवलीस तशी मला वाजवून दाखव पाहू, ही अशी का रे? दोन बोट तोंडात घालून ?" रडवेला लिआँ सांगू लागला, "मी खरंच सांगतो, मी मास्तरांची चेष्टा केली नाही." ट्रॉटस्कीची आईही रडू लागली, तसे वडील आणखी मोठचाने हसू लागले. ते म्हणाले, "जाऊ द्या. आपण लिआँसाठी येथे शिकवणी सुरू करू म्हणजे त्याचे वर्ष बुडणार नाही."

वर्षानंतर लिआँने आपल्या जुन्या वर्गात पुन्हा प्रवेश केला. यानोव्हका येथे राहत असताना त्याने मन लावून अभ्यास केला असल्यामुळे त्याला परीक्षेत चांगले गुण मिळाले व त्याचे नियमित शालेय जीवन पूर्ववत सुरू झाले.

या प्रकारासंबंधी लिआँ ट्रॉटस्की लिहितो–"मी वर्गात पुन्हा प्रवेश केला तेव्हा मला तीनही प्रकारचे विद्यार्थी आढळले. एक गट असा होता की ज्यांनी जाणून-बुजून माझा विश्वासघात केला होता. दुसरा गट असा होता की, मी निर्दोष आहे अशी त्यांची खात्री होती व त्याप्रमाणे त्यांनी बोलूनही दाखविले. ज्यांना काहीच मत नव्हते असे विद्यार्थी तिसऱ्या गटांतील होते. आपल्याला आयुष्यात कोणत्या तऱ्हेची माणसे भेटतात याचा मला आलेला हा पहिला अनुभव होता. माझ्यापुढच्या राजकीय जीवनात मला अशीच तीन तऱ्हेची माणसे भेटली. ती मला वारंवार

भेटत होती. प्रत्येक वेळी परिस्थिती निराळी होती एवढेच !"

शाळेतल्या बडतर्फीच्या अपमानापेक्षा अन्यायाने आपल्याला शिक्षा करण्यात आली ही गोष्ट ट्रॉटस्कीला विशेष बोचत होती. लहानपणापासूनच त्याला अन्यायाविरुद्ध चीड असे. बालपणातले यानोव्हका येथील अनुभव, ओडेसा येथील वास्तव्यात श्पेंटसरसारख्या उदारमतवाद्याने केलेली त्याच्या मनाची मशागत व रशियन कादंबरीकारांनी आपल्या साहित्यात निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने तत्कालीन जीवनावर केलेले विदारक भाष्य यामुळे ट्रॉटस्कीच्या मनातील अन्यायाविरुद्धची चीड अधिकच प्रज्वलित झाली. यानोव्हका येथील शेतमजूर छोट्या ट्रॉटस्कीला आपल्या हालअपेष्टांची कहाणी सांगत तेव्हा तो अस्वस्थ होई. एकदा तर एक स्त्री एक रुबल मजुरीसाठी त्याच्या वडिलांची वाट पाहत घराच्या दारापाशी सकाळपासून संध्याकाळपर्यंत बसून होती. ट्रॉटस्कीचे वडील शेतमजुरांबाबत मुळीच दयामया दाखवीत नसत. एकदा शेजाऱ्याची गाय डेव्हिड ब्रोन्स्टेइन यांच्या शेतात शिरताच त्यांनी ती अडकवून ठेवली. ती परत देण्याविषयी गायीचा दीनवाणा मालक आपल्या वडिलांची किती विनवणी करीत होता हेही ट्रॉटस्कीने पाहिले होते. ओझेवाल्याला पुरेशी हमाली दिली नाही म्हणून तो आपल्या वडिलांना शिव्या देत गेल्याचे दृश्य त्याच्या स्मरणात होते. घोडे तबेल्यात वेळेवर परत आणले नाहीत म्हणून नोकराच्या पाठीवर काठीचे तडाखे हाणणारा मालक पाहताच ट्रॉटस्कीच्या शेजारी उभे असलेले श्पेंटसर दातावर दात रोवत चिडून म्हणाले होते, "किती लाजिरवाणं दृश्य आहे हे ! "

भोवतालची ही असली 'लाजिरवाणी दृश्ये' पाहून लिआँ ट्रॉटस्की संतप्त होई. त्याला वाटायचे, पश्चिम युरोप किंवा अमेरिका येथे असले अमानुष प्रकार घडत नसावेत. पाश्चिमात्त्य जगातील आधुनिक संस्कृतीचे लोकशाहीचे प्रचारविचार स्वातंत्र्याचे काल्पनिक सुखद चित्र त्याच्या डोळ्यांपुढे उभे राहत असे. पाश्चिमात्य जगासंबंधीचे हे ज्ञान यानोव्हकासारख्या खेड्यात जन्मलेल्या या मुलाने तिकडील पुस्तके वाचून संपादन केले होते. नकळत लिआँ युरोपीय संस्कृतीकडे व बुद्धिवादाकडे झुकत होता; परंतु कालांतराने त्याला जेव्हा हे कळून आले. की पश्चिम युरोपमध्येही धर्मसत्तेचा प्रभाव दांडगा आहे. आणि अमेरिकेत तर नीग्रोंना अमानुष रीतीने वागविण्यात येते. तेव्हा त्याला चांगलाच धक्का बसला. कारणं अन्यायाप्रमाणेच ट्रॉटस्कीला अंधश्रद्धेचाही तिटकारा होता. अंधश्रद्धेविषयीच्या तिटकाऱ्यातूनच तो अखेरीला क्रांतिकारी चळवळीकडे खेचला गेला. ट्रॉटस्कीच्या साऱ्या लिखाणात एकच सूत्र दिसून येते. त्याने सतत बुद्धिवादाची कास धरली होती.

लेनिनच्या आणि ट्रॉटस्कीच्या स्वभावरचनेत हाच मूलभूत फरक होता ! सत्ता हस्तगत करणें हे लेनिनचे ध्येय होते, आणि या ध्येयासाठी कोणताही मार्ग

त्याला उचित वाटत होता. याउलट आपल्या बुद्धीला जे पटेल तेच केवळ प्रतिपादन करण्यावर ट्रॉटस्कीचा भर असे. जागतिक क्रांतीचा आपला आग्रह बरोबर आहे, असे एकदा त्याला पटल्यानंतर त्याने तेच मत १९०५ पासून १९४० मध्ये खून होईपर्यंत आपल्या हृदयाशी जपले. लेनिनला पुढचे पाऊल कोठे टाकावे हे अचूक समजत होते. ट्रॉटस्कीची नजर दूरवरच्या ध्येयावर खिळलेली असावयाची. तो नेहमी म्हणायचा, ' अंतिम राजकीय उद्दिष्ट निश्चित केल्याशिवाय राजकारणात भाग घेणे निदान मला तरी जमणार नाही. ' त्याच्या समाजवादातही बुद्धिवादावर भर असे. आपल्या सदसद्विवेक बुद्धिनुसार आचरण म्हणजेच समाजवाद, अशी त्याची व्याख्या होती. तो एके ठिकाणी लिहितो–' क्षुद्र उद्दिष्टांकरिता किंवा केवळ व्यवहाराकरिता आपल्या तत्त्वांना आपण मुरड घालावी असे मला कधीच वाटले नाही. आपल्या विचारसृष्टीतील जग निर्माण करावयाचे असेल तर क्रांतीच घडवून आणली पाहिजे असे माझी मनोदेवता सांगू लागल्यानंतरच मी त्या मार्गाकडे वळलो.'

१८९६ मध्ये रशियातील कामगार चळवळीचे नवे पर्व सुरू झाले. कापड कामगारांनी आपल्या हक्कांसाठी संपाचे शस्त्र उचलले. लेनिन, मार्तोव्ह प्रभृति कामगार नेत्यांना अटक करण्यात आली. त्या वेळी ट्रॉटस्की सतरा वर्षांचा होता. शालेय जीवनातले त्याचे शेवटचे वर्ष बाकी होते. सुटीत तो यानोव्हकाला गेला. परंतु सात वर्षे ओडेसाला काढली असल्यामुळे आता तो यानोव्हकामधील जीवनाशी समरस होऊ शकत नव्हता. डेव्हिड ब्रोन्स्टेइन यांना आपल्या मुलाच्या वृत्तीतील फरक जाणवू लागला. म्हणून आता त्याला आपल्यापासून फार दूर ठेवून चालणार नाही या विचारांनी त्यांनी ट्रॉटस्कीला दूरच्या ओडेसाऐवजी जवळच्या निकोलेव्ह गावातील शाळेत घातले. श्पेंटसरसारख्या उदारमतवाद्याचा सहवास तुटला की आपला मुलगा ताळ्यावर येईल, अशी त्यांची अटकळ होती. परंतु 'जनतेच्छ' या क्रांतिकारक गटाचे काही जहाल कार्यकर्ते सैबेरियातील हद्दपारी भोगल्यानंतर निकोलेव्ह येथे राहावयास आले होते. त्यांच्या निकोलेव्हला आल्यामुळे गप्पा ऐकण्याची ट्रॉटस्कीला संधी लाभली. हळूहळू त्याचे अभ्यासावरचे लक्ष उडू लागले. शाळेची पाठ्यपुस्तके, गृहपाठ, परीक्षा या सर्वच गोष्टींतला रस निघून गेला. आतापर्यंत त्याला शाळेबाहेरचे जग सर्वस्वी अपरिचित होते. निकोलेव्ह येथील वास्तव्यात मात्र त्याच्या व्यक्तिमत्त्वाला निराळाच आकार येऊ लागला. मिलचे 'लॉजिक' लिपर्टचे 'इव्होल्यूशन ऑफ कल्चर,' मिग्नेचे 'फ्रेंच रिव्होल्यूशन' ही पुस्तके तो आता वाचू लागला होता. परंतु ही पुस्तकेही त्याला समाधान देईनात. त्यामुळे तो जेरेमी बेंथॅम व चेर्निशेव्हस्की या लेखकांकडे वळला. आतापर्यंत त्याने मार्क्सवादाचे फक्त नाव ऐकले होते. आता तो मार्क्सवादाचाही अभ्यास करू लागला. पण त्याच्यासारख्या बुद्धिवाद्याला मार्क्सवादही एकांतिक व अपुरा वाटू लागला. त्यामुळे मित्रांशी बोलताना तो मार्क्सवादावर कडाडून टीका करी.

याच सुमारास अॅलेक्झांड्रा झोकोलोव्हस्काया या तरुणीशी त्याचा परिचय झाला. अॅलेक्झांड्रा कट्टर मार्क्सवादी होती. ट्रॉटस्कीने तिला पहिल्याच भेटीत विचारले, "तुझ्यासारख्या तरुणीस रुक्ष मार्क्सवादाने प्रभावित करून टाकावे ही कल्पनाच मला सहन होत नाही." "अॅलेक्झांड्राही बोलण्यात कमी चतुर नव्हती. तिने पतिप्रश्न केला, "स्वत:ला बुद्धिवादी समजणारा तरुण अस्पष्ट आणि आदर्शवादी कल्पनांवर गुजराण करतो याचे मलाही आश्चर्य वाटते! "

आपल्या मुलाचे सध्या अभ्यासाकडे लक्ष नाही, शाळेतही तो नियमित जात नाही हे कळताच डेव्हिड ब्रोन्स्टेइन निकोलेव्हला आले. "तू अभ्यास करणार नसशील तर मी तुला पैसे पाठवणार नाही," असे त्यांनी सांगताच ट्रॉटस्की म्हणाला, " मीही यापुढे तुमच्याकडून पैसे मागवावयाचे नाहीत असे ठरविले आहे." 'बराय' म्हणून ब्रोन्स्टेइन रागारागाने यानोव्हकाला परतले. ट्रॉटस्की शिकवण्या करून उदरनिर्वाह करू लागला. शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर तो निकोलेव्हच्या सार्वजनिक जीवनात भाग घेऊ लागला. फ्रँझ श्विगोव्हस्वी या चेक तरुणाच्या मळ्यात तो आपल्या मित्रांसह राहत असे.

मध्यंतरी तो यानोव्हकाला जाऊन आला. आता त्याने ओडेसा विद्यापीठात प्रवेश मिळवून इंजिनियर किंवा गणिततज्ञ व्हावे अशी त्याच्या वडिलांची इच्छा होती. परंतु ट्रॉटस्कीला हा विचार पसंत पडला नाही. तो तडक निकोलेव्हला परतला. ३१ डिसेंबर १८९६ च्या रात्री नववर्षाच्या स्वागतासाठी श्विगोव्हस्कीने अल्पोपाहाराचा कार्यक्रम आयोजित केला होता. अॅलेक्झांड्राला निमंत्रण देण्यासाठी तो मुद्दाम तिच्या घरी गेला. तो म्हणाला, "अॅलेक्झांड्रा, तुझे अभिनंदन करावे अशी घटना घडली आहे. लिआॅ आपल्या गावाहून येथे परतला तो मार्क्सवादी होऊनच." अॅलेक्झांड्राचा प्रथम विश्वासच बसेना. परंतु ही गोष्ट खरी असल्याचे श्विगोव्हस्वीने शपथेवर सांगताच ती आनंदली.

श्विगोव्हस्कीच्या मळ्यातील कार्यक्रम ऐन रंगात आला होता. बाराचे टोले पडताच ट्रॉटस्की मध्यभागी उभा राहिला आणि हसत हसत म्हणाला, "रुक्ष मार्क्सवाद्यांचा निषेध असो."

ट्रॉटस्कीचे उद्गार ऐकताच अॅलेक्झांड्रा संतापली. ती रागारागाने बाहेर जाऊ लागली. श्विगोव्हस्वी धावतच तिच्या पाठीमागे गेला आणि खुलासा करू लागला, "अग, लिआॅने तुझी गंमत केली."

"काही गोष्टी इतक्या पवित्र असतात की त्यांची चेष्टा संभवत नाही आणि म्हणून लिआॅला सांग की जन्मात पुन्हा तुझे तोंड पाहण्याची माझी मुळीच इच्छा नाही." एवढे फणकाऱ्याने बोलून अॅलेक्झांड्राने घरचा रस्ता धरला. ट्रॉटस्की दूर जाणाऱ्या तिच्या आकृतीकडे पाहत नुसता उभा होता. (क्रमशः)

# भिंतीच्या पुडया

सुधाकर राजे

**▫ नवटाक संततिनियमन**

लिपीच्या लूपपासून निरनिराळ्या गोळ्यांपर्यंत अनेक मार्गांनी संततिनियमन करण्याचा कोरडा खटाटोप हल्ली आपल्याकडे चालला आहे. पण आता त्याची आवश्यकता उरली नाही. मद्रासला म्हणे एक 'ताडी-प्रेमी संघटना' आहे. तिच्या अध्यक्षांनी एका भाषणात नुकतेच जाहीर केले की ताडी आणि बियर पिणे हा संततिनियमनाचा सर्वोत्कृष्ट उपाय आहे. म्हणजे हिंदुस्थानची एक मोठी समस्या एकाच घोटात – निदान एकाच प्याल्यात – सुटली म्हणायची. आता प्रत्येक देश-हितचिंतकाने रोज नवटाक झोकणे हे त्याचे कर्तव्य समजले पाहिजे! अर्थात् नवटाक ताडी पिऊन नवटाक संततिनियमन करायचे, की बियरचा एक पेग मारून पेगभर संततिनियमन करायचे, हा मात्र ज्याचा त्याचा प्रश्न आहे. मी तर म्हणतो, बियरने संततिनियमन होते तर व्हिस्कीने व्हायला काहीच हरकत नाही! तेव्हा कुठल्या क्वालिटीचे संततिनियमन हवे हे ज्याचे त्याने ठरविण्याचा प्रत्येकाला अधिकार असावा. कारण कुणाला हातभट्टीचे संततिनियमन चालेल तर कुणाला इम्पोर्टेड संततिनियमन लागेल. ते काही असले तरी यापुढे रात्री झोकांड्या खात घरी आलेला नवरा बायकोला थेट सरकारमान्य सबब सांगणार – "जरा संततिनियमन केंद्रावर जाऊन आलो......नियमन जरा जास्तच झाले!"

**▫ साम्यवादी लाउडस्पीकर**

चीनचे अस्तंगत अध्यक्ष लिऊ शाओ-ची यांनी लिहिलेल्या 'चांगले साम्यवादी कसे होता येईल?' या पुस्तकावर हल्ली चीनमध्ये टीकेचा भडिमार होत आहे, तेव्हा त्यात खूपच दोष असले पाहिजेत हे उघड आहे. मला वाटते या टीकेचे मुख्य कारण म्हणजे त्यात चांगल्या साम्यवाद्याच्या अंगी आवश्यक असणाऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख केला नसावा – अन् ती गोष्ट म्हणजे खणखणीत आवाज. आता हेच बघाना, हाँगकाँगमध्ये सध्या चालू असलेले साम्यवादी दंगे जेव्हा सुरू झाले तेव्हा खणखणीत आवाजांत आरडाओरडा करू शकणाऱ्या तरुण पोरांना दिवसाला दहा-दहा शिलिंग देऊन भरती करण्यात आले होते. जेव्हा पोलिसांनी धरपकड सुरू केली तेव्हा दहाचे पंधरा करण्यात आले, आणि पोलीस–उपाय जेव्हा अधिक कडक झाले तेव्हा तर ही फी तीन पौंडांवर गेली. पाहिलेत? साम्यवादाचा आवाज कलदार रुपयाप्रमाणे खणखणीत आला नाही तर तो साम्यवाद त्या रुपयाप्रमाणेच खोटा समजला पाहिजे. आणि बद्द आवाज येणाऱ्या साम्यवादाचे नाव

बद्दू होणे अपरिहार्य नाही का ? आपल्याकडे गायत्री मंत्र शिकविताना तो कानांत सांगत – पण चिनी साम्यवाद ओरडून सांगितल्याशिवाय शिकविता येत नाही ! अर्थात् जो अधिक मोठ्याने ओरडू शकतो तो अधिक 'किंमती' साम्यवादी हे हाँगकाँगमधल्या आरडाओरडयाच्या चढत्या किंमतीवरून सिद्ध झाले आहे. मला वाटते, पेकिंगमध्ये गेल्या दोन-चार महिन्यांत रशियन वकिलातीपासून सुरुवात करून भारतीय व ब्रह्मी वकिलातीपर्यंत नऊ-दहा परदेशी वकिलातींसमोर लाल-रक्षकांची जी निदर्शने झाली, त्या वेळी वकिलातीसमोर लावलेले लाउडस्पीकर हे त्या वकिलातीतल्या माणसांचे डोके उठविण्यासाठी नसून लालरक्षकांच्या आवाजाला साम्यवादी संथा देण्याच्या शुद्ध हेतूनेच लावलेले असावेत ! माणसाचा विचार मनात असतो, पण "माओचा विचार" घशात हवा असे दिसते.

## ▫ वाघावर दया करा !

गरीब बिचाऱ्या मुक्या प्राण्यांवर दया करावी हे कुठल्याही सुसंस्कृत माणसाला सांगण्याची आवश्यकता नाही ! आता 'बें बें' करणारी बकरी मुक्या प्राण्यांत जमा होते तर 'गुर्रर्र' करणारा वाघही मुकाच प्राणी नाही का ? पण एका अमेरिकन सर्कशीतल्या एका रानटी माणसाला हे माहीत नव्हते. सर्कशीतल्या वाघाच्या घशात अडकलेले हाडूक काढण्याचे काम करीत असताना वाघाने त्रास दिल्याने या माणसाने चिडून वाघाच्या तोंडावर गुद्दा मारला. त्याचा एक दात पाडला या आरोपावरून न्यूयॉर्कच्या कोर्टात त्याला शिक्षा झाली, असे परवा वाचले. छे: छे: केवढे हे क्रौर्य ! वाघाचे दात पाडण्यापर्यंत माणसाची अधोगती व्हावी न ? उद्या सिंहाची शेपटी पिरगळण्यापर्यंतही असल्या माणसाची मजल जायची ! माणसाच्या या अमानुष क्रूरतेला वेळीच आळा घातला नाही, तर जगातल्या गरीब बिचाऱ्या यच्चयावत् वाघसिंहांना दयेची याचना करण्यासाठी न्यूयॉर्कच्या कोर्टाची पायरी चढावी लागायची !

## ▫ सवती संघ

'संघे शक्तिः कलौ युगे' या तत्त्वाला अनुसरून हिंदुस्थानात बायकांच्या संघटना स्थापन करण्यात आल्या आहेत.–पण बाईचे अनेकवचन बायका असे होते तसे बायकोचे अनेकवचनही बायका असे होते. या दुसऱ्या अर्थी बायकांची संघटना एकपत्नीव्रती रामाच्या या देशात कृष्णाच्या सोळा सहस्र बायकांनीही काढल्याचं ऐकिवात नाही. पण इंडोनेशियाचे भूतपूर्व अध्यक्ष डॉ. सुकार्नो यांच्या चार बायकांनी अशी संघटना स्थापन केल्याची बातमी आली आहे. या सुकार्नो-पत्नी संघाचे उद्दिष्ट "आपसांतला मत्सर व स्पर्धा टाळणे" हा असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. ध्येय अर्थातच स्तुत्य आहे. पण कुठलीही संघटना काढायची म्हणजे सभासदांची संख्या वाढायला नको का ? मला वाटते, आता सुकार्नोंना इतर काही उद्योग नसल्याने त्यांनी दररोज निदान एकतरी लग्न लावण्याचा उद्योग आरंभला तर या संघटनेची वाढ झपाट्याने होऊ शकेल. ●

## पुस्तके

# स्वातंत्र्योत्तर भारत

श्री. पां. वा. गाडगीळ यांचे समाजशास्त्रीय आणि राजकारणविषयक लिखाण अथवा वक्तव्य मला नेहमी आवडते. ते त्यांच्या चिकित्सक विचारपद्धतीमुळे त्यांचे विचार नेहमीच पटतात असे नाही; पण त्यांच्या विश्लेषणातील स्वतंत्र धारणा आकर्षक असते. परिस्थितीत स्वतः न गुरफटता शक्य तितके ताटस्थ्याने निरीक्षण करण्याचा आणि त्यावर आपल्या सिद्धांतांची बैठक मांडण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. कित्येकदा वास्तवाच्या भूमीवरून कल्पनेच्या अवकाशात त्यांचे विचार झेप घेतात; पण अशा वेळीही स्वतःच्या पंखांच्या सामर्थ्यावरच त्यांनी हे उड्डाण केलेले असते. परभृत कृत्रिम पंख चिकटवलेले नसतात.

'स्वातंत्र्योत्तर भारता'ची त्यांनी केलेली विचिकित्सा पाहताना मला याचाच प्रत्यय आला. 'आचार्य जावडेकर व्याख्यानमाले'तील तीन व्याख्याने येथे एकत्र केलेली आहेत. आधुनिक कालखंडातील सर्वसाधारण विकासप्रक्रियेचा आढावा पहिल्या व्याख्यानात घेतला असून (आणि तेच व्याख्यान सर्वांत जास्त विस्तृत आहे!) प्रत्यक्ष 'स्वातंत्र्योत्तर भारता'च्या समस्या दुसऱ्या आणि तिसऱ्या

# समाजशास्त्रीय आराखडे

—निशिकांत मिरजकर

व्याख्यानांत चर्चिल्या आहेत. भारताचा आर्थिक विकास आणि गाडगीळांच्या मते संसदीय लोकशाहीचा फेरविचार, असे त्या व्याख्यानांचे स्वरूप आहे. विषयाची व्याप्ती आणि महत्त्व या दृष्टीने 'स्वातंत्र्योत्तर भारता'चा सर्वांगीण अभ्यास येथे केलेला नसला तरी येथे निर्माण केलेले प्रश्न महत्त्वाचे असेच आहेत; आणि श्री. गाडगीळांनी त्यासाठी सुचविलेले मार्गही विचार करावयास लावणारे आहेत.

गाडगीळांच्या निरीक्षणाप्रमाणे आधुनिक कालखंडातील विकासाची प्रक्रिया पुढीलप्रमाणे आहे :

१ उत्पादनाच्या पद्धतीत लक्षणीय फरक पडल्याने लहान कारागीरांचे धंदे बसले. भांडवलदारांच्या हाती उत्पादनाची सर्व सूत्रे आली. कारागीर मजूर बनले. हे प्रथम इंग्लंडमध्ये.

२ यामुळे मजुरांना कमीत कमी रोजगार मिळत जाऊन त्यांची खरेदी-शक्ती कमी झाली. त्यामुळे इंग्लंडमधील मालाने बाहेरील बाजारपेठा काबीज केल्या.

३ यातून बाहेरील बाजारपेठांसाठी ब्रिटन व जर्मनी यांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन त्यातून पहिले जागतिक महायुद्ध ओढवले. याच वेळी रशियात कम्युनिस्ट क्रांती होऊन राजकीय आणि सामाजिक जीवनांत खळबळ माजविणारा नवा प्रश्न पुढे आला.

४ महायुद्धाइतकेच भांडवलदारीचे दुसरे भयानक संकट म्हणजे १९२९ ची अभूतपूर्व जागतिक मंदी. या मंदीचे तात्कालिक कारण रोखेबाजार अचानक कोसळला हे असले, तरी एकूण अर्थसंघटनेतच दोष उत्पन्न झाला होता. खरेदी-शक्तीची विषम वाटणी हे त्याचे मूळ होते.

५ अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांच्या नव्या धोरणामुळे सरकारने बँकांच्या कारभारात हस्तक्षेप करून, शेतीनियंत्रणाचे कायदे करून, कामगार-संघटनांना पोषक कायदे करून स्वत: उत्पादनाची कामे हाती घेतली व अशा तऱ्हेने व्यक्तिस्वातंत्र्याला थोडीशी मुरड घालून समाजवादी तत्त्वांचा अप्रत्यक्षपणे अंगीकार केला.

६ **लोकशाही समाजवादाचा प्रणेता केन्स हा मानावा लागेल.** मांडवलशाहीत विषम वाटणी असल्यामुळे न खपलेला उपभोग्य माल, उपभोगावाचून तडफडणारी माणसे आणि वापरली न गेलेली खरेदी-शक्ती, या तीन वस्तू एकाच समाजात एकमेकांस न भेटता नांदत राहतात, म्हणून मांडवलशाही उत्पादनाने बहुतेक काळ पूर्ण रोजगारी मिळूच शकणार नाही, असा केन्सचा सिद्धांत असून **अप्रतिबंध स्पर्धा व व्यक्तिस्वातंत्र्य यांस मर्यादा घालून समाजास रोजगार पुरविणे हे सरकारचे कर्तव्य होय, असे त्याने स्पष्टपणे म्हटले आहे.** शांततेने समाजक्रांती करण्याचे सामर्थ्य केन्सच्या उपायांत दिसून आले. केन्सच्या मागून जाण्याखेरीज सुधारलेल्या राष्ट्रांना गत्यंतर उरलेले नाही.

श्री. गाडगीळांच्या पहिल्या व्याख्यानात ही सर्व चर्चा आलेली आहे. हा इतिहास आहे. डोळसपणे पाहिलेला इतिहास आहे. जागतिक आर्थिक आलेख मांडून अर्थशास्त्रज्ञांनी काढलेले हे आडाखे आहेत. गाडगीळांनी त्याची साधार आणि सांगोपांग चर्चा केलेली आहे. विशेषतः, 'लेसा फेर' विचारसरणी, मांडवलशाहीमुळे युद्धे कशी अटळ बनतात, त्याची चर्चा, कम्युनिझम आणि केन्सच्या मतांचे विवरण या स्पष्टीकरणात गाडगीळांचे विश्लेषणाचे, निरीक्षणाचे सामर्थ्य चांगलेच प्रतीत होते. त्यांचे इतिहासाचे व समाजाचे अवलोकन सूक्ष्म आहे. विवेचन सलग आणि तर्कसंगत आहे. रूक्ष आहे पण क्लिष्ट नाही.

तथापि, जागतिक विकासाची ही सर्व प्रक्रिया एकंदर विषयाच्या दृष्टीने केवळ प्रास्ताविक आहे या पार्श्वभूमीवर व दुसऱ्या व्याख्यानात केलेली स्वतंत्र भारताच्या आर्थिक विकासाची चिकित्सा जास्त महत्त्वाची आहे.

**हिंदुधर्माचे सामाजिकदृष्ट्या बेफिकीर स्वरूप आणि भारतावरील दीर्घकाल ब्रिटिश अंमल या दोन गोष्टी भारताच्या विकासामधील मोठ्या अडचणी ठरल्या.** महसूलमक्तेदारीची पद्धत ब्रिटिशांनी पाडल्यामुळे भारतीय शेतकऱ्याच्या डोकीवर शोषक जळवांची उतरंड निर्माण झाली. सावकारांनी कर्जापोटी जमिनी गिळंकृत केल्या आणि खंड, व्याज व कर्जफेड यांपायी शेतकऱ्याला कफल्लक केले. अर्थातच शेतकऱ्याची खस्ता खाऊन शेती करण्याची सवय सुटली व शेतीचा मूळचाही कमीच असलेला कस आणखी कमी कमीच होत गेला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही स्वकीय सरकारने शेतीची भराभर प्रगती केली नाही. औद्योगिक विकासाच्या दृष्टीने स्वातंत्र्योत्तर काळात भारताने नाव घेण्यासारखी अभिमानास्पद प्रगती केली. उत्पादनाच्या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते. तथापि, तरीसुद्धा आजचा नागरिक–विशेषतः मध्यमवर्गीय–कमालीचा त्रस्त, निराश आणि गांजलेला आहे. वाढती महागाई आणि टंचाई हे याचे कारण आहे.

–येथे गाडगीळांनी एका वेगळ्या दृष्किोनातून या मुद्याला स्पर्श केला

आहे–" मालाचा पुरवठा मागणीपेक्षा अधिक वाढतो तेव्हाच स्वस्ताई होते व मागणीपेक्षा पुरवठा अधिक असला म्हणजे ते पुष्कळ धन वाढल्याचे, सुबत्तेचे लक्षण असते, " हा सर्वसाधारण नियम आहे. पण महायुद्धापूर्वीची स्वस्ताई सुबत्तेची द्योतक नव्हती, असे गाडगीळांनी दाखवून दिले आहे. त्या वेळी निर्माण झालेल्या जागतिक मंदीचा तो परिणाम होता. लोकांजवळ पैसा नसल्याने खरेदी घटली म्हणून स्वस्ताई झाली होती. म्हणूनच १९५५–५६ साली मुद्दाम जादा भांडवल-गुंतवणूक करून सरकारने किंमती घसरण्याचे थांबविले. किंमती तशाच घसरत राहिल्या असत्या तर पुन्हा शेतीवर मंदीची छाया आली असती, उत्पादन घटले असते आणि औद्योगिक विकासही थांबला असता.

श्री. गाडगीळांनी हा सिद्धांत अतिशय परिणामकारक रीतीने मांडलेला आहे. विशेष म्हणजे यावर विधायक स्वरूपाचे निश्चित उपायही सुचविलेले आहेत. त्यांचे लिखाण (किंबहुना व्यक्त) या ठिकाणी आदर्श परिस्थितीचे चित्र उभे करते.

येथेच मला त्यातील कमजोरपणा जाणवतो. समाजशास्त्राचे नियम वास्तव शास्त्रांच्या नियमांप्रमाणे काटेकोर नसतात. ते देशकालपरिस्थितीवर अवलंबून असतात. लवचिक असतात. केन्सने सुचविलेले उपाय आणि ते अंमलात आणण्यासाठी रूझवेल्टनी अवलंबिलेल्या पद्धती प्रमाणाबाहेर यशस्वी ठरल्या. " केन्सच्या विचारसरणीनुसारच हा विचार मी येथे केला आहे, " हा मंत्र जपणाऱ्या गाडगीळांना हे पटण्यास हरकत नाही, की भारताच्या सध्याच्या राज्ययंत्रणेच्या घटकांना केन्सच्या आदर्शापर्यंत हात पोचण्यासाठी खूपच उंच शिडचा आणाव्या लागतील. त्यांना हे माहिती असावेही ! त्याचमुळे " श्रीमंत हे अधिक श्रीमंत झाले हे खरे असले तरी गरीब हे अधिक गरीब न होता त्यांची परिस्थिती थोडीतरी सुधारलेली आहे हे खास, " असे प्रशस्तिपत्र देतादेताच " महागाई ज्या प्रमाणात वाढली त्या प्रमाणात पगारवाढ झाली नाही हे खरे, " असेही त्यांना कबूल करावे लागते. **" या परिस्थितीत संघ सरकारने स्थापन केलेले अन्नमहामंडळ अजून तरी कोणत्याही कामी निरुपयोगी ठरले आहे "**......" साऱ्या भारताने आता हा मार्ग पत्करला तरी इतक्या उशीरा या उपायाप्रत आपण आलो आहोत व परिस्थिती इतकी आटोक्याबाहेर गेली आहे, की हा उपाय अंमलात येऊन त्यावर लोकांची श्रद्धा बसावी इतके यश येण्याला शांत वातावरणाचा अवधी मिळणेही कठिण आहे "... " समाजवाद व नियोजन हे फक्त शब्द सरकार उच्चारते, कृती सारी भांडवलशाहीचीच आहे अशी टीका होत आहे. अशा टीकांत थोडेफार सत्य असतेही; म्हणून येथे बिनतोड उत्तर देता येत नाही, " असे निर्वाळे द्यावे लागतात. **श्री. गाडगीळांनी कौशल्याने या निर्वाळ्यांना बगल देऊन सारे विवेचन केवळ समाजशास्त्रीय वस्तुनिष्ठ अभ्यासावर केंद्रित केले आहे.** तथापि याबरोबरच राज्ययंत्रणेच्या अकर्तृत्वाचा, निष्क्रियतेचा वस्तुनिष्ठ आढावा त्यांनी घेतला असता तर जास्त

चांगले झाले असते. " पण आजवर या दृष्टिकोनाची बजावणी कार्यक्षमतेने व प्रामाणिकपणे झाली नाही हे खरे आहे ! याचे कारण बहुतेक पुढाऱ्यांनी या प्रकारच्या समाजवादाचा म्हणजे केन्सियन दृष्टिकोनाचा अभ्यास अथवा विचार कधी केलेला नाही, त्याबद्दल त्यांना निष्ठा कधी वाटली नाही " या निष्कर्षाला मगच खरे महत्त्व नि वजन प्राप्त होईल.

त्या दृष्टीने ' संसदीय लोकशाहीचा फेरविचार ' या तिसऱ्या व्याख्यानात श्री. गाडगीळांनी खूपच सडेतोड विवेचन केलेले आहे. लोकशाहीचा उदोउदो करणाऱ्या खंडप्राय भारतात लोकशाहीची किळसवाणी विटंबना कशी होत आहे याचे त्यांनी रंगविलेले चित्र विचारप्रवर्तक आहे. निरनिराळ्या पक्षांतील स्वार्थी व मतलबी लोकांची बजबजपुरी, पक्षशिस्तीच्या नावाखाली पक्षांतर्गत लोकशाहीची होणारी मुस्कटदाबी, विधानसभा सदस्यांच्या डोक्यांतील विचारशून्यता यांचे स्पष्ट चित्रण त्यांनी केले आहे. हा सर्व सावळागोंधळ टाळण्यासाठी, सर्व संसदीय लोकशाहीची पुनर्रचना करण्यासाठी त्यांनी काही नवीन उपायही सुचविले आहेत ते असे :

१ पक्षाच्या कार्यकारी मंडळाचा प्रत्येक सदस्य व मुख्यमंत्र्याचा प्रत्येक सरकारी मंत्री पक्षाच्या बैठकीत बहुमताने निवडावा.

२ भारताच्या सर्व राज्यांत व संघसरकारात प्रत्येक मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली त्या त्या खात्यांच्या कमिट्या असाव्यात आणि त्या त्या कायदेमंडळातले सर्व सभासद त्या सर्व कमिट्यांत मिळून वाटावे. या कमिट्यांतील सदस्य पूर्ण वेळ कामाचे अधिकारी मानले जावेत व राज्यकारभारावर देखरेख करणे, त्याचा अभ्यास करणे, अंमलबजावणीत भाग घणे हे काम या कमिटीसदस्यांचे असावे.

३ संघसरकारातील राज्यसभा व काही राज्यांतील विधानपरिषदा रद्द कराव्या.

तात्त्विकदृष्ट्या या सर्व सूचना उपयुक्त आहेत. आदर्श आहेत. पण पुन्हा मघाप्रमाणेच मला म्हणावेसे वाटते, की प्रस्तुत राज्ययंत्रणचे घटक आदर्शापासून फार फार दूर आहेत. अभ्यासकमिट्या नुसत्या स्थापून उपयोग होणार नाही. इथे झोपा काढायच्या, त्या तिथे काढल्या जातील. एकंदर मूलभूत बदल घडवून आणणारी काहीतरी खळबळजनक योजना निर्माण झाली पाहिजे. अभ्यासरत सदस्यांचाच राज्ययंत्रात समावेश झाला पाहिजे. ते जोवर होत नाही, तोवर आदर्शवादी योजना दिवास्वप्नाप्रमाणेच ठरणार.

तात्त्विक वस्तुनिष्ठ चर्चाच करू नये, अभ्यासपूर्ण लिखाण करू नये, असा याचा अर्थ नाही. श्री. गाडगीळांची ही तिन्ही भाषणे म्हणजे समाजशास्त्राचे अभ्यासपूर्ण आराखडे आहेत, असे मी प्रारंभीच म्हटले आहे. मात्र आपल्या देशातील राज्य यंत्रणेमुळे त्याला पडणाऱ्या मर्यादाही लक्षात घ्याव्यात इतकेच !

[ ' स्वातंत्र्योत्तर भारत ' – पां. वा. गाडगीळ – समाज प्रबोधन संस्था प्रकाशन – किंमत – दोन रुपये साठ पैसे – पृष्ठे ८४ ]

मनोहर रेगे

# देशी खेळांचे संवर्धन

कबड्डी-खोखो-आटचापाटचा यांसारख्या अस्सल भारतीय खेळांना वृत्तपत्रांत योग्य ती प्रसिद्धी मिळत नाही. खेळाडूंचे म्हणावे तसे कौडकौतुक त्यांत नीट होत नाही, असे आपण नेहमी म्हणतो. मॅटवरच्या कुस्तीला जी किंमत आज वृत्तपत्रांत आहे ती आखाड्यातील कुस्तीत का बरे नाही ? याचे कारण स्पष्ट आहे. जो खेळ आंतर-राष्ट्रीय स्वरूपाचा असतो त्याचेच लक्ष सगळीकडे वेधविले जाते. त्या दृष्टीने भारतीय खेळांना जगात कशी किंमत येईल याचाच प्रथम विचार आपल्या खेळाडूंनी, स्पर्धांच्या चालकांनी करावयास नको का ? क्रिकेट, फूटबॉल, हॉकी हे विदेशी खेळ प्रसिद्धी, पैसा आणि प्रतिष्ठा चटकन् मिळवून जातात. उलट भारतीय खेळांना तिकिट लावून जाणे प्रेक्षकांना 'परवडत' नाही; किंबहुना कमीपणाचेही वाटते. हे असे का ? प्रत्येक भारतीयाने आणि विशेषतः, महाराष्ट्रीयाने याचा जरूर विचार करावा. त्या निमित्ताने काही प्रश्नही त्यांच्यापुढे टाकावेसे वाटतात.

मुंबईला मे महिन्यात भाई नेरूरकर व अश्विनीकुमार भोईर सुवर्ण चषकांचे खोखो-कबड्डीचे रंगदार सामने झाले. त्यांत मुंबई, पुणे, गुजरात, बडोदे इत्यादी संघांनी भाग घेतला. या स्पर्धांना तात्पुरती प्रसिद्धी मिळाली आणि सारे काही पुन्हा थंडावले. याचे कारण या स्पर्धांचे चालक खाजगी संस्था म्हणून जनतेपुढे येतात. त्यांच्या स्पर्धांत खेळणारे संघ खाजगीच असतात. गुजरातचा मध्यस्थ रमन संघ काय किंवा पुण्याचा नवमहाराष्ट्र संघ काय ! आणि मग पुढील वर्षी होणाऱ्या स्पर्धांकडे दोघेही डोळे लावून बसतात-चालक आणि खेळाडू !

या उलट क्रिकेट-फूटबॉलचे खाजगी संघ तर खेळत असतातच; पण राज्य-पातळीवर त्यांचे सामने अखिल भारतीय संस्था भरविते. कबड्डी-खोखोच्या अशा अखिल भारतीय पातळीवरील संस्थांनी राज्य संघांचे सामने घडवून आणणे इष्ट आहे. त्यांत खेळाडूंचा दर्जा वाढविण्याचे, त्यांना नोकऱ्या आणि प्रतिष्ठा मिळण्याचे कार्यही आपोआप होऊ शकेल.

मग अखिल भारतीय संस्थांनी, आशियाई देशांत आणि त्यानंतर आंतर-राष्ट्रीय क्रीडा-जगतात हे खेळ कसे खेळले जातील यावर विचार करून पुढील पावले टाकली

पाहिजेत. भारतात होणाऱ्या सामन्यांना प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी असे क्रम दिले गेले पाहिजेत आणि प्रथम श्रेणी सामन्यांचे गुणतक्ते दरवर्षी छापून प्रसिद्ध केले पाहिजेत. शंभर वर्षांपूर्वीच्या क्रिकेटची नोंद आजही मिळू शकते. गेल्या आठवड्यातील कबड्डीचा गुणतक्ता नीट राखूनही ठेवलेला नसतो.

खेळाडूंनीही आपल्या पराक्रमांची नोंद ठेवून स्पर्धकांच्या चालकांना मदत करणे आवश्यक आहे. शिवाय वृत्तपत्रांत असे खेळ नेण्यासाठी कसदार लेखकांनी आणि क्रीडा-प्रतिनिधींनी पुढे सरसावले पाहिजे. तसेच वृत्तपत्रांकडे सामन्यांचे हुबेहूब तपशील-वार आणि चटकदार वर्णन कसे पाठविता येईल इकडे पदाधिकाऱ्यांनी लक्ष पुरवावे.

गेल्या डिसेंबरात बँकॉकला आशियाई क्रीडा-महोत्सव साजरा झाला. त्यात उप-स्थित राहिलेले भारतीय प्रतिनिधी एअर-कमोडर सी. एल्. मेहता म्हणतात की, "आंतर-राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांत आमचा दर्जा उंचावण्यासाठी भारतीय खेळाडू वैय-क्तिक व संघटितरीत्या परदेशी पाठविणे आवश्यक आहे, अशी जिद्द आणि हिरीरी भारतीय खेळांतील प्रत्येक व्यक्तीने ठेवल्यास आणि तसे विधायक कार्य करण्याची तयारी दर्शविल्यास भारतीय खेळांना आंतर-राष्ट्रीय क्षितिज फारसे दूर राहणार नाही."

## अनपेक्षित आणि अपूर्व

२६ जूनला सुरू झालेल्या विंबल्डन टेनिसस्पर्धांचा पहिला आठवडा जेवढा रोमांच-कारी तेवढाच रौद्र सुंदर होता ! विंबल्डनने यंदा अनेकांना अनपेक्षित धक्के दिले आणि त्यांची स्वप्ने धुळीला मिळविली.

अमेरिकेच्या चार्लिटो पॅसारेल यांनी गेल्या वर्षीचे विजेते स्पेनचे मॅन्युअल संताना यांचा पराभव केला. रामनाथन् कृष्णन् यांनाही अमेरिकेच्या मार्टी रिस्सेन यांनी पराभूत केले. त्या मागोमाग रॉय इमर्सन (ऑस्ट्रेलिया), क्लिफ् ड्रिस्डेल, टॉनी रॉश् (ऑस्ट्रेलिया), जॅन लेश्ली (डॅनिश) आणि महिला टेनिसपटू मॅरिया ब्युनो (ब्राझील) असे ख्यातनाम टेनिसपटू विंबल्डनमधून बाहेर पडले. इतका क्रूर हल्ला गेल्या ९० वर्षांच्या विंबल्डनच्या इतिहासात चांगल्या चांगल्या खेळाडूंवर कधी झाला नसेल !

या सर्वांत गेल्या वर्षीचे विंबल्डनवीर मॅन्युअल संताना यांचा पराभव मोठा वाटतो. त्यांचे प्रतिस्पर्धी पॅसारेल यांची सर्व्हिस प्रक्षोभक आणि प्रभावी होती. त्यांचा व्हॉलीज्चा हल्ला जबरदस्त होता. पॅसारेल हे अमेरिकेत चौथे टेनिसपटू गणले जातात. त्या दृष्टीने हा त्यांचा विजय अपूर्व होता. पॅसारेलच्या आजपर्यंतच्या पराक्रमात अनिश्चितता मोठ्या प्रमाणावर आढळते. त्यांच्या विजयात आणि परा-भवातदेखील अतर्क्य भाव सापडतो. २३ वर्षांचे पॅसारेल अमेरिकेच्या नॅशनल कॉले-जचे प्रावीण्यपटू आहेत. तेथील राष्ट्रीय इंडोअर टेनिस स्पर्धेत गेल्या वर्षी पॅसारेल

यांनी आर्–होम्बर्ग यांचा पराभव केला होता. तेव्हा ' डेव्हिस कप 'मध्ये अमेरिकेकडून त्यांची वर्णी लागली. टेनिसवर ते निर्व्याज प्रेम करतात. त्यांनी आयुष्यात प्रथम विजय मिळविला तो वडिलांवरच ! त्यांची आईसुद्धा उत्कृष्ट टेनिसपटू आहे.

चार्लिटो पॅसारेल सहा फुटांहून अधिक उंच आहेत. चेंडूवर तुटून पडणे ते अधिक पसंत करतात. सामर्थ्य आणि वेग यांचेवर ते नेहमीच अवलंबून राहतात. सरावाच्या वेळी जाळ्याजवळ उभे राहून निरनिराळे कोन साधून फटक्यांत विविधता आणण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात.

## हा हन्त !

● विंबल्डनच्या पहिल्याच फेरीत भारताच्या रामनाथन् कृष्णन् यांचा अमेरिकेच्या मार्टी रिस्सेन यांनी पराभव केला तेव्हाच कृष्णन् आता संपले आहेत असे वाटू लागले. मेच्या १३ तारखेला इटालियन लॉन टेनिस स्पर्धेत पाठीत चमक भरून निकोला पेट्रांजली (इटली) यांचे पुढे २ विरुद्ध १ सेटनी ते असतानाच निवृत्त झाले. "गेल्या काही वर्षांत असा त्रास मला होतो आहे," असे कृष्णन् म्हणाले. अनुभवाने परिपक्व होण्यासाठी भारतीय खेळाडूला अनेक वर्षे घालवावी लागतात आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात काही हाताशी लागेपर्यंतच त्याची शारीरिक क्षमता नष्ट होऊ लागते. आणि तोपर्यंत नवे उत्कृष्ट खेळाडू क्रीडाक्षितिजावर उगवतही नाहीत. क्रीडाक्षेत्रात भारताचे दुर्दैव आहे ते हे असे !

● यंदाची अर्जुन अवॉर्डस १४ खेळाडूंना देऊ केली. त्यांत गोल्फपटू पी. जी. सेठी यांचेही नाव आहे. किती जणांना माहीत आहे की, सेठी यांना १९६२ मध्ये अर्जुन पदक मिळाले होते ? आणि गोल्फसाठीच ! मग ते रामनाथन् कृष्णन्, विल्सन जोन्स, नंदू नाटेकर यांना पुन्हा का देत नाही ?

● भारताविरुद्ध पहिल्या क्रिकेट कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेत जन्मलेले निग्रो खेळाडू बेसिल डॉलिव्हियरा यांनी शतक झळकविले होते. निर्भिड आणि तडाखेबंद खेळ हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. १९५१ साली केपटाऊनमध्ये आपल्या संघाच्या २३३ धावसंख्येत स्वतःच्या २२५ धावा त्यांनी टोलविल्या होत्या. पहिल्या १०० धावा त्यांनी २५ मिनिटांत व दुसऱ्या ४० मिनिटांत केल्या होत्या. त्यांत २८ षट्कार आणि १० चौकार होते ! दुसऱ्या एका सामन्यात तर डॉलिव्हियरा यांनी ८ चेंडूंच्या षट्कात ४६ धावा काढल्या.

गेल्या वर्षी इमर्सन यांनी तिसऱ्या फेरीत विंबल्डनला पॅसारेल यांचा पराभव केला होता. आणि यंदा मॅन्युअल संताना यांनीदेखील म्हणे भविष्य वर्तविले होते की पॅसारेल विजयी होणार ! पॅसारेल यांच्या टेनिसमधील कर्तृत्वाचा आणि कौशल्याचा आणखी तो गौरव कोणता करावयाचा

## बक्षीस की बक्षिसे !

हॉलिक्स कंपनीतर्फे भारत आणि इंग्लंड यांमधील क्रिकेट कसोटी सामन्यांकरिता उत्कृष्ट फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षणाकरिता १०० पौंड व ५० पौंडांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. लॉर्ड्सवरच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताचे फलंदाजीचे बक्षीस बुधी कुंदरन् यांना मिळाले. भारताच्या ११० धावसंख्येत त्यांच्या ४७ धावा आहेत. प्रतिकूल परिस्थितीत कुंदरन् यांनी जिद्दीचा खेळ केला असला तरी केवळ ४७ धावा करणाऱ्या फलंदाजाला २१०० रु. बक्षीस देऊ करणे बेहिशेबी आहे ! उद्या भारताच्या २५ धावांत एखाद्याने १२ धावा केल्या तरी हे इंग्लंडचे तज्ज्ञ तेवढी किंमत देऊन भारताचे हसे करू शकतील ! फलंदाजीत किमान शतक झळकविणाऱ्या खेळाडूलाच अशी रोख बक्षिसे देणे योग्य ठरेल. पहिल्या कसोटी सामन्यात भारताकडून एकाही गोलंदाजाला बक्षीस दिले गेले नव्हते. तसेच जर या कसोटी सामन्यात फलंदाजीबाबत केले असते तर चालू शकत नव्हते काय ? पण इंग्लंडमधल्या कॉस्मॉपॉलिटन समीक्षकांची एक विचित्र जात आहे. भारताची भरमसाट स्तुती केल्याने आपला पराभव होत नाही हे ते पक्के जाणून आहेत. तसेच हॉलिक्सचे १०० पौंड कुणाला मिळाले तर त्यांचे काय बिघडते ?

●

मुंबईस मे महिन्यात झालेल्या भाई नेरूरकर सुवर्ण चषक खो खोच्या बक्षीससमारंभप्रसंगी माजी रेल्वेमंत्री श्री. स. का. पाटील यांना पाचारण करण्यात आले होते. त्या वेळी प्रेक्षकांनी 'फर्नांडिस झिंदाबाद' अशा घोषणा केल्या.




## एप्रिल १८

वि. ग. कानिटकर

७

तामिळनाड प्रत्यक्ष पाहावयाचा, इथल्या लोकांनी घडवलेला अलीकडील राजकीय बदल अभ्यासावयाचा. इथले प्रश्न काय आहेत त्यांचे स्वरूप समजावून घ्यायचे, अशा हेतूने माझे दोघे मित्र इथे आलेले आहेत. मी मात्र उगाच आलोय. माझ्या इथे येण्यात हेतू काहीही नाही. जोशी–पुंडलिक म्हणाले, "चला हो!" आणि मी निघालो. उत्साहाने निघालो आणि आज सकाळपासून वाटत आहे,–काय हा उद्योग चाललाय कालपासून ! याला भेट, त्याला भेट, प्रश्न विचार, उत्तरे शोध, माझे असेच होते नेहमी ! कुठल्याही नवीन कल्पनेला सुरुवातीला मी कवटाळतो. वेगळा प्रवास सुरू होतो. पहिली काही पावले उत्साहाने पडतात. आणि मग मी गळाठतो. ते काम मला 'बोअर' करू लागते. 'बोअर-युद्ध' सुरू होते.

आज सकाळी पुंडलिक-जोशी बाहेर पडले, तेव्हा मी चक्क नकार दिला. त्यांना पटेल अशी थाप दिली, "अकथित कहाणी"ची प्रकरणे लिहायची आहेत. वेळ कमी आहे वगैरे. आणि ते बाहेर पडल्यानंतर इथे व्हरांड्यात बसून आहे. गेले दोन दिवस मला निवासातून बाहेर पडताना पायवाटेवर सारख्या हृदयाच्या आकारासारख्या, गडद भगव्या रंगाच्या गुंजा सापडत होत्या. धुळीत पडलेला तो गडद भगवा ठिपका प्रत्येक वेळी मी उचलीत होतो. निवासाच्या आवारातच कुठेतरी गुंजांचे झाड असले

पाहिजे. सकाळीच ते सापडले होते. झाडाखाली रक्त शिंपडल्यासारख्या गुंजा पसरलेल्या होत्या. अर्धवट उघडलेल्या वाळक्या कुडकुडीत शेंगांतून, लालचुटुक डोळे लुकलुकावे तशा त्या लुकलुकत होत्या. तळहातावर गुंज ठेवून मी ती पाहतो आहे. घट्ट, पक्क्या रंगाची, गुळगुळीत, तुकतुकीत लाल गुंज धुळीत पडली तरी लक्ष वेधणारी.

एकीकडे मी दैनंदिनी लिहितो आहे. प्रवासाला निघाल्यापासून जे जे घडले त्याचे टिपण करतो आहे. शीः शीः काय हा कंटाळवाणा मजकूर लिहिला जातो आहे ! हे वाचायला आवडेल तरी का कुणाला ? दैनंदिनी लिहिणे हे कळत-नकळत सारखी स्वतःची पाठ खाजवण्यासारखे काम होत जाते. सारखी स्वतःची मिजास, आपण लेखक आहोत याचे नगारे. आपण विचार करू शकतो याची जाहिरात. स्वतःशीच बडबडत राहणे हे कंटाळवाणेच काम होणार म्हणा !

परंतु एखाद्या शास्त्रज्ञाची, नव्या नव्या योषिता शोधणाऱ्याची किंवा अगदी मरणाच्या सावलीत लिहिलेल्या वरसईकर भटजींची दैनंदिनी मोठी बहारीची होऊ शकते, यात संशय नाही.

तरीपण दैनंदिनी लिहिली पाहिजे. कारण काल कानांवर आलेले नाव मी आज विसरतो. इथे मी नवी नवी माणसे पाहतो आहे. त्यांची नावे तरी टिपलीच पाहिजेत, कारण नुसते नाव कळले तर ते विसरलेच जाते. ज्यांच्याशी प्रत्यक्ष ओळख नसते परंतु जी मोठमोठी कामे करतात, त्यांची नावे लक्षात राहतात. ती त्यांच्या कार्यामुळे की वर्तमानपत्रामुळे ? पण आपल्या चांगल्या ओळखीच्या माणसाचे नाव डोळ्यांपुढे येण्यापूर्वी तो माणूस पुढे येतो, हे मात्र खरे आहे. इथे भेटणारी माणसे मात्र फक्त नावानेच महत्त्वाची राहणार आहेत. कारण आधी त्यांचे नाव आठवले तर ती डोळ्यांपुढे येणार आहेत. ती माणसे नावासकट हरवण्यापेक्षा त्यांची नावे नोंदवलेली बरी.

आमच्या खोलीला लागून असलेल्या खोलीत कुणीतरी मोठे सरकारी इंजिनियर उतरलेले आहेत. निवृत्तीपूर्वीची ही शेवटची वर्षे ते इतक्या लांब बदली झाल्याने वर्ष-दोन वर्षे तरी इथे एकटे राहणार आहेत. मघाशी बाथरूममधून परतताना किलकिल्या दारातून मी त्यांना ध्यानस्थ बसलेले पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर जो निगर्वी शांतपणा आहे, वागण्यात जे सौजन्य आहे ते सरकारी अधिकारपदाशी विसंगत का याचा उलगडा झाला. त्यांचे नाव अजून कळलेले नाही. परंतु नांव कळले नाही तरी थोड्या वेळापूर्वी पाहिलेली, धोतर नेसलेली त्यांची ती उघडी गोरीपान मूर्ती, आता कुठेतरी मनाच्या कोपऱ्यात मांडी घालून बसलेली आहेच.

मोटर काढताना ते हसले. मी हसलो. मोटर वळवताना त्यांनी विचारले,–

" तुम्ही नाही बाहेर पडलात ?"

नेमके माझ्या उदासवाणेपणावर त्यांनी बोट ठेवल्याने मी गडबडलो. खोटं हसून म्हटलं,–

" निघतोच आहे पाठोपाठ !"

त्यांची मोटर ऐटदार वळण घेऊन निवासाबाहेर पडली. पाठोपाठ वरच्या मजल्यावरची चार–दोन तरुण मुले, शाळेतून मुले सुटावी तशा उत्साहाने धडपडत जिना उतरून निघून गेली.

आता अधिकच कंटाळवाणे वाटू लागले. उन्ह तापू लागले आहे. सगळा दगडी निवास कुलुपबंद आहे. गडीमाणसेदेखील कुठेतरी बाहेर गेली आहेत.

सायंकाळी कथा–वाचनाचा कार्यक्रम ठरला आहे. आम्ही इथे आल्याबरोबर चिटणिसांनी बजावले होते,–" मंगळवारी सायंकाळी कार्यक्रम ठरला आहे !" कुठली कथा वाचावी ? कथा–वाचनाची वा कथनाची वेळ आली तरच आपण आपल्या कथा तपासू लागतो. खरोखरच लोकांना आवडतील अशा आपल्या एकंदर कथा किती ? – अडचणीचा प्रश्न असतो. आपले आपल्याला कळू लागते की, दोन–अडीचशे लोकांना ऐकाविशी वाटेल अशी कथा आपण फारशी लिहिलेली नाही. मी तर गेल्या ऑक्टोबरनंतर कथाच लिहिलेली नाही. बरं, हे काही आकाशवाणीवरचे कथा–वाचन नाही ! सगळे रेडिओ बंद असले तरी आपले वाचन चालू. लाल दिवा लागला की, थांबावयाचे. लाल दिव्यापेक्षा श्रोत्यांचे चेहरे अधिक बोलके असतात. ते फटकन् सांगतात –" पुरे करा हे चऱ्हाट !" इथे हा 'चेक' सारखा लागत असतो–आकाशवाणीवर असतो तो पंचवीस रुपयांचा !

कथा–वाचनाचा कार्यक्रम बरा झाला असे वाटते. पुंडलिकांची 'टेकडीवरचे पीस' एका लहान मुलाची सुंदर कथा. श्रोत्यांना ती प्रथम आवडलेली आहे, असे वाटले, परंतु अखेरीकडे ती श्रोत्यांना काहीशी गूढ होऊ लागली. नंतर मी 'भेट' ही कथा वाचली. जोशींचा अभिप्राय–" श्रोत्यांनी ती काहीशी विनोदी म्हणून –receive केली." हा माझ्या चेहऱ्याचा किंवा निवेदनाचा दोष असावा. श्री. जोशी यांनी कथा–कथन केले. 'दृष्ट' ही कथा त्यांनी सांगितली. एका 'दुष्ट माणसाची नजर' हा या कथेचा विषय. मध्यमवर्गीय जीवनाची चांगली शोकांतिका कथेत आहे. कथा श्रोत्यांना आवडली असावी असे वाटले. 'असावी' म्हणतो याचे कारण कथा-कथन करताना ते सारखे श्रोत्यांकडे पाहत होते व श्रोत्यांच्या चेहऱ्यावर सतत सौजन्य त्यामुळे पसरलेले होते. कथा–वाचन करताना आमच्या माना खाली होत्या. त्यामुळे प्रेक्षकांचे चेहरे बदलत होते.

कथा–वाचनाच्या कार्यक्रमापेक्षा या नंतरचा कार्यक्रम आम्हांला रुचकर वाटला. मद्रासमधील जवळ जवळ सर्व महाराष्ट्रीय कुटुंबे समारंभाला आलेली होती. हातात बशा घेऊन एकीकडे खात पटांगणात नव्या नव्या ओळखी होत होत्या. एक लक्षात आले की, महाराष्ट्र सोडून बाहेर दूरवर नोकरीधंद्यासाठी जाणारी माणसे ही अतिशय हुशार असतात व यामुळ अधिकाराच्या व उत्तम पगाराच्या जागा मिळाल्यानेच ती परप्रांतांत जातात. या उलट मुंबईला येणाऱ्या दाक्षिणात्य मंडळींचे आहे. सामान्य कुवतीची सामान्य वा कनिष्ठ बुद्धिमत्तेची माणसे मुंबई–पुण्यात येतात व

मराठी माणसांवर वर्चस्व गाजवतात. दु:ख याचे होते की, लायक स्थानिक लोकांचा अधिक्षेप होतो. परप्रांतांतील महाराष्ट्रीय माणसे असे आक्रमण करीत नाहीत. गावाकडची सामान्य माणसे तिथे बोलावीत नाहीत !

जेवणाचा कार्यक्रम आटोपल्यावर हळू हळू मंडळी निघून जाऊ लागली. काही मोटारगाड्या व स्कूटर्स मात्र मागे रेंगाळल्या. हॉलमध्ये रमी–ब्रिजची दोन कडबोळी डोक्याला डोकी घाशीत बसली. पटांगणातल्या एका मोटारीत एक १४–१५ वर्षांची मुलगी मोटारीतला छोटा दिवा लावून कादंबरी वाचीत होती. तिचे आई–वडील आत रमीत दंग झाले होते. इवल्याशा दिव्याचा प्रकाश पुस्तकावर आणि तिच्या चेहऱ्यावर पसरला होता. एकाग्रतेने पुस्तक वाचणारी अशी छोटी मुलगी मला नेहमीच फार सुंदर दिसते. सगळीकडे शांत झाले होते आम्हीही पेंगलो व झोपी गेलो.

मध्यरात्री दोन–तीनच्या सुमारास मला जाग आली. व्हरांड्यात आलो तो समोरच्या हॉलमध्ये निस्तब्ध कडबोळी हातात पत्ते धरून तशीच खेळत होती. आणि मोटारीत ती मुलगी अंग दुमडून गाढ झोपी गेली होती.

## एप्रिल १९

सकाळी जागा झालो, तेव्हा लक्षात आले की, कालचा मरगळीचा आज मागमूस नाही. आज सकाळी ८।। वाजता मद्रासचे पराभूत मुख्यमंत्री भक्तवत्सलम् यांच्याशी भेट ठरलेली होती. मयलापूर भागात जिथे भक्तवत्सलम् राहतात तिथे आम्ही टॅक्सीने गेलो.

बंगला चांगला प्रशस्त होता. बंगल्यासमोर मोटारींचे अर्धचंद्राकृती वळण होते. 'इन-आऊट' दिंड्या होत्या. मध्यभागी पोर्च होता. पोर्चच्यासमोर बरीच फुलझाडे होती.

पोर्च चढून आम्ही पडवीत आलो व तिथून मधल्या दालनात गेलो. दालन प्रशस्त होते. बसायला कोच समोरासमोर मांडलेले होते. भक्तवत्सलम् यांच्या नोकराने आम्हांला 'बसा' म्हटले. दालनाला लागून असलेल्या खोलीत झुलत्या अर्ध्या दरवाजाच्या आत भक्तवत्सलम् कुणातरी आलेल्यापाशी बोलत होते. भक्तवत्सलम् यांचा आवाज बाहेर येत नव्हता. परंतु त्यांना भेटावयाला आलेले लोक मात्र मोठ्याने बोलत होते.

भक्तवत्सलम् कसे दिसतात याचे कुतूहल संपलेच. कारण, आम्ही बसलो होतो त्या दालनात भिंतीवर त्यांची पुष्कळ अलीकडची छायाचित्रे होती. चेहऱ्यात महत्त्व होते ते अगदी चिचोळ्या हनुवटीला व त्याच्यावरील फाजील लांबीच्या जिव्हणीला. खालचा ओठ वरच्या ओठाने सतत दाबून धरल्याप्रमाणे, त्यांच्या डोळ्याखालील व कपाळावरील शिरा ताणलेल्या वाटत होत्या. बंगला खूपच मोठा असावा. कारण आम्ही बसलो होतो, त्या दिवाणखान्यात यायलाच ५–६ दरवाजे होते. टॅक्सीतून

उतरल्यावर बाह्य दर्शनातच्च बंगल्याचा विस्तार जाणवलेला होता.

पंधरा–वीस मिनिटांतच भक्तवत्सलम् यांनी आम्हांला खोलीत पाचारण केले. आमचे ओळखपत्र वाचताना त्यांनी प्रथमच, पुंडलिक कोणते, जोशी कोणते याची काळजीपूर्वक छाननी केली. मुख्यमंत्री असताना रोज असंख्य अर्जांची छाननी करण्याची त्यांची ही सवय असावी. लगेचच ते खांद्यावरील उत्तरीय सावरीत बोलू लागले. पुंडलिक–जोशी यांचे प्रश्न ते शांतपणे रिचवून घेतल्यासारखी मान हलवीत बोलू लागले की अत्यंत आत्मविश्वासाने इंग्रजीत उत्तरे देत. जनतेशी आमचा संपर्क राहिला नाही, म्हणून आमचा पराभव झाला हे जसे त्यांनी मोकळेपणाने मान्य केले, त्याचप्रमाणे राजाजी–डी. एम्. के. युतीविषयी त्यांनी संशय व तीव्र नापसंती व्यक्त केली. राजाजींच्या मंत्रिमंडळात ते पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. राजाजींनी परंपरागत वर्णानुसार धंदेशिक्षण देण्याची जी प्रतिगामी शैक्षणिक–योजना मांडली त्याने कॉंग्रेसला तडे गेले, असे त्यांचे मत होते. राजाजी कॉंग्रेस सोडून गेले–नव्हे त्यांना जावे लागले व कामराज आले ते याचमुळे. राजाजींनी आपल्या वैयक्तिक राजकीय वनवासाने भटकून, हा दावा साधला, असा त्यांचा सांगण्याचा रोख होता.

यावरून डी. एम्. के. च्या यशात राजाजींचा वाटा लक्ष्यणीय होता, हे आमच्या ध्यानात आले. भाषेच्या प्रश्नावर व तांदळाच्या प्रश्नावर आज डी. एम. के. ने कॉंग्रेसचा पराभव केला असला तरी डी. एम्. के. चे तत्त्वज्ञान हे एक विष आहे व लोकांना अनुभव येईल, तसतसे लोकमत डी. एम्. के. विरुद्ध जाईल, असा त्यांचा आशावाद दिसत होता.

गेले दोन दिवस मद्रास शहरातून फिरताना मी जागोजाग पंचम जॉर्जचे भव्य दगडी पुतळे अनेक ठिकाणी पाहिले होते. स्वातंत्र्य मिळून २० वर्षे होत आल्यानंतरही हे पुतळे असेच रस्त्यात जागोजाग दिमाखाने उभे असावेत, हे मला खटकले होते. मी भक्तवत्सलम् यांना विचारले, –"तुम्ही पाच वर्षे अधिकारावर होता, त्यापूर्वी पाच वर्षे कामराज होते. तुम्ही हे पुतळे का हलवले नाहीत ?"

भक्तवत्सलम् म्हणाले, –"वुई हॅड नो टाईम–आम्हांला ते करायला वेळ झाला नाही. शिवाय त्यांना दुसरीकडे जागा शोधली पाहिजे !"

मला भक्तवत्सलम् यांचे हे उत्तर पटले नाही. मला वाटले हे पुतळे या शहरवासीयांना अजूनही बोचतच नाहीत.

भक्तवत्सलम् यांचा निरोप घेऊन बाहेर पडताना मद्रदेशीयांचा राष्ट्रीय उदासीनतेचा विषय निघाला, तेव्हा जोशी म्हणाले,–"उद्या चिन्यांचे राज्य आल्यावर–आले तर–सर्वांत आधी हे लोक चिनी भाषा शिकतील ! त्यांचे पुतळे उभारतील."

माझ्या मनात आले की, तरीसुद्धा चिन्यांनी परवानगी दिली तर पंचम जॉर्जचे पुतळेही राहू द्या म्हणतील.

मयलापूर भागात गोपालपुरीत एक मोठे गोपुर आकाशात उंच घुसलेले होते आम्ही येताना पाहावयास गेलो. मंदिरासमोर चौकोनी विस्तीर्ण तलाव होता. तलावाला आत उतरण्यासाठी दोन बाजूंनी पायऱ्या बांधलेल्या होत्या व त्या तलावात कमलपत्रांची मोठमोठी बेटे ठिकठिकाणी तरंगत होती. निळी-तांबडी दोन्ही कमळे देठावर ऐटबाजपणे हलत होती.

तलावाच्या कडेकडेने तारेच्या कुंपणात बंदिस्त बगीचा होता व या कुंपणाला लागून शहाळ्यांचे ढीग घालून 'नारियेल पानी' विकले जात होते.

तलावाला वळसा घालून आम्ही मंदिरापाशी आलो. पादत्राणे बाहेरच्या एका पोरापाशी ठेवली व आत गेलो. गोपुरांच्या प्रदेशात मीनाक्षी मंदिराची आतापर्यंत चित्रांत पाहिलेली भव्य गोपुरे, आम्ही पुढे पाहणार आहोत. इथे त्यांची छोटी तरीही पुरेशी भव्य अशी प्रतिकृती आमच्यापुढे उभी होती.

गाभाऱ्यावरील सोनेरी विमान, वर पसरट असा कळस, चारी अंगाला भव्य मंडप व उंच गोपुरे म्हणजे प्रवेशद्वारे अशी या दक्षिणात्य देवळांची प्रमुख रचना होती. देवळाचा परिसर चौकोनी असे. प्रत्येक दिशेला बहुधा गोपुर असे व गोपुरांना जोडणारे दगडी उंच तट चारी अंगाला असत. देवळात गोपुरातून प्रवेश केला की एखाद्या नव्या गावात शिरल्यासारखे वाटते. देवाची आह्निके जसजशी वाढत गेली तसतशी ही देवळे विस्तीर्ण होत गेली असावीत. या देवालयाचा मुख्य पुजारी हा मद्रास युनिव्हर्सिटीचा पदवीधर होता. आम्ही त्याच्याशी बोलू लागलो व तो आम्हांला देवळाची माहिती सांगू लागल्यावर तो जे शब्द वापरीत होता त्यांवरून देवळाच्या आह्निकांची कल्पना येत होती.

तो सांगत होता,—

"दी मूल-विग्रह दॅट ईज मेन डीअरी इज इन् दी गर्भगृह, व्हिच इज दी इनर पार्ट. दी गॉड समटाईम्स गोज् आऊट इन फिजिकल फॉर्म दॅट इज उत्सव विग्रह..."

[पूजामूर्ती ही गाभाऱ्यात असते व ती जेव्हा उत्सवप्रसंगी बाहेर पडते तेव्हा तिला उत्सवमूर्ती म्हणतात.]

त्याने पुढे सांगितले, की गर्भगृहावर (गाभाऱ्यावर) जे विमान असते तो देवळाचा मध्यबिंदू असतो. विमानाच्या चारी अंगाला मंडप असतात. हे मंडप म्हणजे एकतर शयन-मंडप, विवाह-मंडप अशी दालने असतात किंवा लांबच लांब अगाऱ्या असतात. मूल-विग्रह स्वरूपात देवाचे सर्व सोपस्कार करण्याचा अधिकार फक्त पुजाऱ्यांचा असतो. तिथे देव झोपतो, जेवतो. गाभारा चौकोनी होता. सपाट छताची दोन चौकोनी दालने एकात एक ठेवावीत तसा गाभारा होता. पुजाऱ्याने आम्हांला आत नेले व आमच्यासाठी गाभाऱ्यातून प्रसाद आणला. असंख्य उंच उंच समया तिथे तेवत होत्या. ठिकठिकाणी पणत्या लावून गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराची चौकट तेलकट काळपट झालेली होती.

देवदर्शन करून आम्ही पुन: मंडपात आलो. मंडपाला अनेक खांब होते, आणि त्यांवर अनेक शिल्पे खोदलेली होती. मंडप व गोपुरे यांच्यामध्ये विस्तीर्ण प्राकार होता. प्राकार मात्र एकच होता व या प्राकारात दोन-तीन छोटी छोटी देवळे होती. एका देवळासमोर दोन दगडी हत्ती होते. इतके गुळगुळीत आणि देखणे होते की, त्यांच्या पाठीवर कितीही वेळा हात फिरविला तरी समाधान होत नव्हते.

दोन्ही अंगांची गोपुरे सुमारे ६०–७० फूट उंच होती. फुटाफुटाने चिंचोळ्या होत आकाशात घुसलेल्या त्या बांधकामावर देवदेवतांच्या आणि दैत्यांच्या इतक्या आकृती खोदलेल्या होत्या की, सर्व गोपूर नीट निरखून पाहावयाचे तर मान मोडली असती.

आम्ही तिथे अर्धा-पाऊण तास काढला तरी भाविकांची सारखी ये-जा मोठ्या प्रमाणावर चालूच होती.

आता अकरा वाजायला आले होते. जेवून दुपारी पुन: युनिव्हर्सिटीत विद्यार्थ्यांशी गप्पा मारण्याचा कार्यक्रम ठरलेला होता. यासंबंधी प्रा. चंपकलक्ष्मी यांच्याशी फोनवरून बोलण्यासाठी आम्ही फोन कुठून करता येईल, हे शोधता शोधता मंदिराजवळच्याच एका बँकेत शिरलो. या बँकेत फोन करून झाल्यावर बँकेचे एजंट श्री. राव यांनी आम्हांला आग्रहाने बसवून घेऊन कॉफी मागवली. आमच्या मद्रासमधील मुक्कामाचा हेतू कळताच ते राजकारणावर सावधपणे बोलू लागले. त्यांच्या बोलण्यावरून, ते मंगलोरकडचे आहेत हे आम्हांला समजले. गेलेल्या राजवटीसंबंधी व आलेल्या नव्या राजवटीसंबंधी ते सारख्याच प्रेमाने बोलत होते, कारण, त्यांचे मित्र दोन्ही मंत्रिमंडळांत होते. ते इतके गोड गोड बोलत होते, की विचारू नये. तरीही बोलण्यात गोडवा होता व शिवाय त्यांनी आम्हांला कॉफीही दिली होती.

श्री. राव यांचा निरोप घेऊन आम्ही चालत निघालो. आदल्या दिवशी या भागात जोशी यांनी एक 'उत्तम' भोजनालय शोधून काढले होते. आल्यापासून इतके चांगले जेवण आपण घेतलेले नाही, असे ते सांगत होते. खरोखरच जेवण उत्तम होते. केळीच्या पानावर सुंदर भात तीनदा वाढला गेला. भरपूर. हवा तितका. सांबार व भाज्या सर्व रुचकर होते. जेवण उरकून आम्ही युनिव्हर्सिटीची बस पकडली, तेव्हा दुपारचा एक वाजायला आला होता.

युनिव्हर्सिटीत प्रा. चंपकलक्ष्मी यांनी ठरल्याप्रमाणे सात पदव्युत्तर शिक्षण घेणारे स्कॉलर्स एकत्र केले होते. यांत दोन विद्यार्थिनी होत्या. यांतील चार एम. ए. चे विद्यार्थी होते. तिघे पीएच्. डी. करत होते. आमच्याशी त्यांचे बोलणे मोकळेपणी व्हावे म्हणून चंपकलक्ष्मी तिथे थांबल्या नाहीत.

विद्यार्थी समोर दिसताच, वर्ग ताब्यात घ्यायचा आवाज पुंडलिकांनी काढला. हा त्यांचा सूर इतका वेगळा लागला की, मी व जोशींनी चमकून एकमेकांकडे पाहिले. विद्यार्थ्यांना मात्र तो आवेश परिचयाचा वाटला.

मुख्यतः भाषाविषयक समस्येवर आमची चर्चा रंगली. सर्व विद्यार्थ्यांनी एकमुखाने "हिंदी नेव्हर!" असे मोठ्या हिरीरीने सांगितले. त्यांना इंग्रजी भाषाच कायमची राहायला हवी होती. हिंदी ते शिकणार नव्हते व इंग्रजी राहिल्याने फारसे बिघडले, असे त्यांना वाटत नव्हते.

मद्रास राज्याचे संपूर्ण तामिळीकरण व हिंदीला सक्त विरोध असणाऱ्या, या सर्व तरुण विद्यार्थ्यांचा 'शिवसेने'ला मात्र आक्षेप होता. त्याच दिवशी वृत्तपत्रांत कृष्णमेनन–सौ. सप्रे निवडणुकीत शिवसेनेची गुंडगिरी, याविषयी विस्तृत वृत्त आलेले होते. मद्रास राज्याचे संपूर्ण तामिळीकरण करून पर्यायाने उत्तर भारतीयांना तामिळनाड परका करून टाकण्याचा अट्टाहास धरणारे हे विद्यार्थी, महाराष्ट्रात काही मराठी माणसांनी दाक्षिणात्यांचा वरचष्मा कमी करण्यासाठी, चळवळ सुरू करताच त्यांनी त्याविरुद्ध भूमिका घेतली होती. अर्थात या विद्यार्थ्यांपैकी कुणीच कधी मुंबई पाहिलेली नव्हती. मद्रासच्या ग्रामीण भागांतून आलेले ते सर्व विद्यार्थी 'डी. एम. के.' पंथाचेच होते. मी त्यांना विचारले, –

"तुमच्या युनिव्हर्सिटीत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो तो परीक्षेच्या गुणांनुसार की अन्य काही विचार केला जातो?" त्यांच्यापैकी एकाने सांगितले, –

"फक्त परीक्षेतील गुणांनुसार!" मी पुन: विचारले, –

"असे असेल तर मग शिवाय विद्यार्थ्यांचा इंटरव्ह्यू होतो तेव्हा काय विचारतात–काय पाहिले जाते?"

मी अधिक खोल जाऊ लागलो ते पाहताच त्या विद्यार्थ्याने शरणागती दिली–

"जातीजातींना खूपच जागा राखून ठेवलेल्या आहेत."

"म्हणजे परीक्षेतील गुणानुक्रम महत्त्वाचा नाही?"

या माझ्या प्रश्नावर ते सर्वजण गप्प राहिले.

हिंदी भाषेबद्दल त्यांच्या मनातील द्वेषभाव व अप्रीती समजण्यासारखी होती. हिंदी शिकायचे म्हणजे नवीन लिपी त्यांना शिकावी लागते व तीन भाषांचा आग्रह हा त्यांना अन्यायकारक वाटतो.

त्यांपैकी एकाने मोठा मार्मिक प्रश्न विचारला. तो म्हणाला,

"अखेर हा प्रश्न किती लोकांचा आहे? पाच ते दहा टक्के लोकच प्रांताबाहेर जातात किंवा मध्यवर्ती सरकारच्या नोकऱ्यांत शिरतात. एवढ्या लोकांनी इंग्रजी माध्यम पत्करले तर फारसे काय बिघडणार आहे?"

हा युक्तिवाद बिनतोड होता. येथील नव्या तरुण पिढीतील हिंदी भाषेचा हा खोलवर गेलेला तिटकारा पाहिला की वाटते भारताच्या शासनाचे दोन उत्तर-दक्षिण भाग अटळ दिसतात. उत्तरेचे शासन हिंदीत चालणार व दक्षिणेचे इंग्रजीतून!! मराठी माणसांनी या दोन्ही भाषा चांगल्या हस्तगत केल्या तर?

विद्यार्थ्यांशी झालेली बातचीत उद्‌बोधक झाली. त्यानंतर आम्ही मद्रास विद्या-

पीठातील तामीळ विभागाचे प्रमुख प्रा. वरदराजन् यांना भेटायला गेलो. विद्यापीठ बंद व्हायची वेळ झाली होती.

"राजकारणात मला अजिबात रस नाही, जिथे राजकारण नाही अशा 'दूर ...दूर' जागी जायचे हे माझे एक आवडते स्वप्न आहे...." अशी सुरुवात करून या उंच, काळसर पण हसतमुख प्राध्यापकांनी आम्हांला सरळ मद्रासच्या बीचवर नेले. तिथे कॉफी आणि 'मुरक्कम' देऊन एकमेकांमधील अंतर त्यांनी चटकन् नाहीसे केले आणि मग ते बोलू लागले.

त्यांच्या बोलण्यात एक मजेदार लकब होती. आपल्या टकलावरून हात फिरवीत, अगदी दोन टोकांचे पर्याय ते आमच्यासमोर ठेवीत आणि त्यांतून आपले मत खुबीदारपणे सूचित करत. "आपल्यापुढे दोनच choices आहेत. एकतर संपूर्णपणे आपल्या देशाचे पश्चिमीकरण करून टाकायचे किंवा परंपरेच्या मुळांना घट्ट चिकटून राहायचे!" कोणताही प्रश्न सोडवायचे दोन मार्ग असतात. एक हुकूमशाहीचा, सोव्हिएट रशियासारखा; अन् दुसरा आपला लोकशाही 'गोंधळाचा!' त्यामुळे हे गृहस्थ कुठे तळमळीने बोलताहेत आणि कुठे उपहासाने बोलत आहेत याचा प्रथम प्रथम आम्हांला नीट उलगडा झाला नाही. पण पुढे ही लकब कळल्यावर त्याची मजा वाटू लागली. माध्यमाचा प्रश्न उपस्थित केल्यावरही त्यांनी याच शैलीत त्याचे उत्तर दिले, "मला असं वाटतं," ते म्हणाले, "शिक्षणाच्या माध्यमाचा हा गुंतागुंतीचा प्रश्न आपल्याला झटकन् सोडवता येईल. एकतर आपण आपल्या मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे किंवा ते जमत नसेल तर आपल्या मातांचीच भाषा आपण बदलून टाकली पाहिजे."

संस्कृतच्या धाग्याबद्दल विचारल्यावर मात्र ते असे काही बोलले नाहीत! त्यांनी सांगितले, "तामीळनाडमध्ये संस्कृत अध्ययनाची एक दीर्घ परंपरा आहे. तुमच्या मराठी साहित्याचे येथील ॲम्बॅसेडर श्रीनिवासाचार्य यांचे घराणे या परंपरेतले. राघवन्, अय्यर, शंकरन्, अग्निहोत्र, ताताचार्य, शिवरामशास्त्री इत्यादी कितीतरी नावे मी या संदर्भात तुम्हांला सांगू शकेन. पण एकेकाळी काही अभ्यासकांनी तामीळचा निर्दय उपहास केला. तेव्हापासून संस्कृतविरुद्ध प्रतिक्रियेचे जे दुसरे चक्र सुरू झाले ते अजून सुरू आहे. आज ना उद्या ते थांबेल.

अवती भोवती हळूहळू अंधार भासू लागला. एकमेकांचे चेहरे दिसत नाहीसे झाले तेव्हा मोठ्या अनिच्छेने आम्ही उठलो. प्रा. वरदराजन् यांनी आम्हांला आपल्या मोटारीने निवासावर सोडले.

आजच्या दिवसभराच्या चर्चेने जोशी फारच अस्वस्थ झाले होते. पुंडलिक 'लिहिणे जमेल' या आनंदात होते. या भटकंतीत मला आता पुनः उत्साह वाटू लागला होता.

पारावरची बैठक करून आम्ही झोपी गेलो. (अपूर्ण)

# चित्रपट

## तीन तास छळणारी

# छोटिसी मुलाकात

राज कपूरच्या 'संगम'ची 'ऑफर' नाकारणारा व बंगालचा दिलीपकुमार म्हणून ओळखला जाणारा उत्तमकुमार आपल्या 'छोटीसी मुलाकात' या चित्रपटाद्वारा हिंदी चित्रपटसृष्टीच्या प्रांगणात उतरला आहे.

बाल-विवाहाचा विषय तसा आता जुना झाला आहे. कै. देवलांच्या 'शारदा' नाटकाने या सामाजिक समस्येचा इतका बोलबाला झाला की, आता 'शारदा' नामक कायदाच अस्तित्वात आला आहे. लग्नाची वयो-मर्यादा आता तर वीस केली जाणार असल्याची घोषणा आरोग्य मंत्र्यांनी संतती-नियमनाच्या संदर्भात नुकतीच केली आहे. त्यामुळे हा विषय आता शिळा झाला आहे. उत्तमकुमारने ज्या कादंबरीवरून ही चित्रकथा सचीन भौमिककडून तयार करवून घेतली आहे, ती 'अग्निदिव्य' ही कादंबरीदेखील किती तरी वर्षांपूर्वी लिहिलेली जुनी आहे.

**जुनी कहाणी स्मृती पुराणी !**

आपल्या मृत मित्राने वचन दिले होते म्हणून हृदयविकाराने आसन्नमरण असलेला एक मित्र आपल्या मित्र-पत्नीला तिच्या नातीचे लग्न स्वतःच्या नातवाशी करण्यास भाग पाडतो. तिच्या पुरोगामी सुनेला हे पटत नाही. ती ते लग्नसंबंध तुटलेत, असे मानते. आपल्या मुलीला आपल्यासारखी 'पॉलिश्ड' बनविते. पुढे तिच्या मुलीचे–'रूपा'चे–प्रेम 'अशोक'वर बसते, वाङ्‌निश्चय ठरत असताना रूपाच्या पहिल्या नवऱ्याची नोटीस येते. जमलेले सगळे लोक तिची अवहेलना करतात. परंतु तिची आई डगमगत नाही. ती यातून कायदे-शीर मुक्तता मिळविण्याचा खटाटोप सुरू करते. दरम्यान रूपाला आपले बालपणचे लग्न वगैरे आठवते. तिची सद्‌सद्‌विवेकबुद्धी तिला आपल्या पूर्वाश्रमींच्या सासरी खेचून आणते आणि तिथे आल्यानंतर तिला कळते की, बालपणी तिचे ज्याच्याशी लग्न लागले होते, तो दुसरा तिसरा कोणी नसून

तिचा प्रियकर–अशोक ह्याच–आहे !

रूपाचे ज्याच्यावर प्रेम जडते तो तिचा पूर्वाश्रमींचा पती असतो, असे शेवटी दाखविले आहे. पण मग वाङ्‌निश्चय चालू असताना नोटीस कोणाची येते ? भर समारंभात आपल्या प्रियेचा अपमान होत असताना अशोक आपले सत्य स्वरूप का प्रकट करीत नाही ?

नेमके हेच प्रश्न रूपा त्याला शेवटी विचारते, तेव्हा तो म्हणतो, " तुला प्रीतीच्या श्रृंखलेत जखडून मला घरी आणावयाचे नव्हते, संस्काराविषयी तुझ्या मनात श्रद्धा जागृत झाल्यानंतर पूर्वीच्या लग्न-संस्कारांची मातब्बरी जाणवून तू शरण यावंस, असं मला वाटत होतं..." परंतु विस्कळित व विसंगत पटकथेमुळे त्याचे हे म्हणणे व वागणे यांत कुठलीच सुसंगता (Harmony) आढळत नाही. ' सस्पेन्स ' राखण्याच्या भरात सारेच धुक्यात हरवते ! खरं म्हणजे वाङ्‌निश्चयाचा समारंभ चालू असताना नोटीस येते, तेथेच सारा गौप्यस्फोट होऊन चित्रपट संपावयास हवा होता. परंतु तब्बल तीन तासांपर्यंत प्रेक्षकांचा ' छळ ' केल्याशिवाय आमच्या हिंदी चित्रपट निर्मात्यांना राहवतच नाही ! त्याला ही ' छोटीसी मुलाकात 'ही अपवाद नाही !

उत्तमकुमार हा बंगाली चित्रपटसृष्टीत खरोखरच एक अव्वल दर्जाचा अभिनेता म्हणून ओळखला जातो. त्याचे ' नायक ' वगैरे वंग चित्रपट बरेच गाजलेले आहेत. परंतु इथे त्याचा काही विशेष प्रभाव पडत नाही. निर्माता म्हणून तर नाहीच नाही, पण अभिनेता म्हणूनही नाही ! वैजयंतीमालेबरोबरच्या एका द्वंद्व गीतात तर तो चक्क शम्मीकपूरसारखे चाळे करतो !

वैजयंतीमाला ' रूपा 'च्या भूमिकेत चांगली समज दाखविते. पण नृत्यप्रसंगी तिने अगदी अर्धनग्नच व्हावयास हवे काय ?


शशिकलेचा ' ठसका ' बरा आहे. राजेंद्रनाथचा विनोद चावून चोथा झालेला. प्रतिमादेवी, तरुण बोस, बद्रीप्रसाद, सुलोचना चतर्जी आदी जुन्या जाणत्या कलाकारांची कामे छानच आहेत.

शंकर–जयकिशनच्या संगीतात काहीच नावीन्य नाही. उत्तमकुमारच्या तोंडचे पहिले गाणे तर फारच कर्कश आहे. ' दो राहे पर खडे हैं ' हे लताचे गाणे तेवढे मधुर आहे.

ईस्टमन कलरमधील फोटोग्राफी आल्हाददायक. अलोक सरकारच्या दिग्दर्शनात मुद्दाम उल्लेख करण्यासारखे काहीच नाही.

●

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**

**सायनाचार्य, नासिक**

**१५ ते २१ जुलै १९६७**

**मेष** : मंगळ तुमच्यासमोर उभा ठाकला आहे. तो आव्हान देऊ पाहत आहे. सूर्य–गुरूची सहानुभूती तुमच्या बाजूस असल्यामुळे त्याचे आव्हान स्वीकारायला मुळीच डरू नका.

थोडीशी दगदग होईल, मानसिक त्रास जाणवेल, पैशाअडक्याची विवंचनाही मधून मधून जाणवेल. पण अपयशाची भीती यत्किंचितही नाही.

मेष राशी व्यक्तींच्या स्वभावात हे वैशिष्टच आहे की, अशा आणीबाणीच्या वेळीच त्यांचा निर्धार पेटून उठतो, जिद्द जागी होते. हेच गुणधर्म अनिष्ट कालावर मात करायला समर्थ असतात.

या कालात जबाबदाऱ्या वाढू लागतील, परठिकाणी जावे लागेल. नव्या वातावरणाशी एकरूप होताना थोडेफार कष्ट पडतील. पण अपेक्षित यश निश्चित मिळवू शकाल.

दि. १९ ते २१ घाईगर्दीचे व धावपळीचे दिवस.

**वृषभ** : गुरूच्या साथीला सूर्यही पराक्रमात. आणि मंगळाची बैठक जशी हवी तशी. यामुळे हा महिना अनेक चांगल्या घटनांमुळे लक्षात राहील, असा जाणवेल. सर्वांत महत्त्वाची गोष्ट स्थानांतर– बदल– बढती. आणि या तुमच्या प्रगतीच्या आड सहसा कोणी येणार नाही.

ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे साऱ्या गोष्टी घडून यायला लागतील. या आठवड्यात रेंगाळलेली सारी कामे हातावेगळी होतील.

व्यापारधंद्यातही फार मोठ्या उलाढाली हातून घडून यायला लागतील. सामाजिक व राजकीय क्षेत्रांत आता तुम्हांला कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाही. सहज यश–आणि तेही घवघवीत–लाभेल.

छपाई, वृत्तपत्रीयकार्य, लेखन, यांत्रिक व्यवहार यांत मिळणाऱ्या नेत्रदीपक यशामुळे अनेकजण तुमचा हेवा करू लागतील.

दि. १६–१९–२१ या वेळचे परिश्रम अपेक्षेबाहेर यशस्वी ठरतील.

**मिथुन** : तुमच्या बाबतीतील सारी अनिष्टता आता इतिहासजमा झाल्यासारखीच आहे. उलट उज्ज्वल भविष्यकालाची सुखस्वप्ने रंगविण्यात दंग व्हाल. भविष्यकालीन प्रगतीची ही नांदीच. धनस्थानी सूर्य–गुरू, पराक्रमस्थानी शुक्र–एवढेही भांडवल कोणत्याही कार्यात घवघवीत यश मिळायला पुरेसे आहे.

नवे आणि विशेष प्रगतीचे क्षेत्र हाती गवसेल, घराचा प्रश्न सुटेल, वाहनाची विवंचना मिटेल, विरोधकांना पिटाळून काढण्यात यशस्वी ठराल.

नोकरीधंद्यातील विशेष प्रगतीमुळे तुमच्याकडे पाहण्याची जगाची दृष्टी बदलेल. आपल्या कुटुंबियांना विशेष प्रतिष्ठेचे स्थान याच काली लाभेल.

दि. १९ ते २१ पासून अनेक प्रगत गोष्टी भरभर घडून याव्यात.

**कर्क** : सध्या आपणांस चौथा मंगळ आहे. तो असला काय अन् नसला काय, गुरूचे कृपाछत्र लाभलेल्यांना त्याच्या अस्तित्वाची यत्किंचितही दखल घ्यायचे कारण नाही. तुमच्या निर्धारनिष्ठेचाच यात सिंहाचा वाटा आहे.

थोडीफार कामे रेंगाळतील, अंग मोडून आल्यासारखे केव्हा केव्हा जाणवेल. पैशाचा ओघ थोडाफार खंडित झाल्यासारखे वाटेल. पण म्हणून काही अपयशाची भीती मुळीच बाळगायला नको.

या आठवड्यात फार मोठ्या जबाबदाऱ्या वाढायला लागतील. धावपळ, घडपड, दगदग हा तर तुमचा नित्याचाच प्रकार. तात्पर्य, सध्याचे दिवस खूपच दगदगीचे आहेत, पण विक्रमी यश देणारेही आहेत.

दि. १८ ते २१ हाच काल अपेक्षा सफल करणारा.

**सिंह** : सिंह राशी व्यक्तींना निसर्गाचे वरदान लाभलेले आहे. काहीही करावे-कसेही करावे आणि ते यशस्वी व्हावे. या वेळी तर मंगळासारखा समर्थ ग्रह तुमच्या पराक्रमस्थानी आलेला आहे. तुमचा रुबाब, तुमचा डामडौल, थाटमाट यांत फरक तर पडणार नाहीच. उलट थोडीशी वाढच होईल.

या महिन्यात वरचेवर प्रवास घडेल, अनेक कार्यक्रमांत भाग घ्यावा लागेल. राजकीय क्षेत्र तर तुमचे खास आवडीचे क्षेत्र! त्यात आवाज उठवाल. तुमचे म्हणणे, तुमचे विचार अनेकांना मान्य करायला लावाल.

हे दिवस पैशापेक्षा प्रतिष्ठा वाढवणारे आहेत. तुमचे कार्यक्षेत्र कोणतेही असो—प्रतिज्ञेने त्यात यश मिळवू शकाल.

दि. १६–१८–२१ अनेक चांगल्या गोष्टी या वेळी घडाव्यात.

**कन्या :** कन्या राशी व्यक्तींना आता यापुढे कशाचीही डर नाही, असाच एकादशांतील सूर्य–गुरूंचा आशय दिसतो.

अशी ग्रहस्थिती १२ वर्षांनंतर लाभते. आणि म्हणूनच ती जीवनात काही भव्य-दिव्य करून जाते. हा काल असाच आहे.

या कालापासून समाजातील तुमचे वजन, तुमचा दबदबा वाढू लागेल. असंख्य हातांची मदत आपणांस लाभत असल्यामुळे आपणांस कोणत्याही कामात अपयश येण्याची धास्तीच नाही.

औद्योगिक क्षेत्र विस्तारेल, नोकरीतील फार मोठे स्थान सहजासहजी लाभेल, सामाजिक-राजकीय प्रतिष्ठेची उंची तर खूपच उंचावेल. या काली अनेक मार्गांनी पैसा हाती येईल, व्यावसायिक संघर्ष मिटतील, विरोधकांशी दिलजमाई होईल.

दि. १८–२०–२१ या काली चिरंतन स्मृतीच्या घटना घडाव्यात.

**तूळ :** भाग्यस्थानी बुध. दशमात गुरू आणि लाभस्थानी गुरू. अधिकाधिक चांगली ग्रहस्थिती सध्या तुमच्या वाटयास आलेली आहे.

या कालापासूनच तुमची स्वप्ने आकार घेऊ लागतील, आशा अंकुरायला लागतील. शनि–मंगळांच्या युद्धात भंगलेल्या साऱ्या आशा–आकांक्षा पुनश्च सांधल्या जातील.

तुमच्या कार्यक्रमांत आगळेच तेज प्रकटेल. प्रज्ञा–प्रतिष्ठा विकसेलच. शिवाय कला-क्षेत्रात आजवर कधी न मिळालेले यश या कालापासूनच मिळण्याची लक्षणे दिसायला लागतील. नवा व्यवसायधंदा उभाराल आणि त्याला आवश्यक असे भांडवल सहस्र हातांनी जमा होऊ लागेल. तुमच्या जीवनातील हा एक अपेक्षासाफल्याचा काळ आहे. दि. १९ ते २१ या काळावर विशेष लक्ष ठेवा.

**वृश्चिक :** एकटा मंगळ अनुकूल नाही म्हणून सारेच मुसळ केरात असे वाटून घ्यायचे कारण नाही. मंगळापेक्षा गुरुच्या सहानुभूतीची तुम्हांला विशेष गरज आणि ती केव्हाच लाभलेली असल्याने तुमचे सहसा कुठेच व कशातच नडू नये.

वैज्ञानिक–वैद्यकीय क्षेत्रांत, स्थापत्यशास्त्रात तुम्हांला सहसा प्रतिस्पर्धीच भेटणार नाही. तुम्ही त्या क्षेत्रात मुक्तसंचार करू लागाल. ग्रहांनी अनुकूल कौल दिलेला आहेच–प्रयत्नांची शिकस्त केलीत की, यश घे–घे म्हणून मिळेल. आगामी ४–६ महिने तुमच्या प्रगतीला अत्यंत अनुकूल जाणवतील.

दि. १९ ते २१ अनेक प्रश्न या वेळी सुटावेत.

**धनू :** मंगळ एकादशात आल्यापासून अपयशाची भीती पुष्कळशी कमी झाली आहे. वास्तविक, अपयशाची भीती कुणाला ?–यशाची खात्री नाही त्याला ! आजवर अनेक अनिष्ट ग्रह आले आणि गेले. आपणांस आजवर सहसा

अपयश भेटूच शकले नाही. आता तर हर्षल–मंगळ तुमच्या पाठीशी खडे आहेत. या वेळी आम्ही तुमच्या यशाची हमी घ्यायला समर्थ आहोत, असे त्यांचे आवर्जून सांगणे आहे.

शिक्षणासाठी–व्यवसायधंद्यासाठी प्रवास घडेल. नव्या क्षेत्रात पदार्पण घडेल. आणि तेथेही आजवरची यशाची परंपरा कायम राखाल.

दि. १५–१६–१९–२० या कालाची नोंद करा.

**मकर** : मंगळ दशमात आल्यापासून तुमचे वजन वाढेल. सामाजिक, राजकीय क्षेत्रांत तर तुमच्याविना पान हलेनासे होईल. तुमच्या व्यक्तिमत्त्वाभोवती तेजोवलय विलसू लागेल. निर्धारनिष्ठेचे व्रत निष्ठेने पाळणारा मनुष्य प्रतिकूल परिस्थितीही केवढे घवघवीत यश मिळवू शकतो याचे हे प्रात्यक्षिक होय.

या आठवड्यात फार मोठ्या जबाबदाऱ्या आपणांस उचलाव्या लागतील आणि जिवाचे रान करून त्या यशस्वीही करून दाखवल्या जातील. यशस्वी उद्योगधंद्याचे तंत्र जगाने तुमच्यापासून शिकावे.

दि. १५–१८–२१ या काळाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**कुंभ** : आजवर शिकस्तीचा प्रयत्न करूनही तुम्हांला तुमच्या प्रगतीचे गणित सुटत नव्हते. आता ते झटपट सुटेल. आणि याला कारण भाग्यस्थ मंगळ.

या आठवड्यात व्यावसायिक उत्क्रांती घडून यावी. नवे विचार, नव्या योजना घेऊन आपण वाटचाल करू लागाल. वाटेत तुम्हांला अनेक सहकारी भेटतील. त्यांचे हार्दिक सहकार्य, तुमचे परिश्रम यांमुळेच विक्रमी यश आपण मिळवून दाखवाल. आता तुमची साडेसाती आहे नाही सारखीच ! या काली तुमच्या जीवनइतिहासातील एक नवा अध्याय लिहिला जाणार आहे.

पैसा आणि प्रतिष्ठा अमाप मिळेल. अनारोग्याची विवंचना मिटेल. वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल. दि. १९ ते २१ या काळाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवेल.

**मीन** : साडेसातीत आठवा मंगळ. या चमत्कारिक ग्रहस्थितीचे चटके आणि फटके जाणवल्याशिवाय कसे राहतील ? गुरुची सहानुभूती लाभलेली आहे म्हणून अनिष्टता सहन तरी करू शकता.

या आठवड्यातही त्याच अडचणी, त्याच विवंचना ! शिकस्तीचा प्रयत्न केलात तरच थोडेफार यश पदरी पडेल. काही दिवस ही अनिष्टता सहन केल्याशिवाय गत्यंतर नाही.

मुख्यत: प्रकृतीला अधिक जपा. धडधाकट प्रकृती असली तर आज ना उद्या आपण चांगले दिवस पाहू शकाल.

नोकरीधंद्यातील अडीअडचणी अनुभवाव्या लागतील. धावपळ–धडपड करूनही अपेक्षेप्रमाणे फारसे काही घडणे कठीणच.

दि. १७ ते १९ हाच काल काहीसे स्वास्थ्य देणारा जाणवेल. ●

१ जुलै १९६७

या दिवशी या कारभाराला
१०० दिवस पूर्ण झाले.

या शंभर दिवसांत दिल्लीकरांना
जनसंघाने काय दिले ?


निदान काय देण्याचा प्रयत्न केला ?

# जनसंघाचे पहिले १०० दिवस

मो. ग. तपस्वी

यांचा एक सडेतोड पण अभ्यासपूर्ण लेख
पुढील अंकी....

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**